ो. गुप्ते' कृत

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र १०५४
IRBK-0101054



IRBK-0101054
IRBK-0101054

—शेवंता—

ताराऊच्या स्वतंत्र झेंड्याची रखवालदारीण.

বা·ক্র· ৭০৫৪

# सवता सुभा.

१३८८
१०११'७३

लेखक:—

**श्री० शांताराम गोपाळ गुप्ते.**

" हिरा हरपला, रणरागिणी, ब्रम्हकौस्तुभ, दख्खनचा मोहरा, रक्तध्वज, वेणुनाद, शिवसम्राट्, पेशवाई-नंतर, वारांगना, परीक्षा, माझा राजा, सार्वभौम, धनुर्धारी " वगैरे नाटकांचे कर्ते.

IRBK-0101054

IRBK-0101054

आवृत्ति १ ली.

जून, १९३१.

किंमत ... आणे.

मुंबई नं. ४

प्रकाशकः--

शांताराम गोपाळ गुप्ते,

सातारा.

सोल एजन्टस्ः--

मेसर्स लांजेकर आणि जोशी,

एल्फिन्स्टन थिएटर, मुंबई.

सदर नाटकाचे चित्रपट, भाषांतर, पुनर्मुद्रणाचे वगैरे हक्क ग्रंथकर्त्यांनें स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

मुद्रकः--

एस्. व्ही. परुळेकर,

मुंबईवैभव प्रेस,

सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसाइटीज बिल्डिंग,

सँढर्स्टरोड, गिरगांव-मुंबई.

# प्रस्तावना.

माझे स्नेही सुप्रसिद्ध नाटककार श्री० **यशवंतराव टिपणीस** यांनीं याच कथानकावर " **शिक्का-कट्यार** " हें नाटक लिहिलें असतांना हा " **खवता सुभा** " रंगभूमीवर उभारण्याचें कारण काय, असा साहजिक प्रश्न कोणापुढेंही उभा राहील ! परंतु या विषयाचा अभ्यास करतांना,-ताराबाईची मनोभूमिका प्रस्तुतप्रमाणेंही असणें शक्य नाहीं कां, असा प्रश्न माझ्या मनांत आला,-आणि विचार करतां, ताराबाई सारख्या अत्यंत मानी, महत्वाकांक्षी, कर्तबगार स्त्रीची मनोवृत्ति तत्कालीन परिस्थितीमुळें अशी असणें, सर्वस्वीं अशक्य मात्र खास नाहीं असेंच मनाला पटलें ! शंभुराजांच्या अंतकालीं, महाराष्ट्रांत मराठशाही नामशेष होऊन, मराठ्यांना धड उभें राहण्यासही स्वतःची अशी जागा राहिली नव्हती;-ती बिकट परिस्थती नाहींशीं करून मराठदौलत पुन्हां पूर्ववैभवाला पोचवण्यांत, छत्रपती राजारामांनीं अलौकिक कर्तबगारी दाखविली, हें कोणीहि कबूल करील ! त्यांच्या निस्वार्थीपणामुळें त्यांच्या उज्ज्वल चारित्र्यास विशेषच शोभा आली आहे. परंतु त्यांच्या मागें ताराबाई सारख्या अभिमानी स्त्रीच्या मनावर, " दौलत स्वार्जित आहे " असा परिणाम झाला असला, व शाहूनें मोंगलांशीं धरलेलें सलोख्याचें धोरण तिच्या मानी मनास पटलें नसलें तर तें विशेष दोषास्पद आहे असें म्हणतां येणार नाहीं ! आणि म्हणूनच या प्रामाणिक बुद्धिवादांत भिन्नभिन्न पवित्रे घेतलेल्या खंडोप्रतिनिधी सारख्या कर्तबगार व्यक्ति " देशाभिमानी कीं देशद्रोही " अशा अनिश्चित रंगांत कांहींना दिसल्या तर नवल नाहीं ! ताराऊ करताही प्रतिनिधी प्रमाणेंच जिवाला जीव देणारे सर्जाशेवंतासारखे मोतीदाणे कमी नव्हते ! आणि याच दृष्टीनें या इतिहासाकडे पाहणारा एक जाणता वर्ग महाराष्ट्रांत आज तयार होऊं पहात आहे !

असा वादात्मक नाट्यभाग मुद्दाम माझ्याकडून लिहवून तो उत्साहानें रंगभूमीवर व्यवस्थित रीतीनें आणण्याचें धाडस, " **देशबंधु संगीत मंडळी** " चे मालक स्ने. रा. **गणपतराव काळसेकर** व चालक स्ने. रा. **के. श्रीनिवास** यांनीं दाखविलें व नाटक लोकादरास पात्र केलें याबद्दल त्यांचा आभारी आहेच पण विशेषतः

श्रवणमनोहर चाली देऊन हें नाटक संगीतदृष्ट्याही नटवण्याच्या बाबतींत श्री. **गणपतराव काळसेकर** व **संगीतरत्न मास्टर शंकरराव, बुरजीखां, विश्वनाथबुवा** यांनीं जी मेहनत घेतली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें. त्याचप्रमाणें गद्यभाग उठावदार करणारे मंडळींतील माजी नट रा. शितूत व हल्लींचे तालीम मास्टर रा. आप्पा कुळकर्णी यांचा नामनिर्देश होणें जरूर आहे. मंडळींनीं प्रसंगानुसार फोटो दिल्या-बद्दल त्यांचा, त्याचप्रमाणें मुखपृष्ठावरील फोटो सुबक काढून दिल्याबद्दल " **प्रभात फिल्म कंपनी, कोल्हापूर** " यांचा व इतर फोटोबद्दल **श्री. कुळकर्णी देवरुखकर** त्याचप्रमाणें फोटोचे ब्लॉक सुबक केल्याबद्दल श्री. **वागळे** आर्टिस्ट, मुंबई, ब्लॉक छपाईबद्दल " **लक्ष्मी नारायण प्रिंटिंग प्रेस** व पुस्तकाची छपाई सुबक व अत्यंत लौकर करून दिल्याबद्दल **मुंबईवैभव प्रेस** यांचा मी आभारी आहें.

पुस्तकाचे प्रकाशक माझे स्नेही श्री. **लांजेकर** व **जोशी** यांनीं हौसेनें पुस्तक प्रकाशनाचें काम घेतलें याबद्दल व माझे जुने स्नेही श्री. **शंकरराव टिळे** यांनीं या कामीं निरपेक्ष मदत केल्याबद्दल त्यांच्या त्या गोड ऋणाचा उल्लेख करण्यापेक्षां तें मुखांत ठेवणेंच अधीक बरें !

नाटकाचा प्रथम प्रयोग **ता. २४ माहे आक्टोबर १९३०** रोजीं रात्रौ **कोल्हापूर** येथें **पॅलेस थिएटरांत देशबंधुनें** करून लोकादरास पात्र केला. यापुढेंही जनदेवता आजपर्यंत प्रमाणेंच या माझ्या कृतीवर कृपादृष्टी ठेवील असा भरंवसा वाटतो.

मुंबई.<br>एल्फिन्स्टन थिएटर,<br>ता. १।६।३१

रसिकांचा सेवक,<br>**शांताराम गोपाळ गुप्ते.**

# समर्पण !

खरा निर्दोष आनंद सौख्यसंन्यासानें दुसऱ्याकरतां केलेल्या स्वार्थत्यागांत
असतो ! दुसऱ्यांच्या सुखाकरतां, स्वतःच्या संसाराचें होमकुंड-
करून, पतीला प्रीतीचा " **सवता सुभा** " आनंदानें
उभारू देणारी कुणी अभूतपूर्व स्वार्थत्यागी
असेल कां ? असेल तर त्याच व्यक्तीला
हा " **सवता सुभा** " सादर
समर्पण ! !

—**शांताराम.**

लौकरच रंगभूमीवर येणार!

श्री० शांताराम गोपाळ गुप्ते

कृत

संगीत

# धनुर्धारी

अर्थात्

# द्रौपदी-स्वयंवर

यांत प्रेम, शील आणि संपत्ति यांतील लढा अत्यंत

नाजूक रीतीनें सोडवला आहे.

म्हैसूर दसरा एक्सिबिशनमध्यें 'मेरिट सर्टिफिकेट'
मिळविणारे

## लोणच्याचे पहिलेच कारखानदार.

# व्ही. पी. बेडेकर आणि सन्स.

आमचेकडे सर्व जातींचे उत्कृष्ठ मसाले, लोणचीं, मुरंबे,
पापड, चटण्या, मेतकूट वगैरे माल नेहमीं ताजा
व स्वच्छ असून घाऊक आणि किरकोळ
विकत मिळतो. एकवेळ ऑर्डर देऊन
खात्री करा.

## व्ही. पी. बेडेकर आणि सन्स.

मुगभाट, गिरगांव–मुंबई

**ब्रँच नं. १.**
ठाकुरद्वार नाका,
मुंबई.

**ब्रँच नं. २.**
बी. बी. सी. आय्. रेल्वे
स्टेशन समोर, दादर, मुंबई.

९३८८
९०१९
वा. ६४०

# सवता सुभा.

## अंक १ ला.

### नांदी.

[ रागः हमीर, मत्तताल. ]

हा करि विलास प्रभुवर प्रियकर नटवर
शिव अभिनव-कृति-शुभ-प्रकाश ॥ ध्रु० ॥
शिरिं शशांक ॥ मृदु-प्रकाश; ॥
करिं विलोल ॥ उरग-पाश; ॥
सकल-काव्य-रति-कान्त गौरिपति ! ॥
दे अभया, पदनत जनांस ॥ १ ॥

### प्रवेश १ ला.

[ स्थळः सातारा. देवीचें देऊळ, शेवंता गौळण गुणगुणत आहे.—मागाहून बकुळा येते. ]

**शेवंताः**—गवळण राधाबाळी ॥ कन्हय्या ! धाव ही
घाबरि झाली ॥ १ ॥

**बकुळाः**—हें काय शेवंताबाई—मघापासून मी पाहते, एकसारखी तुम्ही वोटकडं टक लावून तेंच तेंच गौळणीचं कडवं गुणगुणत आहात. !—आज दसऱ्याला स्वारी—

**शेवंताः**—होय बरं बकुळा; धनी मुलुखगिरीवर गेले म्हणजे जीव कसा होतो हें तुला कसं समजणार ?

**बकुळाः**—तर तर ! मला कसं समजणार तें ? मी कां स्त्री आहे ?

**शेवंता:**—तसं नव्हे ग–

**बकुळा:**—मग कसं हो ?

**शेवंता:**—बकुळा, आज दसऱ्याचा दिवस; धनी घरीं असायचे; यावेळीं शिलंगणाला बाहेर पडायचे;–पण आज ?–शाहू साताऱ्यावर येणार म्हणून ती बातमी काढायला आई महाराजांनीं धन्यांना मुलखीं पाटवलं ! पाखराच्या डोळ्यानं धन्याच्या वाटेकडं डोळा लावावा, दूरच्या घोडदौडीनं धनी आलेसं वाटून आनंदानं उतावळा जीव नाचूं लागावा; नी शेवटीं डोळ्यांतलीं आनंदाचीं आसवं निराशेनं गळून पडावींत–हेंच आपलं भाग्य !

**बकुळा:**—पण आतां तर तुम्ही अगदीं प्रेमांत आला होतात ! कुणी जर तुम्हाला आडून आतां पाहिलं असतं–तर–तर सर्जेरावशींच बोलत आहात कीं काय–

**शेवंता:**—खुळी ग खुळी !–नी म्हणे मीपण स्त्रीच आहे ! स्त्री असून स्त्रीहृदय माहीत नाहीं तुला ? पतीची उत्कंठा लागलेल्या जिवाला, कल्पनेच्या कुंचलीनं तिचा पती तिच्या समोर उभं करतां येतो इतकंच नाहीं–तर त्याच्याशीं तिला हसतां येतं, खेळतां येतं, बोलतां सुद्धा येतं–समजलीस ?

[ रागः—मालगुंजी. त्रिवट ]

**प्रणयराग सखिजनां रमवि जंव ॥**
**नुरवि भान लव; भाव दावि नव ॥ ध्रु० ॥**
**बोल जिवाचा ॥ श्रवणिं मृदु वदत ॥**
**नयन-कला पति मनीं रमत नित ॥–**
**काम सुचे नच सुचे प्राणगत ॥ हृदय–सखा**
**करी खेळ नवोनव ॥ १ ॥**

**बकुळा:**—ही नाजुक कुसरी आम्हां रानवटांना काय माहीत ?–अगबाई, पण प्रतिनिधीच आले.—शेवंताबाई, मंडळी जमूं लागली शिलंगणाला.—चला आंत—

**शेवंता:**—बकुळा–तूं हो पुढं. कां कुणाला ठाऊक, धनी इतक्यांत येणार अशी हुरहुर वाटते !

**बकुळा:**—मग बसा हो.—सारखी नजर लावून बसा वाटेकडं— [ जाते. ]

**प्रतिनिधी:**—( प्रवेशून ) कोण ? शेवंता ? कुणाची वाट पाहातेस ? आजच्या दसऱ्याच्या मुहूर्तानं, घरधनी स्वारीशिकारीला गेला–त्याला सामोरी उभी आहेस वाटतं ?

**शेवंताः**—सरकार, पोरीला लाजेच्या बोलानं कां गोंधळून टाकावी उगीच ? दसऱ्याच्या मुहूर्तानं स्वारीवरच जाण्याचा प्रसंग मराठी शिलेदारांवर आला आहे !—बालराजांचं राज्यारोहण राहून—दौलतीचे धनी ठरवायचा काळ आज कां यावा ?

**प्रति०**—फिकीर नाहीं !—मोंगलांनीं शाहू राजांना मोकळे सोडून, मराठ्यांच्या—एकींत फूट पाडण्याचा हा मुत्सद्दी डाव टाकला आहे. सेनासागर महत्वाकांक्षी अलमगिराला, अव्याहत चौदा वर्षं झगडून जी मराठी दौलत बुडवतां आली नाहीं, ती या दुहीच्या डावांत बुडवण्याचा, हा हल्लींच्या मोंगली मुत्सद्यांचा डाव आहे हें आम्हीं जाणून आहोंत—

**शेवंताः**—पण शाहूराजे थोरल्या धन्यांचे वारस ठरले तर—सरकार पेंच बिकट नाहीं कां येणार ?

**प्रति०**—हें आम्ही जाणून आहोंत; आणि शाहूराजे जर शंभुराजांच्या नांवानं, ताराऊराजांच्याकडं आईच्या दृष्टीनं पाहून, दौलतीचा बोज राखतील, तर 'गादीचे मालक' म्हणून ताराऊराजा केव्हांही त्यांना सामोरीच होतील !

**शेवंताः**—पण शाहूंचा इरादा ?

**प्रति०**—उघडच दिसतो. भीमेपार ठाणं देऊन सैन्याची जमवाजमव कशाकरतां ? मराठी गादी मोंगलांच्या मोहबतीवर जगवण्याचा, थोरल्या महाराजापासून कुणी यत्न केला नाहीं, तीच गादी आज मोगलांच्या जोरावर शाहूराजे मिळवूं पाहतात ! शंभुराजांनीं दौलतीच्या इतमामापायीं, मराठ्यांच्या अब्रूकरतां आत्मदान केलं, त्याच सिंहाचा हा छावा—चौदावर्षांच्या मोगली सहवासानं आज मराठपण विसरून—

**खंडोबाः**—( प्रवेशून ) नका, प्रतिनिधी, भलत्या बोलानं थोरल्या राजांच्या शीलाला बोल लावूं नका ! राजांनीं मांडला डाव हूडपणाचाही असेल ! मोगलांच्या बंदिवासांत चौदावर्षं बेनिगा राहिलेल्या राजाला व्यवहारी जगाचा पाचपेंच राहिला नाहीं, तर त्याचा तोल मासाहेबांनींच नको कां सावरायला ?

**ताराऊः**—( प्रवेशून ) कोण-कोण मुत्सद्दीपणाचे तारे तोडीत आहे ते ? खंडो ? अस्सं ? आम्ही दौलतीच्या मोहानं शाहूराजांशीं दावा धरतो असंच म्हणाना खंडो ! चौदावर्षं हाडांचीं काडं करून, मोगलांनीं चौफेर दंगल मांडली असतांना, तुमच्या सारख्या बहाद्दरांच्या मदतीनं मातीला मिळालेली मराठदौलत, पुन्हां संपादन केली,—

स्वारीच्या पायीं छत्रपतीचा मुकुट चालून आला असतांना दूर झुगारून, याच शाहूच्या-नांवानं मंचकारोहण केलं, पण गादीला पाय लावला नाहीं, तें मराठदौलतीच्या आशेनं ! खरं ना ?

**खंडो०**—सरकार, कसूर माफ–

**ताराऊः**—हे 'कसूर माफीचे' धडे तुम्हां कलमबहाद्दर मुत्सद्यांना नेहमीच पाठ असतात !

**खंडो०**—आईसाहेबांनीं पिकल्या केसांचा मुलाहिजा धरला नाहीं, तरी गादीच्या चाकराला त्याचा राग नाहीं ! खंडो कलमदानी कारकून तसाच तरवारीचा शिपायी होता हें मी सांगायला नको ! राजाराम राजांची कारकीर्द याचा भरपूर पुरावा देईल !

**ताराऊः**—मग आजच आमच्या विरुद्ध आपल्या बुद्धीचा तोल कां झुकावा ? तोतया शाहूला मारला;—आजही आम्ही तोच हुकूम करूं असं कां चिटणीसांना वाटलं ?

**खंडोः**—तसा सरकारचा हुकूम नसला तरी दौलतीच्या कल्याणाकरतां हा शाहू खोटा ठरला तर अलबत मारूं—पण—

**सर्जेरावः**—( प्रवेशून )—पण—पण काय ? सरकार, सरकार मराठदौलतीचं नशीब फिरलं ! सातारची गादी आपसांतल्या यादवीनं, स्वकीयांच्या रक्तांत रंगून जाणार असाच दैवाचा खेळ दिसतो.

**शेवंताः**—म्हणजे धनी ?

**ताराऊः**—सर्जेराव, उघड बोला. शाहूचा काय इरादा ? ताराऊ स्त्री असली तरी भलता अपमान प्रत्यक्ष पोराकडूनही आम्ही सहन करणार नाहीं !

**शेवंताः**—तरी माझा उजवा डोळा लवला कां म्हटलं ?—गादीचे शिलेदार आपण; तरवारीच्या धारेशीं आपलं नशीब बांधलेलं ! नशीब फिरलं म्हणून इमान फिरूं दिलं नाहीं म्हणजे झालं !

**सर्जे०**—इमान शाबूद राखतांना गर्दन उतरली तरी बेहत्तर ! आणि म्हणूनच शाहूराजांनीं दाखवलेलीं आमिषं झुगारून आईसाहेबांच्या पायीं धांव घेतली !—सरकार हा निर्वाणीचा खलिता शाहूनीं आपल्याला दिला !—परसोजी भोंसले, निंबाळकर, शिंदे दौलतीचे दावेदार झाले—

**प्रतिनिधीः**—काय ? आमचे सरदार शाहूला मिळाले ?

**ताराऊः**—[ खलिता वाचून ] अस्सं काय ?—वाचा खंडो, भावोजींच्या पुत्राचे, आम्ही ज्याला दुसरा शिवाजी म्हणून मानतो–त्या आमच्या सावत्र मुलाचे हे खलित्यांतले शब्द वाचा ! " आम्ही येतों—गादी खाली करून ठेवा "—चौदा वर्षं दौलत सांभाळून बोज वाढविला—ते आम्ही चोर; आणि चोरांच्या सल्यानं आमच्याशीं बेकदर दावेदारी मांडू पाहणारे नवे हे–हे साव ! खरंना ?–आमचा कोणता मान राजे ठेवूं पाहतात, म्हणून जिव्हाळ्यानं आम्ही त्यांच्याकडं पहावं ? बुद्धिहीन कुत्रा सुद्धां, धन्यानं बेगुन्हा सजा केली तर डंख करायला धावतो,–मग आम्ही जित्या अन्नावर पोसलेले,–मानी स्वातंत्र्यांत जगलेले–हा अपमान आम्ही कां सहन करावा ?

**खंडो०**—पोराचा अपराध पोटांत–

**ताराऊः**—बस्स; लढाईच्या मैदानावर उभं राहून आव्हान देणाऱ्यांची मनोवृत्ती न ओळखण्याचा नादानपणा आम्हाला शिकवूं नका ! पोराच्या नात्यानं आमच्या वडीलकीचा मान राजे थोडा जरी राखते, तरी प्रतापी धन्यांच्या पायांला स्मरून, आम्ही दौलत त्यांच्याच स्वाधीन केली असती ! मराठी कर्त्या मुत्सद्यांचा नी त्यांचा मेळ आम्ही जमवून दिला असता !–पण हा उग्र उद्दामपणा कर्त्या कर्त्यांचीं डोकीं मारून, पुन्हां शंभुराजांची कारकीर्द महाराष्ट्रांत आणल्याशिवाय राहणार नाहीं !–हा मोंगली अन्नाचा गुण–

**सर्जे०**—सरकार, तावडतोब कांहीं तरी मनसुबा मुकर केला नाहीं तर प्रसंग बाका येईल ! दरियाच्या भरतीप्रमाणं चारी दिशेनं, सैन्य शाहूकडं गोळा होत आहे ! शाहूनं इनामांची नी देणग्यांची नुसती खैरात चालवली आहे.

**प्रति०**—सरकार, रणांगणावर उभं राहिल्यानंतर नात्या गोत्यांचा विचार करायचा नसतो ! कौरवपांडव एका रक्ताचे, पण रणांगणावर हा विचार त्यांना ठेवतां आला नाहीं.

**ताराऊः**—पण पंत, आम्ही दौलतीच्या मोहानं हा वाद मांडला, असंच लोक म्हणणार ! आमचा दुलौकीक !–अरेरे–आमच्या यातना, आमचे अपमान लोकांना कसे दिसणार ?

**शेवंताः**—सरकार, जनता नेहमींच आंधळी असते ! नी आंधळ्याचा न्याय विचारी मनाला, परिस्थितीचा विसर पाडायला समर्थ असतोच कुठं ?

**ताराऊः**—ठीक आहे;-प्रतिनिधी, धनाजी वगैरे सारे सरदार हुजूर तावडतोब बोलवा. त्यांचा विचार आम्हांला घेतला पाहिजे! चिटणीस, साऱ्या किल्लेदारांना सक्त ताकीदीचीं पत्रं जाऊं द्यात कीं आमच्या हुकमाशिवाय शाहूंना कुणीही मदत देतां कामा नये—

**खंडोः**—सरकार-

**ताराऊः**—खामोष, दौलतीचे चिटणीस आहात! खाल्या मिठाला नी केल्या चाकरीला विसरूं नका! प्रतिनिधी, आजचा शिलंगणाचा बेत रहीत करून, आताच्या आतां भवानीच्या समोर, दसऱ्याच्या मुहूर्तानं स्वारीचा बेत कायम होऊं द्या-जा. धनाजी वगैरे सारे सरदार तावडतोब घेऊन या-त्यांना सारी हकीकत उलगडून सांगा-

[ प्रतिनिधी मुजरा करून जातात. ]

**खंडोः**—सरकार, पण-सर्जेरावसारख्या एका उसळत्या रक्ताच्या शिलेदारानं दिलेल्या वातमीवरून, एकदम निकरावर येऊन, आईसाहेबांनीं जो लढाईचा मनसुबा केला, तो या खंडोच्या पिकल्या बुद्धीला पटत नाहीं!

**ताराऊः**—साठी बुद्धी नाठी होते! कैलासवासी राजांच्या अमदानींत मुत्सद्दे-गिरीला फार ताण पडला त्यामुळं चिटणीसांची विचारशक्ति नाहींशी झालेली दिसते!—चिटणीस, केला मनसुबा मुक्रर आहे! सर्जेरावनं दिली वातमी खरी असो कीं खोटी असो;-शाहूराजांनीं आमच्या वडीलकीचा मान न ठेवतां, एकदम लढाईचा चंग बांधला, तर त्याचं उत्तर, त्याच तोलानं आम्हांला दिलं पाहिजे! आपुलकीची मर्यादा ओलांडल्यानंतर नात्यागोत्यांचा विचारच रहात नाहीं—

**खंडोः**—मर्जी आपली-

**ताराऊः**-' मर्जी आपली ' म्हणून नाहीं भागणार चिटणीस! तुम्हांला जातीनं या मोहिमेवर जायला पाहिजे! आणि उसळत्या रक्ताचा सर्जेराव, तुमच्याबरोबर तुमची खात्री करून द्यायला येईल कीं, शाहूराजे जिव्हाळ्याच्या नात्यानं आमच्या-कडं पहात नाहींत! ( प्रतिनिधी, धनाजी वगैरे सरदार येऊन मुजरा करतात. ) सेनासागर धनाजी, प्रतिनिधी, सरदारहो,-शाहूराजे, कैलासवासी संभाजीराजांचे पुत्र, आमच्याशीं दावेदारी धरून मुकाबल्याच्या तयारीनं उभे आहेत! आणि या यादवीनं दौलत बुडवूं पाहतात!-आज या कुलस्वामिनी भवानीला साक्षी ठेवून-" दौलतीशीं-बेईमान होणार नाहीं "—म्हणून आणभाकीचे हे विडे उचला-

**प्रतिनिधीः**—साताऱ्याची राजवट मातीला मिळाली ती चौदावर्षांच्या तपश्चर्येनं, ज्या कैलासवासी राजारामराजांनीं पुन्हां राजतेजानं हसवली, लोकसंग्रहानं नटवली त्याच राजारामराजांच्या गादीशीं इमानानं वागतांना, देहाचा चिखल झाला—तरी पुरवला—[ विडा उचलतो व मुजरा करतो. ]

**ताराऊः**—शाबास प्रतिनिधी,–हा निष्ठेचा मुजरा राणी ताराऊच्या पायीं रुजूं नसून, माता भवानीच्या पायीं रुजूं आहे हें विसरूं नका !

**सर्जेरावः**—विडा उचलणारा हात कलम होऊन, मुजऱ्याकरतां झुकलेली गर्दन उतरून पडेपर्यंत सर्जेराव आईसाहेबांचीच चाकरी करील ! ! ( विडा उ० )

[ रागः दुर्गाः त्रिताल ]

**यशनाश हा झाला ॥ ढळला वीर कृतिला ॥**
**मुकला ॥ स्वकुला ॥ प्रभुला ॥ ध्रु० ॥**
**जरि राजा ॥ देशसुकाजा ॥ शुभप्राणदान ॥**
**पुण्य जाण; प्रभुच्या पदिं जन गेला ॥ १ ॥**

**शेवंताः**—( बाजूस ) पंचप्राणांचीं फुलं उधळून द्यावींत यावेळीं स्वारीवरून ! पण–प्रीतीची भावना बोलापेक्षां डोळ्यांतच अधीक तरंगते !–

**ताराऊः**—खंडो–कां, स्वस्थ कां ? सेनासागर धनाजींनीं दूधभातावर हात ठेवून काल क्रिया केली;–मग तुम्हीच स्वस्थ ? दौलतीचे चाकर तुम्ही ! खाल्या दूधभाताला जागण्यांत कमीपणा वाटतो तुम्हाला ?

**खंडोः**—सेनापती साथी झाल्यानंतर कारकुनाची काय जरूरी मासाहेब ? खाल्या मिठाला जागण्याचं व्रत, बापजाद्यांनीं थोरल्या महराजांच्या अमदानीपासून घालून दिलं; जिवाच्या कराावर तें पाळणं हेंच आमचं ब्रीद ! तरवारीच्या धारेशीं आमचं इमान रंगलेलं ! या नागवेलीच्या रंगानं जबान रंगविण्यांत विशेष काय ?

**ताराऊः**—मग इमान देत नाहीं तर ?

**खंडोः**–इमान केव्हांच दिलं आहे.–

**ताराऊः**—खंडो, केल्या सेवेचा भलता मोबदला आम्हाला देणं भाग पडेल–

**खंडोः**—खुशाल-खुशाल पेषकब्ज करा ! आईसाहेब, निमकहलाल चाकरीचा शेवट, या पिकल्या केसांचा मान जर आपणांकडून असाच राखला जाणार असेल

तर खंडो कोणत्याही मरणाला तयार आहे ! घाल त्या सजेचा आणि कराल त्या हुकूमाचा ताबेदार, आपल्यासमोर, भवानीच्या साक्षीनं गर्दन झुकवून उभा आहे ! निमकहराम असेन तर गर्दन उतरून भवानीच्या पायीं रक्ताचं रंगण उडूं द्या ! त्या नागवेलीच्या रंगानं जबान रंगवण्यापेक्षां, खंडोच्या रक्ताचा टिळा लावून सेना बाहेर पडेल, तर ती आणभाक यापेक्षां अधीक कडवी होईल ! !

**ताराऊ:**—खंडो, खंडो—आम्ही बिनादिलाचे कसायी आहोंत असं कां तुम्हाला वाटतं ? तुम्हाला पेचकब्ज करण्याचा आमचा इरादा असता, तर इतका विरोध आमच्या मानी मनाला मंजूर होताच ना ! तुमच्यावर आमचा भरंवसा, एवढ्याचकरतां जिवाचे कलीजे म्हणून आणभाकेला गुंतवून तुम्हांला या मोहिमेवर पाठवायचा आमचा हेतु होता !–ठीक–धनाजी, प्रतिनिधी, तुम्ही एकदम फौजबंद होऊन शाहूवर चालून जा ! शाहूराजे मराठ्यांचे छत्रपती आहेत; पण छत्रपतीच जर न्यायाचा नी प्रजेचा द्रोह करूं लागले तर प्रजेनं सुद्धां छत्रपतींचा नतीजा राखतां कामा नये ! खालसा केलेल्या दौलती परत देऊन शाहू-राजे न्यायाला पायीं तुडवीत आहेत !–दौलतीच्या मोहानं स्वकीयांशीं विरोध करण्याचा राजांचा हेतु असेल, तर ताराऊ त्यालाही तयार आहे हें राजांना समजूं द्या—

**प्रतिनिधी:**—हुजूरआज्ञेप्रमाणं फौजबंद होऊन आम्ही राजांच्यावर चालून जातों, पण धनाजी, खंडो–दिलं इमान कायम ना ?

**खंडो:**—कृतीआधी शब्दांची सरवत्ती उडवण्याचा शिरस्ता खंडोला माहीत नाहीं !

**ताराऊ:**—तर मग खंडो, तुम्ही जातीनं या मोहिमेवर गेलं पाहिजे ! लक्षांत ठेवा, तुमच्याच कुळीच्या कायस्थांच्या इमानानं रक्ताचा फेर फिरवून दौलतीला बरकत आणली आहे !–धनाजी, ‘ मराठ्यांचे सेनासागर चाकरीला चोर ठरले ’ असं होऊं देऊं नका ! जा–आपल्या तयारीला लागा—

( धनाजी, खंडो वगैरे सरदार मुजरे करून जातात. )

प्रतिनिधी, ताराऊच्या करड्या नजरेखालीं दबून लवणाऱ्या यांच्या इमानाचा फारसा भरंवसा धरूं नका ! यांच्या हालचालींवर बारीक नजर ठेवा; पण जाणीव मात्र किंचित् सुद्धां होऊं देऊं नका !

**प्रतिनिधी:**—आईसाहेबांनीं निश्चिंत असावं ! प्रतिनिधी विजयी होऊनच साताऱ्यांत येईल !

( ता... १२०)

**ताराऊः**—आणि आपल्याला अभिमानी अपजय मिळाले तरी ताराऊला त्याचा खेद वाटणार नाहीं ! दैवीं असेल तर " सवता सुभा ' उभारू, मानानं मरू, पण हें अपमानाचं जीवन नको !–जा–

**प्रति०**—आईसाहेबांची कृपा चाकराला यशस्वीच करील !

**ताराऊः**—अंबाभवानी तुमचं रक्षण करील—( प्रतिनिधी मुजरा करून जातो. ) शेवंता–

**शेवंताः**—आईसाहेब.

**ताराऊः**—पोरीच्या प्रीतीनं आजदिन वागवलं ! चोळीबांगडीचा साजशिणगार चढवला तुझ्यावर, पण आज शेवंता, आपलं सर्वांचंच नशीब फिरल्याप्रमाणं दिसतं ! सर्जेराव लढाईवर जाणार, आणि तुझं सौभाग्य आम्ही उघड्या डोळ्यांनं असं धोक्यांत घालणार !–पण शेवंता, राजाची कीर्ती निष्ठावंत चाकरांच्या मूर्तीवर अवलंबून असते !

**शेवंताः**—धनी, असल्या विचारांनं मनाला लाऊन कां घ्यावं उगीच ? पायीचे पाईक आम्ही ! धन्याकारणीं देह पडला तर देहाचं सोनं झालं ! मरणाच्या मोहिमेवर प्राणांचा प्यारा पाठवतांना ऊर भरून आला, डोळे आसवांनीं आंधळे झाले, तरी शिपायाची राणी ब्रीदाला बाध आणणार नाहीं ! सरकार, शिलेदाराच्या राणीचं बाशिंग नेहमींच तरवारीच्या धारेशीं बांधलेलं असतं ! साखरझोपेच्या सुखांत, कधीं बाशिंगाची गांठ कापली जाईल तें कळायचं सुद्धां नाहीं !–

[ रागः बागेसरी, त्रिवट. ]

**करि वीर-जाया ॥ आनंद ॥ लागली रीत ! ॥ धृ० ॥**
**सति अंगना ॥ मुकतां पतिला ॥ लव ना ॥**
**छलना ॥ मनीं तियेला ॥ खलकाल हा दापिता ॥**
**भयरतां; ॥–रीत ॥ १ ॥**

**ताराऊः**—ताराऊचं भाग्य मोठं म्हणून असलीं तुम्हासारखीं देवगुणीं रत्नं आमच्या प्रभावळींत चमकतात ! सर्जेराव, विश्वासांतले नेकजात तुम्ही; म्हणून तुम्हाला बजावून सांगतें कीं यावेळीं जिवाची पर्वा न करतां, दौलतीचे दावेदार धारेशीं बांधा ! खंडोवर नजर ठेवा; धनाजी मराठ्याचा बच्चा असला तरी इमानाचा सच्चा नाहीं हें जाणून रहा ! तुमच्यासारख्या चार दोन लोकांच्या आधारावर ही मोहीम ताराऊला जिंकायची आहे–हें विसरूं नका !–

**सर्जे:**—ऐकलंस शेवंता ? आईनं मृत्यूच्या मार्गावर चालून जायची आज्ञा केली ! माझ्या मागं माझ्या शेवंताचं कसं होईल ही भीती नाहीं वाटत मला ! पण शेवंता–हा महाराष्ट्राचा प्राण कुणाहातीं निरवायचा ? या माउलीच्या मंदिराचा कलता कळस कुणी सावरायचा ?

**शेवंता:**—धनी, शेवंताला इतक्या दिवस उरापोटीं बाळगून तिला ओळखली नाहींच ना ? शिलेदार, शेवंता सर्जांची कीर्ती आहे ही खूणगांठ ठेवा बरं ! शेजेची सोबतीण, धन्याच्या कीर्तीला काळं फासून गेली असं नाहीं होऊं द्यायची ! आपण निर्धास्त रहा. पंचप्राणांची सांड करीन पण आईसाहेबांच्या केसालाही धक्का लागूं द्यायची नाहीं !

**ताराऊ:**—अहाहा-बेटा, बेटा, धनी आणि चाकर हें नातं विसरतं तें या वेळीं–आणि जिवंत प्रीतीची उसळी येऊन पोटीं कवळून धरावसं वाटतं तेंही याच वेळीं ! ( भेटतात )—पण या टीचभर हृदयाची पेटी, असलं अस्मानी जवाहीर कसं जपून ठेवणार ?–किती दुर्दैवी आम्ही कीं पोरीच्या कपाळींचं सौभाग्य आम्ही होऊन संकटांत–


**सर्जेराव:**—नका–मायबाप, डोळ्यांतून हीं मोतीमोलाचीं आसवं अशी मातीला मिळवूं नका ! सर्जांची ही एक शेवंता जाईल पण दहा सर्जाशेवंतांची आई सुखी राहील !

**ताराऊ:**—आणि असल्या–स्वकीयांच्या रक्तामांसांत रंगलेल्या सुखांत–ताराऊनं रंगून जायचं ?

**सर्जेराव:**—आईसाहेब, राजाचं हृदय नाजुक भावनांच्या फुलानं फुललेलं त्याच प्रमाणं प्रसंगीं कठोरवृत्तीच्या फत्तरांनीं खचलेलं असावं लागतं ! आजचा काळ गेला–कीं आई, खुशाल–खुशाल या लेकरांच्या मेल्या देहावर तुझ्या प्रीतीची रसगंगा वाहूं दे ! तोच आमचा अमरपट्टा !

**ताराऊ:**—आणि म्हणूनच छातीवर दगड बांधून, जिव्हाळ्याचा उमाळा आंतल्या आंत कोंडून हा शेवटाचा निरोप द्यावा लागतो ! आमच्या भोंवतीं हे खंडोधनाजीसारखे जर भुजंग नसते तर कां हा प्रसंग येता ?

**सर्जेराव:**—शेवंता, चौदा वर्षं बंदीखान्यांत राहिलेला सिंह सुटला आहे. आपपरपणा त्याला राहिलेला नाहीं ! तुझा हा बिनीचा शिपाई गारद–झाला तर आईसाहेबांच्या कल्याणाची वार्ता तुझ्या तोंडीं ऐकायला, स्वर्गाच्या दारांत–तुझा शिलेदार



**ताराऊः**—पण या टीचभर हृदयाची पेटी असलं अस्मानी जवाहिर कसं जपून ठेवणार ?

[ अंक १ ला प्रवेश १ ला ]

तिष्ठत राहील !–मामासाहेबांना–अंतर नाहीं ना देणार ?–कशावरून ?–माझ्या मोहानं—

**शेवंताः**—आपला मोह तोडला एवढंच पाहिजे ना ?–हा घे–आईसाहेबांच्या नांवानं–हा चुडा इथंच उतरून टाकते !–नी सांगतें कीं शेवंता सर्जाचा गौरवच करून मरेल ! ! ( चुडा उतरते. )–झालं आतां ?

**ताराऊः**—शेवंता–शेवंता–कुठं ठेऊं तुला ?–आमचें हें वैभव काळ चोरट्या पावलीं, आमच्या प्राणांबरोबर चोरून नेईल कीं काय, म्हणून भीती वाटते !

[ रागः लघुंटध्वनि. त्रिवट. ]

**कटुयोम लेखी भालां ॥ काळ हा दया ना त्याला ॥ ध्रु ॥**
**रसना न बोले ॥ जग शून्य झाले ॥ अशुभा ॥ सुतादैवा ॥**
**लाऊं सती–टिळां ? ॥ १ ॥**

सर्जेराव, या कपाळकरंट्या ताराऊच्या हातीं कुंकू लावलं तर–

**सर्जेरावः**—आपल्या हातीं माझ्या लक्ष्मीच्या कपाळीं मळवट भरला तर आणखी कोणतं सौभाग्य पाहिजे ? प्रत्यक्ष राज्यलक्ष्मीनं लावलेला टिळा पुसून टाकण्याची काळाची सुद्धां छाती नाहीं !–शेवंता, या महाराष्ट्रमाऊलीच्या हातीं कुंकूं ल्यालीस, कीं प्रत्यक्ष जगदंबा भवानीनं तुला चुडेदान केलं असंच समज !

**ताराऊः**—साऱ्या सौभाग्याचा, राष्ट्रीय मांगल्याचा संचार यावेळीं आमच्या रोमरोमांत होऊन हें कुंकू तुला लावीत आहोंत ! ( कुंकूं लावते ) शेवंता, महाराष्ट्राच्या राज्यलक्ष्मीची पुण्याई आजच संपली नाहीं, कीं आंतड्याला पीळ पडून दिलेला आशीर्वाद सुद्धां खोटा ठरेल !–चला सर्जेराव, भवानीचा बोलभंडार उचला, नी ताराऊच्या हातची शेवटची दहीसाखर घ्यायला आमच्या समोर हजर व्हा–(जातात.)

**सर्जेरावः**– शेवंता, ध्यानीं राख कीं, मेलेला सर्जेराव जिवंत होईल, पण आईच्या आशीर्वादाला बाध येणार नाहीं ! मायभवानीच तुमचं रक्षण करील !

[ रागः सुहेसुग्राही. त्रिवट ]

**शरणावनां ॥ जानिता हे ॥ सदय भवानी ॥**
**सतत या भुवनीं ॥ हो वालि ॥ ध्रु ॥**
**जय पावत जन ॥ व्यसनिं सुखावत ॥**
**प्रभुकर वसे, धीरदाया कालिं ॥ १ ॥** [ जातो ]

**शेवंताः**—गेला, माझ्या प्रीतीचा राजा गेला ! आणि नवीन चैतन्याची उसळी शेवंताच्या रोमरोमांत सणाणूं लागली ! प्रेमाच्या जादूनं दोन व्यक्ति पण एक शक्ति असा चमत्कार झालेला पहायला मिळत असेल कां ? नसेल तर, तर सख्या शिलेदार, तो चमत्कार शेवंता पहिल्याप्रथम करून दाखवील ! प्रीतीच्या रंगांत शेवंता इतकी रंगली आहे कीं सर्जेराव शेवंतापेक्षां निराळे आहेत असं वाटतंच नाहीं ! मैदानावरची आपली इच्छा, स्वयंप्रेरणेनं शेवंता इकडं पूर्ण करील–ही खात्री ठेवा !–मात्र जगदंबे, कर्तव्याची पूर्णता होईपर्यंत जीव कुडीला सोडूं देऊं नकोस ! !

[ राग तिलककामोद, त्रिवट ]

**द्या जनां वरदान ॥ नुरत भान; ॥ विनवित दासि पदाला ॥ ध्रु० ॥ जडे मनां व्याकुलता ॥ सतता ॥ तारि शौरि ! ॥ शांतिहीन बाला ॥ १ ॥**

—पडदा—

---

## प्रवेश २ रा.

[ स्थळः—अजिमतारा. बकुळा व दौलती प्रवेशतात. ]

**दौलतः**—खबरदार बकुळा, बाईल झालीस म्हणून भलत्या नादानं नाहीं चालणार दौलती ! शहाण्यांतले शहाणे–मुत्सद्यांतले मुत्सद्दी खंडोबा; त्यांनीं सुद्धां पगडी फिरवली ! मग मी असा वागतों म्हणून गजघंटेप्रमाणं ठणठणाट कां करतेस ?

**बकुळाः**—अकलेचे खंदकच पडलात कीं नाहीं ! खंडोबा फार तर कृतीनंच पगडी फिरवणार असतील, पण हा अवतार जर कां कुणी पाहिला तर–

**दौलतः**—मला आंत बाहेर दोन तऱ्हेनें नाहीं वागतां येत ! " बोले तैसा चाले " हा माझा बाणा आहे बकुळा–

**बकुळाः**—आतां पाऊलेंच तेवढीं वंदायचीं राहिलीं आहेत ! ही पगडीची कंगणी अशी जर कुणी पाहील, तर वेड लागलं म्हणून खाशांच्या कडून खोडा पडेल ना हातापायांत ?

**दौलतः**—नाकासमोर कुठंही वेळेप्रमाणं घुसायला हा दौलती तयार आहे

ना. ५४०

म्हणून हें पगडीचं सुकाणूं असं नाकासमोर वळवलं आहे! यापुढं ही पगडी म्हणजे मराठशाहीच्याच नव्हे तर साऱ्या दुनियेच्या अकलेची निशाणी होईल!–

**बकुळाः**—अशा वेषांतरानं अकलेची मोजदाद होती तर बहुरूप्याला दिवाणपद द्यावं लागलं असतं! अहो, कुणी पाहिलं तर तोंड काढतां यायचं नाहीं ना बाहेर? त्या शेवंताचा सर्जेराव पहा–साधा शिलेदार पण आईसाहेबांच्या गळ्यांतला ताईत झाला आहे!

**दौलतः**—मग त्या ताईतांत जाऊन वसावं असं कां तुला वाटतं? आपण झाला आहे आईसाहेबांच्या गळ्यांतला ताईत पण तो ताईत त्यानं बायकोच्या मंगळसूत्रांत ओवला आहे–समजलीस?–याला शहाणपण नाहीं म्हणत? देवानं दिलेल्या जिवाचं रक्षण करण्याकरतां वाटेल तें बचावाचं धोरण धरणं यांतच अकलेची करामत आहे!–आम्ही मेल्यावर आमच्या बायकांनीं काय—

**बकुळाः**—हां खबरदार कांहीं वेडंविद्र बडबडाल तर?

**दौलतीः**—आँ? नवऱ्यावर अधिकार? सख्या नवऱ्यावर अधिकार? मराठ्यांत ही चाल नाहीं! कुळंवी माळी असतों तर खुरप्यानं गळाच कापला असतां आतां! पण मी थोडा पुढं गेलेला शिपाई आहे!–उद्यां शाहूराजे–महाराष्ट्राचे राजे झाले तर–

**बकुळाः**—अस्सं–अस्सं! एकंदरींत ही पुढची तयारी आहे तर! बकुळा भोळी हेंच खरं–

**दौलतः**—आतां तरी कळलं तुझ्या अकलेचं भांडवल तुला? उद्यां शाहूराजे गादीवर आले तर मोगली रिवाजांत वाढलेल्या राजाप्रमाणं, तुझ्या बाबतींत, मला थोडा मनाचा उदारपणा दाखवायला तयार झालंच पाहिजे!–यथा राजा तथा प्रजा!

**बकुळाः**—पण आईसाहेबांच्या कानीं जर हें गेलं तर डोळ्यापुढं काजवे चमकतील काजवे!

**दौलतीः**—मग ही पगडीची कल्पना कशाला? आईसाहेबांचा काणाडोळा दिसलारे दिसला कीं दौलतीचा मनाचा मुजरा झालाच त्यांना!–आँ? हा कोण हिरवा तावूत? अजिमताऱ्यावर हें हिरवं निशाण कां?

**बकुळाः**—शेंडें नक्षत्र तर नाहीं ना हें? दसऱ्याच्या मुहूर्तावरच उगवलं अगदीं!

**दौलतः**—बकुळा, एकदम मकाण गांठ! हा प्राणी या देशाचा नाहीं दिसत!

**बकुळाः**—म्हणून इथं असायला काय हरकत ? तुम्हीच नाहीं ना हें कांहीं कारस्थान चालवलं ? त्याशिवाय तुम्हाला हो कसं कळलं कीं हा या देशचा नाहीं !—

**दौलतः**—हा तर्क आहे ! बुद्धीची उडी आहे ही—

**बकुळाः**—अस्सं–अस्सं; कावळा बसायला नी डांपी मोडायला एक गांठ पडली म्हणायची !—पण लक्षांत ठेवा, कांहीं फंदफिसाद माझ्या कानीं आला तर देईन सांगून आईसाहेबांना नी होईन मोकळी !

**दौलतः**—छेः तुझ्यासारखी बाईल म्हणजे अस्तनींतला निखारा ! केव्हां जिवाची राखुंडी करील त्याचा नियम नाहीं !—आलाच हा परदेशी भय्या–काय हो–कोण सरदार तुम्ही ? ( बरकत प्रवेशतो )

**बरकतः**—मै हूं बरकतखान !—

**बकुळाः**—छान–छान ! ही दौलत नी ही बरकत ! आतां मराठशाहीच्या भरभराटीला कांहीं वेळ नाहीं !

**बरकतः**—आपका नाम—दौलत ?

**दौलतः**—माझ्या घरधनणीनं उधळले ना माणिकमोती माझ्या नांवावरून !

**बरकतः**—क्या ? ये औरत आपका जनाना ? बहोत अच्छा–बहोत आच्छा

**दौलतः**—बहोत अच्छा ? अरे वारे सरदार !—माझी घरधनीण ही—

**बकुळाः**—म्हणजे लग्नाची वायको मी यांची—

**दौलतः**—आणि तिला बहोत आच्छा म्हणतोस ?

**बकुळाः**—बेशरम नाहींतर—

**बरकतः**—वैसा नहीं ! दौलत, ओ आपका जनाना ये बात बहोत आच्छा ! आमच्या देशांत—

**दौलतः**—म्हणजे ? तुमचा देश कोणता ?

**बरकतः**—( बाजूस ) या अल्ला !—ये क्या आफत गुदरायी ? ( उघड ) नहीं हमारे वाई प्रांतीं—शेखमिरासाहेबांच्या प्रांतांत—

**बकुळाः**—म्हणजे मोंगली देशांत—

**बरकतः**—हां, हां जी–दौलत–नाम क्या उसका ?

**बकुळाः**—बकुळा--

**बरकतः**—हां-बकुळाजान-मोंगली देशांत—

**दौलतः**—वाईप्रांत मोंगलांचा ? आईसाहेब तोफेच्या तोंडीं देतील कीं सरदार ? आहात कुठं ?

**बकुळाः**—अहो धनी म्हणजेच तो दिल्ली प्रांत! शाहूराजे आले, तो प्रांत! आले मात्र हे वाई प्रांतावरून-मिरासाहेबांकडून—

**बरकतः**—( बाजूस ) दिल्लीला एकही औरत इतकी मुलुखमैदान नहीं! देखतां देखतां गारद केला कीं मला! या शिपायाच्याच जनान्यानं जर माझे डोळे पहिल्याच सलामींत पांढरे केले तर खासा राणीच्या तावडींत—

**दौलतः**—कां-खानसाहेब-बोलत कां नाहीं ? आलात कुठून, काय काम ?

**बकुळाः**—अहो येवढंही नाहीं समजत तुम्हाला ? आले शाहूराजांच्या कडून, चालल्येत असेच कुठं तरी-नी आहेत तिसऱ्याच नादांत! इतके कसे हो भोळे तुम्ही ?

**दौलतः**—शहाण्या बायकोचा नवरा नेहमीं भोळाच असावा लागतो!—चूप रहा.—

**बकुळाः**—कां खान, कुठपर्यंत जायचं आहे ?

**बरकतः**—कबरीपर्यंत ! जबान खोलायला फुरसद नाहीं! बैसा कैसा जालीम जनाना ?

**बकुळाः**—इकडची जातच अशी—तिखट खान—

**दौलतः**—खान, तिच्याकडं लक्ष्य नका देऊं! बेशक खुल्या दिलानं बोला! कोण तुम्ही ? कां आलात ? कुठून आलात ? विश्वास पटत नसेल तर पगडीकडं पहा! झाडून मराठा कानांवर कंगणी ठेवतो; मी नाकासमोर लावली आहे! माझ्या-कडून दगा होणार नाहीं; दंगाही होणार नाहीं! "राजा कोण?" हें ठरवायच्या काळांतला मी एक स्वतंत्र मराठा आहे!

**बकुळाः**—म्हणजे यांना स्वतंत्र असं मतच नाहीं अजून!—वेळच आली तर उद्यां तुम्हाला सुद्धां फांशीं देतील बरं—

**दौलत**—चूप बैस, तिऱ्हाईत पाहुण्यासमोर आमच्या बायका जर अशा बेताल बडबडूं लागल्या तर आमची अब्रू चांगलीच उधळली जाणार!—सरदार, बोला लौकर उत्तर—

**बरकतः**—( बाजूस ) या दोन बोलघेवड्यांनीं जीव घामाघूम केला अगदीं ! ( उघड ) शिलेदार, सबूर जरा,–खंडोबा कारभारी कुठं राहतात तें तेवढं सांगा.–मी शेखमिराकडून आलों–कांहीं महत्वाचं काम आहे.

**बकुळाः**—( बाजूस ) हा खात्रीनं शेखमिराकडचा नाहीं ! चांगलं लक्ष्य ठेवलं पाहिजे याच्यावर–

**दौलतः**––खंडोबाकडं जायचं ? शेखमिराकडचे तुम्ही ?–अहो मग आमचेच ! चलाजी मग;–आत्तां नेतों ना ! पण काम झालं कीं दसऱ्याच्या भाजीभाकरीचा खाना खायला दौलतीकडंच आलं पाहिजे आं सरदार ! गांठ पहिली माझी पडली !–लक्ष्मी, सरदारांच्या करतां–जरा चुरचुरीत मावळी मसाला तयार कर–वरं कां ?

**बकुळाः**—( स्वगत ) पोटांत शिरायची हीच वेळ आहे ! ही संधि दवडूं नये. ( उघड ) छेः छेः जिभेच्या थोड्या सैल असलों म्हणून आम्ही मावळच्या राणी पाहुणचाराला कमी नाहीं हो पडणार ! !–धनी, लौकर–पाहुण्यांना घेऊन या बरं—( जाते. )

**दौलतः**––पाहिलांत सरदार आमचा हा राकट महाराष्ट्र ! एकएक चीज दगडाच्या घडणीची पण परीसाच्या करणीची सांपडते इथं––

पद.

**पहा देश हा महान ॥ गिरिकिल्ले याचा मान ॥ इथें शिपाई जवान ॥ हा देश मराठमावळा ॥ नवतीच्या लागती झळा ! ॥ ध्रु० ॥**

**इथं काळीकुळी जात ॥ लइ हाळवी जगांत ॥ इथं मर्द शिपाई फाकडा ॥ जागें होत गुणां सौंगडा रे ॥ रोकडा; ॥–हा उंच उंच वघणार ॥ कड्यांच्या पार ॥ करिल बेजार ॥ विसर जरि पडला जातिला ॥ १ ॥**

—जातात—

–पडदा उघडतो–



मराठ्यांचा राजा शाहू

## प्रवेश ३ रा.

[ स्थळ:–औरंगजेबाची कबर. शाहू प्रवेशतो. ]

**शाहू:**—इथं पाऊल टाकतांच आमची वृत्ति अशी बेचैन कां झाली ? औरंगजेबाच्या कबरीचं दर्शन घ्यावं म्हणून इथं पाऊल ठेवलं, आणि " राजा, बापाला विसरलास, बापाला विसरलास " असा खोल आवाज हृदयांत घुमूं लागला ! दख्खन दौलत घेण्याकरतां दिल्लीकरांशीं सलोख्यानं वागायचं आम्ही ठरवलं, हा आमचा मार्ग चुकला कां ? महाराजांनीं धर्माकरतां प्राण दिला पण अभिमान सोडला नाहीं; आम्ही दौलती करता बापजाद्यांचं मराठपण विसरलों असं सारी दुनिया म्हणूं लागली तर आम्ही काय उत्तर देणार ? ताराऊ आईसाहेबांचा विरोध आम्हाला पटणारा नसला तरी–दुनियेला रुचणारा वाटेल कदाचित् !–औरंगजेब, शंभुराजांना, बाबासाहेबांना जिवंत सोलणारा औरंगजेब, मराठ्यांचा दुष्मन औरंगजेब, साऱ्या हिंदुस्थानभर इस्लामचं हिरवं निशाण फडकावूं पाहणारा अलमगीर, आपल्या महत्त्वाकांक्षेबरोबर, या चारहाती चौथऱ्यांत गाडला गेल्यानंतर, बाबा, शाहूनं सूड कुणावर उगवायचा ? दिल्लीपतीनं आमचं राजेपण कबूल करून, मराठ्यांचा मोठेपणा मानला; महाराष्ट्राचा राजा विजयी झाला ! पण आमचा हा आनंद ताराराजांना सापत्नभावानं रुचत नाहीं ! दुनियेला पायीं झुकवूं पाहणाऱ्या पादशहा, स्वतः मरून शाहूला या यादवी करतां जिवंत ठेवण्यांत तूं जिंकलंस कीं—

[ कबरीमागें संभाजीची मूर्ती दिसूं लागते. ]

कोण ? कोण तें ?–बाबा–बाबासाहेब ?

**संभाजी:**—( पिशाचरूपांत) शाहू, संभाजीची अवलाद इतकी हिणकस कशी ? जा, संभाजीचा दुष्मन मातीला मिळाला, म्हणून संभाजी मेला असं समजूं नकोस ! मोंगलांचा मांडलीक महाराष्ट्राचा राजा होत नाहीं! मराठ्यांचा राजा, जिवंत जाळला, उभा सोलून काढला तरी राजेपण विसरत नाहीं येवढं तरी लक्षांत ठेव ! !–जा–जा—

**शाहू:**—मराठ्यांचा राजा राजेपण विसरला ? विसरला ? बाबा–माझा मार्ग चुकला कां ? बुद्धीच्या झुकांडीवर जय मिळवणं यांत सुद्धां पाप;—पण आपल्या शिपायी बाण्याला शाहूचा मार्ग कसा पसंत पडणार ?–माफ करा–बाबासाहेब माफ करा–[ मस्तक नमवितो. संभाजी अंतर्धान पावतो. ]

**खंडोः**––[ प्रवेशून स्व ]–काय–काय पाहतों मी ? शाहूराजा–आणि औरंगजेबाच्या थडग्यापुढं नमलेला? म्हणजे माझा मार्ग चुकला, शाहूचा कीं ताराराजाचा?

**शाहूः**––बाबा–कोण–कोण तूं ?

**खंडोः**––दख्खनदौलतीचा एकनिष्ठ चाकर !

**शाहूः**––आमच्याशीं विरोध करायला आलास ?

**खंडोः**––सरकार, आहे या स्थितीत राजांना कुणीही पाहील तर तो आपल्याशीं विरोधाशिवाय काय करणार ?–सातारच्या गादीवर हा असला मोगली चांद चढवायला कोणता मराठा पुढं होईल ?

**शाहूः**––पण असा कोण तूं जातिवंत मराठा ? आमचेही मार्ग सीधे नाहींत असं सुनावणारा कोण धाडसी ?

**खंडोः**––शंभुराजांपासून आजदिन मराठ दौलत ज्याच्या बुद्धीनं सावरून धरली तो खंडो ! सरकार, अलमगीरच्या कबरीच्या दर्शनाला मराठ्यांचा राजा गेला, असं जर महाराष्ट्राला कळलं, तर आजचा विरोध शतपट वाढल्याशिवाय कसा राहील ? त्यापेक्षां ताराराजांचा स्वार्थी पण सीधा करारीपणा बेशक पुरवला !

**शाहूः**––कोण ? खंडो ! आपल्या विश्वासावर येसू आईसाहेबांनीं आम्हांला इकडं पाठवलं ! तुम्हीच दूर लोटूं लागतात, तर आमच्या हातीं हरघडी चुका होणारच ! शंभुराजांपासून दौलत सांभाळलीत मग आजच अशी वागणी कां ?

**खंडोः**––शाहूराजे मराठ्यांचेच " राजे " म्हणून येते तर खंडोच काय, सारा महाराष्ट्र आपल्या भोंवती नाचला असता ! पण राजाजी, हे कृतज्ञतेचें असोत कीं राजकारणाचे असोत–हे वेडे चाळे महाराष्ट्राला पटणार नाहींत ! राजाला अभिमान, हृदय असावं लागतं ! पूर्वपरंपरा विसरणार तो राजा कसला ?

**शाहूः**––शाहू परंपराही विसरला नाहीं आणि हृदयालाही पारखा झाला नाहीं हें खंडोच्या अनुभवाला आल्याशिवाय राहणार नाहीं ! अलमगीरसारखा पादशहांचा पादशहा मेल्यावर कोणत्या दौलतीचा धनी होतो तें पाहायला म्हणून आम्ही इथं आलों! बाबांची–तुमच्या शंभुराजांची आठवण होऊन वृत्ती लीन झाल्या इतक्यांत तुम्हीं—

[ पडद्यांतः—सोडा, सोडा मला–राजांच्या पायीं जाऊं द्या. ]

**खंडो**:—अशा भलत्या ठिकाणीं आपल्या दर्शनाला येणारं कोण ?

**शाहू**:—आमच्याशीं विरोध करून, दोस्तीदुष्मनगिरीची निवड करूं पाहणारा असेल कुणी–कोण–कोण आहे ?

**सेवक**:—( प्रवेशून ) सरकार, आपली फत्ते झाली ! लोखंड्यांची गढी जमीनदोस्त झाली ! पाटिल मातीला मिळाले !

**राधाबाई**:—( मुलासह प्रवेशून ) पण पाटलांची घरधनीण उघडी पडली ! राजे राजे–दया करा—आणि या लेकराला तरी पदरांत–

**खंडो**:—लोखंडे–हिंदू ? राजे–काय हें ? काय आरंभलंत ?

**शाहू**:—काय आरंभलं ? पिकल्या बुद्धीला विचार सोडून जातात कां खंडो ? इतकी उतावीळ ?–दोस्तीपोटीं आमच्या प्राणांशीं दगाबाजी करूं पाहणारांशीं आम्ही कसं वागायला पाहिजे होतं मुत्सद्दी ?

**खंडो**:—म्हणजे ?

**राधाबाई**—म्हणजे काय ? धन्यानीं राजांना मेजवानीला बोलावून, विषप्रयोगाचा प्रयत्न केला, त्याचा मोबदला राजांनीं पुरेपूर दिला ! आपल्या मुद्रेवरून आपण कुणी मोठे दिसता ? मीही थोरामोठ्याची–पण धन्याच्या कृतीनं उघडी पडलेली दुबळी आहे ! राजे, धनी गेला जग बुडालं; आतां वैर कुठं राहिलं ? या आपल्या बहिणीचा चुडा फोडतांना दया आली नाहीं, पण या लेकराची तरी आतां दया येऊं द्या ! दया करा–दया करा–धन्याबरोबर हा देवदूत तरी नेऊं नका. आपल्या राज्याला उदंड भरभराट येईल !

**शाहू**:—खंडो, राजाला अभिमान, हृदय असावं लागतं; खरं ना ? आमच्याशीं जाणून बुजून आडमार्गानं दावेदारी धरणाराला मातीला मिळवून, राजाचा अभिमान आम्ही दाखवला ! आतां कसं वागावं अशी आपली पोक्त सल्ला आहे खंडो ?

**खंडो**:—असे विश्वासघातकी साप–

**राधाबाई**:—आपल्या तोंडावरून दयेची मूर्ती वाटलात पण हृदयांत दगडी कसायी दिसता !

**खंडोः**—राजकारणांत मुली, हृदयाचा दगड करावा लागतो तेव्हां दौलतीला बरकत चढते !

**शाहूः**—पण अशी अबलांच्या तळतळाटानं कमावलेली दौलत शाहूला नको ! खंडो, पाटीलबुवांच्या मरणाबरोबर दुष्मनगिरी संपली ! शाहूचा अभिमान तिथंच पुरा झाला ! जा—मुली, चोळीबांगडीकरतां तुझी दौलत जशीच्या तशीच अबाधित तुझ्याकडेच राहील ! जा—

**राधाबाईः**—उपकार झाले ! हा पाटलांचा वंश आपल्यापायीं वाहते ! कृपेचं छत्र दुरावूं नये.

[ मूल पायांवर ठेवते ]

**शाहूः**—[ मुलास उचलून ] आमची फत्ते झाली त्याच दिवशीं हा आनंदाचा ठेवा आमच्या हातीं आला ! छोटा फत्तेसिंग आमच्या कृपेंतच राहील ! ! खंडो—शाहूला हृदय आहे ना ? शाहू मोगली चांद कीं मराठ्यांचा राजा ?

**खंडोः**—ही बुद्धीची जादुगारी आणि हृदयाची दिलदारी मराठ्यांच्या राजा-शिवाय कुणाला साधणार ? छत्रपती, भोसल्यांचा बंदा भलत्या शंकेबद्दल माफी मागीत आहे !—

[ माफी मागतो. शाहू फत्तेसिंगचा मुका घेतो. ]

## अंक १ ला समाप्त.

# अंक दुसरा.

## प्रवेश १ ला.

[ **स्थळः**—अजिमतारा. शेवंता व दौलत प्रवेशतात. ]

**शेवंताः**—दौलत, जा नी स्वारीचा घोडा जीनबंद झाला कां पहा—

**दौलतः**—घोडा केव्हांच तयार झाला. पण स्वारीच आपल्याला पहायला वाड्यांत गेली—

**शेवंताः**—लढाईच्या धामधुमींत स्वारीला माझी गांठ वाड्यांत पडेल असं वाटलं तरी—कसं? पतीची स्वारी समरांगणाकडं निघाली कीं पत्नी दारांतच 'प्रीतीची वैजयंती—' घेऊन असायची! जा आणि स्वारीला गांठून सांग कीं आपली शेवंता शकुनानं— [ दौलत जातो—व एकीकडून सर्जेराव प्रवेशतो. ]

**सर्जेरावः**—शकुनानं काय? शेवंता, लढाईची पर्वणी म्हणजे आम्हां मराठ्यांची लगीन घाई! लग्नाचा मुहूर्त एकवेळ मोडूं, पण लढाईचा मोका दवडणार नाहीं! पण शेवंता, तुझ्या पायीं मात्र हा कुलाचार लटका पडतो! लढाईवर जाण्याची गर्दी खरी पण शेवंता,—तुला डोळे भरून पाहिल्याशिवाय, तुला कडकडून भेटल्याशिवाय इथून पाऊलच उचलेना—

**शेवंताः**—आणि असले शिलेदार, आईसाहेबांच्या खास विश्वासाचं काम लढाईवर करणार! धनी, हा लंपटपणा मराठ्याला साजत नाहीं! कमरेला लटकलेली समशेर कायमची दूर करा, "शिलेदारांत शिलेदार सर्जेराव" हा कीर्तीच्या डंका फुकट, असं समजायला तयार व्हा—नी मग आपल्या शेवंतीच्या मोहांत कायमचे गुंगून रहा! शेवंताला त्यांत आनंद नाहीं! शेवंता सर्जेरावांच्या रूपाची दासी नसून, त्यांच्या कीर्तीची ज्योती, पराक्रमाची साउली आहे! पतीच्या कीर्तीत सतीचं सौभाग्य असतं!

**सर्जेरावः**—आणि त्या सौभाग्याचा धनी इतका नादान असं कां शेवंताला वाटलं? सखीच्या गळ्यांत पडलेली मिठी, रणनौबदीच्या नादानं दचकून एकदां कां सुटली, कीं हाडाचा शिपाई बेकदर मृत्यूला कवटाळायला तयार होतो! शेवंता, तुझ्या सारख्या नागिणीचा धनी जातिवंत नाहीं, असं कां तूं समजतेस? पण—

**शेवंताः**—हा प्रीतीचा " पण " सख्या नको बोलस आतां ! प्रीतीचा साज-शिणगार केव्हांच उतरला ! नवतीचा बहर आतां संपला ! आतां कीर्तीला जागण्याचा प्रहर आला आहे ना ?–वीरश्रीचा चढता कैफ मैदानावर जातांना आपल्यावर असतांनाच, आज मी आपली कुरवंडी करणार आहे—

**सर्जेरावः**—मुलखान्यारी ही उलटी रीत कसली ? मुलूख मारून आलेल्या वीराची कुरवंडी करायची सोडून, लढाईवर निघालेल्या पतीची कुरवंडी–

**शेवंताः**––ही उलटी रीत उलट्या काळा करतां ! आज प्रीतीच्या पायघडी-वरून रणांगणावर जाणारा दाणा शिपाई, रणांगणावर तरी कोणता पराक्रम गाजविणार ? भेरीतुतान्यांच्या नादावर प्रीतीचे बोल तो कशावरून नाहीं छेडणार ? पुढचं अपयशी, पराजयानं काळं ठिक्कर पडलेलं पतीचं तोंड पाहण्यापेक्षां आज उत्साहानं रसरसणाऱ्या आपल्या मूर्तीकडं डोळे भरून पहावं,–आजच वीरपत्नीचं सौभाग्य लुटावं–म्हणून ही उलटी रीत बरं कां ?

**सर्जेरावः**––शेवंता, किती–कठोर तूं बोलतेस आज ? तुझ्या दृष्टीनं सर्जेराव–आज इतका नालायख ठरला अं ? आईसाहेबांच्या शब्दाकरतां, रणांगणांत चौफेर उधळणाऱ्या घोड्यांच्या टापाखालीं देहाचा चिखल झाला तरी इमान शाबूत राखणाऱ्या सर्जेरावाचा विश्वास त्याच्या जिवाच्या सोबतिणीला पटूं नये ?–शेवंता, ठीक आहे–या जित्या इष्मीनं यशाचं निशाण साताऱ्याला घेऊन येईन–तेव्हांच शेवंताशीं सलगीची भाषा बोलेन–

**शेवंताः**––किती उसळून बोलता हो शिलेदार ?–( बाजूस ) जिवाचं लिंबलोण करावं या वेळीं !–यावेळीं–प्रीतीची उसळी इतकी बेसुमार होते कीं हृदयाच्या पेटींत–असला मोती, जपून–जपून ठेवावा असं वाटतं !–धरूं कां रे हृदयाशीं ? ( उघड )–राया–माझा राग आला होय ?–

[ रागः जिल्हा काफी. ]

**बोला राया ! आला कां रुसवा सया ? ॥ किति विनवूं वचनीं या ॥ वाया ? ॥ ध्रु० ॥ वीर विरागें उसळे; ॥ नेत्रीं प्रणय कां ? ॥ लपलासे हसवावया ॥१॥**

**सर्जेरावः**––ही प्रीतीची दौलत सर्जेरावाला यावेळीं सुखावणारही नाहीं आणि रुचणारही नाहीं ! शेवंता–ऐक–( पड्यांत तुताऱ्या ) शाहूराजांना रणांगणीं भिडण्या

करतां आईसाहेबांची सेना कूच करूं लागली !–या तुताऱ्या ऐक ! खंड्या नाचूं लागला ! सर्जेराव शेवंताचा शिपाईगडी म्हणून परत येईल तेव्हांच प्रीतीची भाषा बोलेल–जातों मी– ( जाऊं लागतो. शेवंता आडवते )

**शेवंता**—शेवंतानं आपल्या पराक्रमाचा अविश्वास दाखवला तो धनी, आपल्या कर्तबगारीच्या पूर्ण विश्वासामुळं हें ध्यानीं ठेवा !–स्वारीनं रागाच्या आहारीं जाऊन भलतंसलतं धाडस करूं नये. नाहीं ना करणार ?

**सर्जेराव**:—धाडस ? शेवंता–धाडसाच्या भांडवलावर, कीर्तीचा रंगमहाल बांधून-असल्या झुलत्या रंगमहालांत बेहोष राहणं–हाच शिपाई गड्याचा खाका ! शिपाईगड्याच्या प्रीतीची रंगत अशीच नवलाईची असणार–

[ रागः—कानडी. दादरा. ]

**गुंफितसे प्रीत प्रेम-माला ॥ विलास हा प्रिय**
**गमला ॥ धृति-कृतीला ॥ सखि !-सकला ॥–**
**खेळुनि अतुला ॥ नव-लीला; ॥ बाला ॥ ध्रु० ॥**
**प्रीतीच्या कमलीं अलि करि घाला ॥**
**त्यागिता जिवाला ॥ क्षण-विलास त्याला ॥–**
**जीव धाला ॥ बाला० ॥ १ ॥**

शेवंता, जगदंबेच्या मनीं असेल तर या खाशा मोहिमेंतून शीरसलामत परत येईन–त्यावेळीं–

**शेवंता**:—आसवांचो वैजयंती हातीं घेऊन, आपल्या नांवानं झुरत असलेली–शेवंता आपल्याला खात्रीनं दिसेल ! याजन्मीं आपल्या प्रीतीची नवाई आपल्याला मनमुराद लुटतां आली नाहीं तर सख्या–धन्याच्या निष्ठेच्या ऋणांतून जिवाच्या मोलानं मोकळे झालों कीं स्वर्गीच्या नंदनवनांत प्रीतीचा सवता सुभा उभारूं–नी आनंद, आनंद लुटूं !

[ रागः—गर्भा, केरवा. ]

**छेडुं या गडे ! या ॥ दिलरुबा ॥ देवा ! ॥**
**जाउं या प्रेमें रंगुनी ॥ ध्रु० ॥ देवा० ॥**
**त्यागुनियां या सुखातुरा जीवा ॥—**
**गोफ भाव-सूत्रीं ॥ गुंफूं या ॥ १ ॥ देवा० ॥**

**सर्जेरावः**—त्याच निष्ठेचं देणं देण्याकरतां लाडके शेवंता, तुझा सर्जेराव निघाला आहे ! डोळ्यांतले येते अश्रु मागं घे.–नी मघाच्या तडफीनं–टाकून–इतकं टाकून सर्जेरावाला छेडून घे कीं हृदयांत असतील नसतील तितके सर्जेरावाचे चैतन्याचे किरण पूर्णतेजानं तळपूं लागतील—

**शेवंताः**—शिपाई, मघाचं अवसान शेवंतांचं कां होतं ? शिलेदाराच्या राणीचं ! स्त्रीचं हृदय शिपायाला कसं समजणार ? पतीला कर्तव्याच्या मार्गावर नेतांना, सौभाग्याचा टिळा आपल्या हातीं लटका विसकटतांना, शिपायाच्या लक्ष्मीला उल्हास वाटतो–पण तो लटुपटीचाच खेळ असतो !

**सर्जेरावः**—म्हणूनच शेवंता हृदयाचा तोल सांभाळ–भावनेला सावरून धर–नी हसत मुखानं सर्जेरावाची पाठवणी कर–तो पहा–खंड्या अधीर झाला–

**शेवंताः**—थांबा अं–अंबाबाईचा भंडारा कपाळीं लेऊन मग रिकिबीला पाय द्यावा !–जपून जपून रहायचं अं !–अगदीं फसवायचं नाहीं मला—

[ भंडारा लावते. प्रतिनिधी प्रवेशतात. ]

**प्रतिनिधीः**—शिलेदार, तुम्हावर आईसाहेबांनीं महत्वाचं काम दिलंच आहे; पण त्याच बरोबर ध्यानीं ठेवा कीं खंडोबरोबर धनाजीवरही बारकाईनं नजर राखा ! खंडोबा सर्वांआधीं आघाडीला गेला यांत कांहींतरी तेढा डाव आहे यांत शंका नाहीं ! हा प्रसंग नुसता पोलादाच्या धारेशीं नाहीं,–बुद्धीच्या हुलकावणीवर आहे–

**सर्जेरावः**—मग येवढ्या कामाकरतां खाशांनीं चाकराकडं येण्याचं काय कारण ?–निरोपाबरोबर चाकर पायांशीं हजर झाला नसतां कां ?

**प्रतिनिधीः**—शिलेदार, लढाईच्या मैदानावर, खासा आणि शिपाई हा भेदभाव जर आपल्या बापजाद्यांनीं राखला असतां तर ही दौलत इतकी कमावतांच आली नसती ! खाशांची कीर्ति तुम्हां शिपाई मर्दांच्या हातीं खेळते ! त्यांच्या वैभवाचं मंदीर तुम्हां निष्ठावंतांच्या हाडांवर उभारलेलं असतं !–पण–बोलायला आतां वेळच नाहीं !–शेवंता, शेवटच्या गोड निरवणीच्या वेळीं मधेंच आलों म्हणून रागावूं नकोस हं !–बाप पोरीच्या सुखाआड कधींच येणार नाहीं !

**शेवंताः**—मग मायबाप, माझा हा कुंकवाचा करंडा आपल्याच जपणुकीला देते ना ? माझा चुडा आपल्या घरचा–म्हणून आपल्याच जवळ ठेवावा ! स्वारीवरून परत आल्यावर माझं सौभाग्य–( नमस्कार करते )

**प्रतिनिधीः**—आहाहा ! खुळे पोरी, अखंड-अखंड सौभाग्यवती हो ! प्रतिनिधीच्या जिवांत जीव असे तों—सर्जेरावच्या केसालाही धक्का लागणार नाहीं ! तूं निर्धास्त रहा !-सर्जेराव, घोड्यावर मांड टाक नी केला हुकूम ध्यानीं राख ! ! [जातो ]

**सर्जेरावः**—शेवंता, खाशांनीं चाकराची रखवाली पतकरली-पण इथं खाशांच्या खाशाची-आईसाहेबांची रखवाली कोण करणार ?

**शेवंताः**—चाकराची बटीक ही शेवंता ! धनी-या बरं-

**सर्जेरावः**—जपून रहा ! शेवंता-जाऊं-जाऊं ना ?-[ जातो. ]

**शेवंताः**—धन्याची-खाशांची रखवाली ! पण सख्या, खाशांची रखवाली मी ती काय करायची ? शेवंता सर्जाची कला, शेवंता सर्जाच्या इच्छेचा पडसाद ! शेवंताचा झुकता तोल, जिवाच्या राजानंच नको का सावरायला ?-भोळ्या चुकल्या जित्राला, चुकल्या वेळीं रागारागानं नाहीं ना छेडणार ? शेवंता तेवढ्याही रागानं कोमेजून, सुकून जाईल बरं-

[ रागः-काफी, दीपचंदी ]

**प्रिय जाया सुखाया ॥ झालीसे रमाया ॥**
**पति-पायां ॥ ध्रु० ॥**
**जीवकला जणुं कान्त तियेला ॥**
**कोप न साहे लटका ! ॥ घाय जिव्हारीं ॥**
**होय विदारी; ॥ सावरी काया ॥ १ ॥**

पडदा पडतो.

---

## प्रवेश २ रा.

[ स्थळः-अजिमतारा. बरकतखान लपत प्रवेशतो. ]

**बरकतः**—क्या आफत गुदराई ? शाहूराजांनीं खंडोबाकडं पाठवलं पण खंडोबा चांगलाच पावला कीं ! किल्ल्यांत शिरतांना सरळ शिरलों पण आतां बाहेर पडायला मात्र मार्ग उरला नाहीं ! सारे सैनिक लढाईवर गेले-आणि मी मात्र इथंच या किल्ल्यांत, पिंजऱ्यांतल्या उंदराप्रमाणं अडकलों ! लपत छपत कुठं रस्ता आहे का सारखा धुंडाळतों आहे. पण जीव जगवायच्या या हालचालींत फटकन् एकाद्या भाल्याखालीं नाहीं तर तरवारीखालीं मुंडीछाट होईल कीं काय-भीती वाटते !-प्यारे बरकत, दौलत कमावण्याच्या या भानगडींत जान गमावण्याचा,-कोण ? दौलत ?

**दौलत**:—हां जी मियाजी ! असे रानमांजरासारखे कुणाच्या मोक्यावर ? एकादं सावज,–शिकार ?

**बरकत**:—ही चालती बोलती शिकार खडीच आहे कीं तुझ्या समोर ! दौलत, वर आकाश नी खालीं कडेलोट याशिवाय निवाऱ्याची जागा तुम्हां मराठ्यांच्या राजांना राहिली नाहींच कां रे ?

**दौलत**:—हळूं बोल, बेटा–हळूं बोल ! दिल्लीच्या दरबारांत नाहींस तूं ! शाहू-राजे–अजून साताऱ्चे बादशहा व्हायचे आहेत ! हल्लीं इथं दगडाला कान नी वाऱ्याला जीभ फुटली आहे ! आहेस कुठं ?

**बरकत**:—तेंच समजेना ! बायकांच्या राज्यांत म्हणावं तर एकजणही गोषा पाळत नाहीं ! बरं पुरुषांच्या राज्यांत म्हणावं तर–मनगटभर मिशांचे जवान, या बाईच्या नजरेपुढं मांजराप्रमाणं दबून खालीं माना घालतात !

**दौलत**:—अशा वेळीं वागणुकीचं धोरण ठरवण्यांतच खरी करामत असते ?

**बरकत**:—सरदार, काय वाटेल ती करामत कर ! पण बरकतला सोडव इथून !

**दौलत**:—आणि राजांनीं सांगितलेलं काम ?

**बरकत**:—अरे कसलं काम घेऊन बसलास ? तुझ्या त्या बकुळेला पाहिलं कीं माझंच काम होतं ! कोणत्या वेळीं ती या मियाची दाढी कापून हातांत देईल तें कांहीं समजत नाहीं–! मोठे तेवढे खोटे !–हा खंडोबा राणीच्या तडाख्यांतनं सुटला पण मी मात्र कायमचा सैतानांच्या कावूंत अडकलों–एकच युक्ति आहे—

**दौलत**:—युक्ति ? आणि तुम्हाला सुचली ?

**बरकत**:—हांजी–हां–वैसा करो—

**दौलत**:—काय ? काय करूं ?

**बरकत**:—तूं घे माझं सोंग आणि मी घेतों तुझं आणि हं—

**दौलत**:—वाः मियाजी ही दिल्लीची युक्ति कुणाला सुनावता ? बकुळेला पसार करायचा बेत आहे होय ?

**बरकत**:—क्या बेवकूफ आहेस रे ? काय छाती आहे माझी बकुळेकडं पहायची ? या युक्तिनं मी खालीं जाईन येवढंच–

**दौलत**:—पण मी मात्र वर, अगदीं वर जाईन ना हें फुटलं तर ! बकुळेचा नवरा आहे मी ! ध्यानांत आहे ना ?

**बरकतः**—अरे बापरे-दौलत-दौलत-

**दौलतः**—कां ? काय झालं एकदम ?

**बरकतः**—सावध रहो-तुझी कारभारीण-बकुळा-आतां है !

**दौलतः**—मी शिपाईगडी आहे मियाजी ! मरेपर्यंत मैदान सोडणार नाहीं ! डरो मत-डरो मत ! ( बकुळा येते. )

**बकुळाः**—कोण ? घरधनी वाटतं ? आणि हा बरकतखान ? असे रात्रीं काय करतां हो इथं ?

**बरकतः**—तोबा-तोबा-दौलत,-कांहीं धडगत नाहीं आतां;-औरत सांभाळतां येंत नाहीं तो मर्द कसला ?

**दौलतः**—आणि औरतीला भेदरतो तो शिपाई कसला ?

**बरकतः**—मै शिपाई नाहींच है ! मै बडा सरदार हूं--

**बकुळाः**—मग हा फाटका सरदार, इथं अजिमताऱ्यावर कशाला आला ? मरायला ?

**दौलतः**—एकदम बरोबर ! तूं आणखी थोडा मारा जर केलास तर बेटा खात्रीनं मरून जाईल ! आणि कबर बांधायचा बोजा आपल्यावर पडेल !

**बकुळाः**---इतकं कशाला पण ? आज आईसाहेबांच्याच कानीं यांचं कुलंगडं घालून टाकते मग त्या यांची कबर बांधोत नाहीं तर दर्गा बांधोत-

**बरकतः**—अरे-तुम्ही दोघंही माझ्या मरणाला तयार झालात पण मी तर जगायची खटपट करतोय ?

**बकुळाः**—आणि हें कारस्थान इथं करीत होतात काय ?-मग दोघंही सांपडलात तर-

**दौलतः**—म्हणजे ? याच्या कबरीबरोबर माझी चिता पाजळणार आहेस कीं काय ? घरधनीण तमायला लागली कीं त्या दिवशीं चुलींतला अंगार थंड झालाच म्हणून समजावं ! मियाजी, आज करा आतां थंडा फराळ ! बेटा, कोणत्या मुहूर्तानं रे आलास इथं ?

**बरकतः**—तेंच मालुम नहीं पडतां ? बकुलाजान, कसूर माफ,-मै आपका गुलाम हूं ! गरीब फकीर म्हणून इथून सोडवून जिवदान द्या ! शाहूराजे गादीवर आले कीं तुम्हाला हत्तीवर बसवतों !

**बकुळाः**—कशाला येवढे बाहेर जाण्याचे श्रम घेतां ? शाहूराजे इथं येणारच आहेत ना ? त्याचवेळीं काय हत्ती घोडा इनाम द्यायचा असेल तो द्या—

**दौलतः**—हे उत्तरेकडच्या मुशाफरा, पन्नास समशेरींच्या कैचींतून निसटशील पण एका बोलभांड स्त्रीच्या पकडींतून निसटतां यायचं नाहीं रे बाबा ! बायकोच्या तावडींतून मरणाशिवाय नाहीं मोकळीक !–मरायला तयार हो–आत्तां सुटशील ! !

**बरकतः**—बळी द्यायचा बोकड समजून कां रे तुम्ही माझ्याशीं खेळतां आहात ?

**बकुळाः**—असला फितूर लांडगा अजून बळी दिला नाहीं हें नशीब समजा ! खंडोबा कारभारी परत यायला पाहिजेत; म्हणजे आईसाहेबांच्या पुढं हा सूर्य नी हा जयद्रथ–

**बरकतः**—कूच भी मालुम नहीं पडतां ! डोळ्यापुढं काजवे चमकायला लागले आहेत ! ही थोरांची साठमारी म्हणजे गोरगरिबांचा खुर्दाच !

**दौलतः**—ही वेळ बरी आहे पळ काढायला !–डोळ्याला डोळा भिडवून एकदां कां तोंड सुरूं केलं कीं दौलत खलास–( जाऊं लागतो )

**बकुळाः**—( पकडून ) कुठं चाललात डोळा चुकवून ?

**दौलतः**—मोडले पाय !–कुठं नाहीं–पलीकडं कांहीं खुसपुसलं तें पहायला—

**बकुळाः**—अस्सं काय ?

**दौलतः**—शरणागताला अभय असो !

**बरकतः**—बकुळाजान, निदान या पिंजऱ्यांत तरी जिवदान मिळूं द्या ! राणीसाहेबांना नाहीं ना सांगणार ?

**दौलतः**—ती धास्तीच सोडा ! अहो तशी बातमी ती देईल तर फितूर माणसाला आसरा दिला म्हणून आधीं तिचाच कडेलोट होईल ! उगीच नाहीं मी तुम्हाला आल्यादिवशीं मुरगीचा खाना दिला !

**बकुळाः**—पण यापुढं तुमची गट्टी राहील तर ना ? चला–असेच्या असे ! यापुढं या फकीराशीं बोलायचं नाहीं–चालायचं नाहीं, पहायचं सुद्धां नाहीं याच्याकडं ! सारे शिपाई काल लढाईवर गेले आणि तुम्ही असे घरकोंबड्या सारखे इथं हे उद्योग करायला राहिलात ?

**दौलतः**—तें तुला आतां समजायचं नाहीं ! लढाईवर कशाला जायचं मरा-

93ee5 / 9d 91423

यला ? लढाईवर जाऊन जें करतां यायचं नाहीं तें इथं राहून करून दाखवीन ! तरच पगडी फिरवल्याचं सार्थक !

**बकुळाः**—तेंही पाहीन ! पण आधी इथून चालते व्हा !–

**दौलतः**—मघाशीं जात होतों तेव्हां आडवलंस ! आणि आतां लगेच कुत्र्याप्रमाणं फरपटत नेऊं पाहतेस ? नवरा म्हणजे काय बायकोच्या हातचं बाहुलं समजतेस तूं ?

**बकुळाः**—आतां अधीक तोंड कराल तर—

**दौलतः**—जबान बंद—

**बकुळाः**—आणि तुम्ही हो फकीर—

**बरकतः**—बाई, फकीर असतों तर त्या भांडवलावर तुम्हाला केव्हांच झुंकाडी दिली असती ! पण मी एक साधासीधा बेअक्कल जासूद आहे ! फकीर समजून तरी दया करा ! निवाऱ्यांची जागा द्या–

**बकुळाः**–फकीराला सगळीकडंच निवारा असतो !–कारभारी, चला म्हणते ना ? नका पाहूं त्याच्याकडं !–चला–चला ( ओढित व डोळे झाकीत नेते. )

**दौलतः**––बरकतरवान, या धोरणी गड्याला यावेळीं नाइलाजनं ही डोळे-झाकून माघार घ्यावी लागत आहे !–पण–( जातो )

**बरकतः**––अल्ला तुमकू सलामत रखो !–क्या शिपाई है क्या हैवान ! [जातो. ]

—पडदा उघडतो—

---

## प्रवेश ३ रा.

[ स्थळः–सातारा. ताराऊचा महाल. झोंपेतून उठून ताराऊ प्रवेश करते. ]

**ताराऊः**—आमचे जिवाचे जिवलग इतके माजोरी झाले अं ? "विजयी झालों तर चाकर तुमचे,"–असं आम्हाला सुनावण्यापेक्षां खंडोजी, तुमच्या पिकल्या बुद्धीला " आम्ही शाहू राजांकडे चाललों " असा सीधा जबाव द्यायची लाज वाटली ? स्त्री असून माझ्यापुढं तुमच्या दिलखुलासपणाला कंप सुटला ? पण ताराऊचीं हाडं उभीं असेपर्यंत सातारा तुम्हां विश्वासघातकी दगाबाजाबरोबर झुंजत ठेवायला, ताराऊ कचरणार नाहीं !–अरेरे–आमचीच सद्दी संपली कां ? ताराऊनं कोणतं पाप केलं म्हणून तिला हा उलटा अनुभव यावा ? आमच्या नजरेला नजर भिडवण्याची छाती न होणारे सरदार, शाहू राजांच्या कोणत्या गुणांवर इतके बेहोष झाले ? ओठीं नेलेला

घांस पोटीं उतरण्या आधीं यांच्या तोंडीं दिला ! आमच्या हातीं गिळलेले दूधभाताचे घास पुरते गळ्याखालीं उतरले नाहींत तोंच, आमच्या मानेवरून कसायाप्रमाणं विश्वासघाताची सुरी फिरवणारे सरदार, दौलतीच्याच कल्याणाकरतां असे हरामखोर झाले कीं स्वार्थापायींच हा दुस्मानदावा धरूं लागले ? बुद्धि धुंदकारून, विचारांचा कैफ इतका अनावर होतो, कीं आमच्या सरळ, निष्कपटीपणाची आमची आम्हालाच चीड येते ! ताराऊनं आणभाकेला गुंतवलं त्याचवेळीं हे दौलतीचे बरकंदाज, ताराऊचं धनीपण झुगारून देते, तर आमची बेअब्रू तरी टळली असती आज ! शाहूराजांच्या, आमच्या पुत्राच्या पायांवर डोई ठेवण्यांत आम्हाला कमीपणा वाटता तर या राजवैभवाचा संन्यास घेऊन, कुठंही आम्ही आमचा जीव रिझवला असता;–पण आतां या मानी मनाचं समाधान—अरेरे–सारं जग " ताराऊ स्वार्थी; ताराऊ स्वार्थी कारस्थानी " म्हणून डंका पिटणार ! अभिमानी,–जिवंत हृदयाचा पीळ, स्वार्थी आंधळ्या जनतेला कसा दिसणार ? आबासाहेब, आबासाहेब–आपण तर नाहीं ना या ताराऊला दोष देणार ? काय ? काय ? शाहूची कृती आपणांसही मान्य नाहीं ? भावोजीनीं धर्माकरतां राज्याचीच काय पण प्राणांची सुद्धां पर्वा केली नाहीं त्याच बीजाचा बच्चा शाहू, बापाला जिवंत सोलणाऱ्या अलमगीरच्या कबरीच्या दर्शनाला मोठ्या प्रेमानं जातो, मोगलांच्या ओंजळीनं पाणी पितो, म्हणून त्याशीं असाच विरोध करूं ? ही मराठ दौलत विटाळू देऊं नको ?–नाहीं जिवांत जीव असे तों–मराठदौलत–जातिवंत मराठ्यांच्याच स्वाधीन राहील !–आजचे निष्ठावंत, उद्यां–हत्तीच्या पायीं दिले जाऊन, पुन्हां महाराष्ट्रांत शंभुशाही पाहण्यापेक्षां, मरण आनंदानं मी स्वीकारीन ! पण आबासाहेब, आपला आशीर्वाद मात्र असावा–कोण ? कोण ते ?

**शेवंताः**—[ प्रवेशून ] सरकार—

**ताराऊः**—सातारची लक्ष्मी का ? कीं मूर्तिमंत अंबाभवानी तूं ? बोलत कां नाहींस ? ताराऊ कोणत्याही विरोधाला भीक घालणार नाहीं ! मला आबासाहेबांचा आशीर्वाद आहे ! कैलासवासी धन्यांची माझ्यावर मायापांखर आहे ! कोपी, पण जातिवंत सिंहाच्या ब्रीदाच्या शंभुभावोजींचा आत्मत्यागाचा संदेश, माझ्या रोमरोमांत संचारतो आहे कीं, " ताराऊ, धर्माच्या पावित्र्यापेक्षां, दौलतीच्या दर्जापेक्षां, दौलतीच्या धन्याला प्राणांची किंमत अधीक नाहीं ! "–झालं तुझं समाधान ?



ताराऊः—ही मराठदौलत विटाळूं देऊं नकोस ? [अंक २रा प्रवेश ३ रा]

**शेवंताः**—सरकार, आपण सावध झाला कां ? मी शेवंता ! आपली बटीक !—अंबेची कसली बोली—? सावध व्हा—

**ताराऊः**—कोण ? शेवंता ? आमच्या सर्जेरावची शेवंता ?—म्हणजे आम्ही सावध नवतो तर ?—पण अशा अपरात्रीं—?

**शेवंताः**—सरकार, विचारा विचारानं नीज येईना—

**ताराऊः**—विचार ! विचार ! ताराऊची सारी प्रभावळच आतां विचारचक्रांत फिरूं लागली कां ?—शेवंता, विकार आणि विचार यांच्या आधीन, आमची समाधी लागली असतांना, सौभाग्यवतीच्या रूपांत, मूर्तिमंत अंबाभवानीच आमच्यापुढं आली असंच आम्ही समजतों !—

**शेवंताः**—म्हणजे ?

**ताराऊः**—शेवंता, दुनियाच फिरली, गळ्यांतले ताईत भुजंग बनले, बिनीचे—ऐरावत चाकरीला चोर ठरले तिथं भवानीशिवाय आमची बाजू कोण सावरणार ?

**शेवंताः**—ही हृदयाला झोंबणारी बोली कळत नसून, बेचैन करते सरकार ! काय प्रसंग आला म्हणून हा उदासवाणा खेद ? असल्या राजस रूपांच्या डोळ्यांतील एका आसवाचा मोबदला, देहांतल्या रक्ताच्या पुरानं द्यायला मराठी हिंमतबहाद्दर अजून तयार आहे ना ?

**ताराऊः**—शेवंता, हृदयांतल्या जिव्हाळ्याच्या भावनेला, शब्दांची इतकी गेंदाची फुलं येणारी ही जिवंत फुलवंती, देवलोकांतच घडवली कां ग ? शेवंता, कुणा देवादारीं तूं जन्माला आलीस ? धनाजी खंडोसारखे सेनासागर फितवा करायला तयार तिथं एका शिलेदाराच्या राणीनं, झुंजारमर्दांच्याही निष्ठेला लाजवावं ?

**शेवंताः**—काय ? खंडो धनाजी शेवटीं फिरलेच ?

**ताराऊः**—सारं नशीबच फिरल्यानंतर त्यांना तरी दोष कां द्यायचा ? शेवंता, ताराऊकडं जगाचे डोळे निराळ्या दृष्टीनं आजपासून रोखले जाणार ! आणि याला कारण, हे आम्हीच पोसलेले, कैलासवासी धन्यांच्या अमदानींत डोईजड झालेले हे साप—

**शेवंताः**—मग धीर सोडायचं काय कारण ? आईसाहेबांच्या नी बालराजांच्या भोंवती, हाडांचा तट उभारून त्यांचं रक्षण नाहीं कां करतां येणार ? साताऱ्यांतलं प्रत्येक प्यादं मारलं जाईपर्यंत, शाहूचा पाय गडाला लागणार नाहीं !

**ताराऊः**—आम्ही आमच्या किंवा बालराजांच्या जिवाच्या आशेनं भांबावलों असं नाहीं; पण हा लढा पुढं जित्या इध्मीनं चालवायला माणूसबळ–शेवंता, यावेळींच प्रतिनिधी किंवा सर्जेराव इथं—

**शेवंताः**—मैदानावर गेलेला शिपाई परत येईपर्यंत जिवंत नाहीं सरकार !–हा पाहिलात–एक हातचा चुडा, शेवंतानं धन्याच्या बरोबर मैदानावर पाठवला आहे—

**ताराऊः**—आणि प्रसंग पडला तर याच हातीं समशेर घेऊन, मानाचं मरण आपल्याला पत्करावं लागेल !

**शेवंताः**—मग आज्ञा होऊं द्या ? असंच फौजेमागं चलायचं कां ? मी तेंच–तेंच विचारायला आलें—

**ताराऊः**—खासं मोहरं लढाईच्या धामधुमींत नेहमीं मागच ठेवावं लागतं–शेवंता ! हा स्वार्थीपणा नसून, युद्धाचा हा महत्त्वाचा डाव असतो ! मैदान शत्रूनं मारलं असं समजूनच, आज सातारा आपल्याला लढवण्याची तयारी केली पाहिजे—

**शेवंताः**—पतीपेक्षां, आपल्याच भोंवतीं पहारा करण्याचा प्रसंग आला तर शेवंता अधीक भाग्याची होईल—

**ताराऊः**—तर मग मैदानचा भगवाझेंडा परत येईपर्यंत, अजिमताऱ्यावर नागिणीच्या जागरूकपणानं आपल्याला पहरा ठेवला पाहिजे ! मिळतील तितके शिपाई-गडी मिळवून, गडाची मजबुती राखली पाहिजे ! या किल्ल्याच्या दगडादगडांत शत्रूचे सुरुंग भरले जाण्याचा मोका आहे—

**शेवंताः**—परवां खंडोजीला जाण्याआधीं कुणीतरी कसली थैली आणून दिली म्हणून बकुळा सांगत होती खरी—

**ताराऊः**—असला फंद फिसाद चालू आहे हें आम्ही जाणूचन आहोंत ! शेवंता, असले दगेखोर अजून जर गडावर वावरत असतील तर त्यांचा बंदोबस्त आपल्याला जरूर केला पाहिजे ! पण नुसत्या बातमीवर विसंबून, बेगुन्हां शत्रूलाही सजा व्हावी असं आम्हांला वाटत नाहीं !

**शेवंताः**—तर मग वाढवलेल्या चुड्याचीच आण घेऊन सांगते, सर्जांची शेवंता-जिवांत जीव असेतों आईसाहेबांची पाठराखणीच करील—

**ताराऊः**—आणि आम्हीही निश्चयानं सांगतों, कीं या आमच्या पडत्या काळांत आमचे समशेरजंग आमच्याशीं दगाबाज झाले असतांना, आमच्या शिलेदार हेट-

कऱ्यांना, आम्ही प्यादेफर्जंद बनवूं ! मातीच्या कणाकणांतून मोत्यांची बरसात बरसवूं ! पण जातीला बट्टा लाऊन घेणार नाहीं !

[ रागः कानडी दुर्गा, त्रिवट ]

**" यशवंचना गुणांना " ॥ भय-बोल फोल माना ॥ ध्रु० ॥**
**जगिं प्राण जाणा ॥ अमर न कोणां; ॥**
**कार्यबलें जगिं मोल जिवांना ! ॥ १ ॥**

पडदा पडतो.

---

## प्रवेश ४ था.

[ स्थळ--अजिमतारा. दौलतबरकत येतात. बरकत मराठी शिपायाच्या पोषाखांत. ]

**दौलत**—( हातावर टाळी देऊन ) काय काढली युक्ति ? जगलात कीं नाहीं मियाजी ? उगीच नाहीं फिरवली पगडी ? या कंगणीची दिशा बदलल्या पासून नाहीं नाहीं त्या कल्पना सुचताहेत ! खान, काय सांगू ?

**बरकत**—थांबा; मीच सांगतों तुम्हांला ? हा तुमारा पेहराव केल्यापासून, माझ्यांतही थोडं निराळंच पाणी आल्यासारखं वाटतय ! आतां डरत नाहीं ! परवां राणीसाहेबांच्या कानांवर माझी बातमी गेली मात्र, खुराड्यांतल्या कबुतरागत, जीव खालीवर व्हायला लागला ! दौलतसिंग, तुम्हां मराठ्यांत जर दाढी राखण्याचा रिवाज नसता तर बडी आफत गुदरती--

**दौलत**--अहो मराठे असे बुद्धीचे शिकंदर म्हणून तर तुम्हां मोंगलांना चौफेर गुंगत ठेवून मराठशाही राखली ! मराठ्यांत एकाच गुणाची कमतरता होती—

**बरकतः**—ती कोणती ?

**दौलतः**--वेळ पडेल तशी पगडी फिरवण्याची ! आज दिन अस्सल मराठा, सीध्या मार्गाचा शिपाई होता; त्यामुळं जीव जात असून सुद्धां तो कधींच माघार घेत नसे;--पण ही पगडी फिरवल्यापासून, मराठ्यांचा हा रजपूती बाणा दौलतीला पटेनासा झाला आहे ! या तिकोनी पगडीवर साऱ्या जगाचा व्यापार आवरीन इतका तकवा या मेंदूंत वाटायला लागला आहे--

**बरकतः**—वैसा ? फिर तिकोनी पगरीका अल्लाहु अक्बर ! पण दौलत, मला खरोखरच कुणी ओळखणार नाहीं ना ? ही बोली जरूर दगा देगा !

**दौलत**—पहा आतांच दगा दिला ! हे पहा मियाजी, तुम्ही मोगल आहात याची तुम्हाला आठवण झालीरे झाली, कीं तुमची मोगली जीभ लागते नागमोडी चालायला;-जिभेला तेवढा लगाम घाला--

**बरकतः**—ओ एकच बात छोडकर कुइ भी सुनाव! कुई भी फर्माव! दिल्लीकडचा अदमी जिभेचा सैल राहायचाच ! नी बोलायची उकळी आली कीं, कबर फोडून बाहेर पडायचा !-मला भीती वाटते एकाचीच-

**दौलतः**—कुणाची ? त्यांतून सोडवायची युक्ति काढतों ! पण मियाजी, शाहूचे सरदार झाल्यावर, दौलती निदान शिलेदार तरी झालाच पाहिजे !-म्हणजे सांगतों ! इथं माझ्या गुणांचं चीज नाहींरे राजा !-बोला-कुणाची भीती वाटते ?

**बरकतः**--दुसऱ्या कुणाची ? राजा, तुझ्या अस्तुरीची--

**दौलतः**--काय नामर्द आहांत हो ? दिल्लीचे बादशहा म्हणे हजारो परींचा गोषा बाळगतात; त्या परी जिवंत कां चित्रांतल्या ?

**बरकतः**--दौलत, त्यांची कल्पना या डोंगरी घळींत राहून नाहीं यायची ! मोंगल बादशहांचा गोषा म्हणजे खरोखरच चित्रांचा बाजार असतो बेटा ! एकीचं तोंड वाजेल तर शपथ ! नुसता पायांचा आवाज ! रुम्झुम्-छुम् छुम् ! हाय रे मेरी दिल्ली ! हाय रे मेरा आग्रा ! ( बकुळा प्रवेशते )

**बकुळाः**--तरी म्हटलं कीं शेंडें नक्षत्र मावळलं कुठं ?

**बरकतः**--अफसोस ! दगा-दगा-शेवटीं औरतीनंच दगा दिला !

**बकुळाः**--हें वेषांतर करून पोबारा करायचा होता नाहीं कां ?

**दौलतः**--नाहीं, या वेषांतरानं इथंच राहायचं ठरलं आहे त्यांचं--

**बकुळाः**--म्हणजे ?

**दौलतः**--कुठंही पोटाकरतां चाकरीच करायची ना ? सध्यां किल्ल्याच्या रक्षणाला लोक पाहिजेतच !-एक डोई अधीक मिळाली ! कां मियाजी ?

**बरकतः**--हांजी निखालस वैसाच !

**बकुळाः**--काय ? तुम्ही आईसाहेबांच्या बाजूचे ? खरं सांगा; कीं शाहूच्या ?

**बरकतः**—( दौलतीस हळूच ) आतां दौलत ? क्या करना ?

**दौलतः**--( बाजूस ) चूप बैठना ! बाजू ठरावयाची आहे अजून !-

**बकुळाः**--काय हो, बोलत कां नाहीं आतां ? हें नोकरीचं सोंग कीं सोंगाची बतावणी ?

**दौलतः**--अग, ते काय बोलणार ? माणूस चूप बसला कीं त्याची अर्धी कबूली समजायला हरकत नाहीं !

**बकुळाः**--असा अर्धवटपणा नकोच आहे मुळीं ! आजच मला शेवंताबाईंनीं यांच्यावर सख्त नजर ठेवायला सांगितलं आहे !

**दौलतः**—म्हणजे ! आईसाहिबांचा कारभार म्हणजे काय वायकांचं बंड होणार कीं काय ? पुरूष तेवढे सारे चोर आणि तुम्ही बायका मात्र शिरजोर ?

**बकुळाः**—हे चोरपावलीं येणारे चोर नाहींत तर काय साव ? काय हो राव, स्पष्ट बोलायचं आहे कीं—कसं ? चोरून आलात नी हें वेषांतर ! चांगलें दुहेरी पेंचांत सापडला आहात—

**बरकतः**--मा मेरी—सबूर ! दौलत, हा आपला बाळसंतोस आतांच घे ! जीव जगवायला म्हणून जों जों धडपड करतों तसतसा अधीकच घोटाळ्यांत पडत चाललों आहे ! बकुळाजान, मैं लाचार हूं--[ नमस्कार घालतो ].

**दौलतः**—लढाई बंद ! बकुळा, मराठामर्द सीधा लढवय्या असतो ! जें यश समशेरजंगांना मिळायचं नाहीं, तें यश आज तुला मिळालं आहे ! हा दिल्लीचा बरकंदाज आज तुला शरण आला आहे ! याच्या अब्रूचा पसारा करूं नकोस—

**बकुळाः**—पण आतां शेवंताबाईंनीं विचारलं तर काय सांगूं ? त्यांना तर तुमचंही नांव कळलं आहे--

**दौलतः**--ती तुझीच कारवाई ! दोघांचाही कडेलोट केल्यावर दाही वाटा मोकळ्या आहेत तुला ! तूंच आतां नाचव हीं अस्वलांची दुक्कल—कां मियाजी ?

**बरकतः**--हां वैसाच !

**बकुळाः**—तुम्ही दोघंही आईसाहेबांची इमानानं नोकरी खरंच कराल कां ? मिळतील तितके लोक गडावर सध्यां पाहिजेच आहेत ! आज ना उद्यां लढाईचा प्रसंग—

**बरकतः**--अफसोस ! लढाई ?

**दौलतः**—अरे हिंमत मर्दा तो मदत खुदा ! मियाजी, डरो मत ! बकुळा, थोडा विचार करतों आम्हीं, तोंपर्यंत तूं त्या झाडाचीं पानं मोज ! ( हळूंच ) बरकत, आजच जर आईसाहेबांची बाजू सोडली तर आजच गर्दन जाईल ! आणि उघड-त्यांची बाजु धरून राहिलों तर उद्यां शाहू आल्याबरोबर मुंडीछाट होईल !

**बरकतः**—मग क्या करना ?

**दौलतः**—असं करूं या !-हां हां-मी आहे मराठा ! मी दाखवतों आईसाहेबांची बाजू ! तुम्ही द्या होकार रेटून ! आणि डोळा मात्र टेवा शाहूवर ! वेळ येईल तशी गोलांटी उडी मारूं नी काय ?

**बरकतः**—हां जी हां ! हां जी हां ! निखालस वैसाच !-द्या टाळी ! ( टाळी देतात )

**बकुळाः**—हें काय ? पुन्हां कांहीं तरी कल्पना निघाली वाटतं या पगडींतून ?

**दौलतः**—एकच ! मी नोकरीवरून सध्यां खालीच असल्यामुळं माझ्याच्यानं कांहीं जडभारी काम एकदम व्हायचं नाहीं ! हे तर बोलून चालून नवखेच ! साधारण या दोन दुबळ्यांना झेपेल असं काम द्यायचा वशीला लाव म्हणजे झालं !

**बकुळाः**—पण यांचा विश्वास ?

**दौलतः**—कृतीनंच दाखवतील ते ! कां मियाजी ?

**बरकतः**—हां वैसाच !

**बकुळाः**—तर मग आतांच चला शेवंताबाईकडं म्हणजे झालं ! होईल निकाल !

**बरकतः**—जान सलामत रखो फिर निकाल करो आँ !

**दौलतः**—त्याची नका हो धरूं काळजी ! मराठ्यानं शब्द दिला कीं प्राण गहाण ठेवला म्हणून समजा—

[ कवाली. ]

**ठावा कांहीं या कावा ना ॥ भोळया जिवांना ॥**
**होतात वंदे जवाना ॥ ही मियाजी ! इमानी ॥**
**जात मानी ॥ नांदे या रानावनांना ॥ ध्रु० ॥**

**बकुळाः—चातुरांना पहा रंग नाना ! ॥**

**दौलतः—रीत अशीच ही निंदकांना ॥**

**वरकतः**—हां हां ! वैशाच उलटा जमाना ! ॥
**दौलतः**—दावि साऱ्या जनांना ॥ भाव नाना ॥
जाति ही रानावनांना ॥ १ ॥

---

## प्रवेश ५ वा.

[ **स्थळः**—भीमा तटाक-चाकण जवळील शाहूची छावणी. ]

**खंडो०**—काळ्या कृत्याला काळोखाची जरूरी पडते ! मी काळं कृत्य करतों कां ? खंडोनं तामसी शंभुराजांच्या कारकीर्दीपासून दौलतीची चाकरी केली; आणि आज नव्या छत्रपतीच्या पायांवर डोई ठेवून कर्तव्याचा शेवट करायचीं भाग्याची वेळ आली ! दौलत ज्याची त्याच्या सुपूर्त केली म्हणजे इमान;-पण आईसाहेबांशीं हें वर्तन इमानाचं ठरेल कां ? कैलासवासी शंभुराजांनीं शेवटचं निरवतांना, "खंडो, बालराजांना अंतर देऊं नकोस" म्हणून फोडलेला टाहो, अजून-अजून या कानांत घुमत आहे ! आईसाहेब, या मोलाच्या आणभाकेला खंडो गुंतला नसता तर आपल्याशीं हा लपंडाव—

**सर्जेरावः**—( लपत प्रवेशतो )

**खंडोः**—कोण ? कोण तो ?

**सर्जेरावः**—निमकहराम अवलादीला मराठगादीच्या नांवानं जाब विचारणारा सर्जेराव—

**खंडो**—कोण ? सर्जेराव ?

**सर्जेरावः**—होय सर्जेराव ! भडक माथ्याचा, मंद बुद्धीचा, पण जातिवंताच्या रक्ताचा सर्जेराव—

**खंडोः**—आणि अशा अपरात्रीं इथं ? शत्रूच्या गोटांत ?

**सर्जेरावः**—अशा काळवेळेला पापी सैतान आपलं काळं कृत्य बहुतकरून उरकून घेतो; म्हणून त्याच्या पावलावर पाऊल ठेवून मलाही यावेळीं जागावं लागलं—

**खंडोः**—म्हणजे ? कोण तो असा कर्मचांडाळ ?

**सर्जेरावः**—कोण तो कर्मचांडाळ ? खंडो, दूर कशाला पाहायला पाहिजे ? तूंच, तूंच तो निमकहराम ! ओठीं अमृताचे कुंभ ठेऊन, पोटीं कपटाच्या विषाचा

घडा ठेवणारा तूंच;–अरेरे–खंडेराय, खंडेराय, मोहिमेवर तुला विश्वासानं पाठवलं; तुझ्या आजपर्यंतच्या निष्ठेचा भरंवसा धरून तुला आणभाकेलाही गुंतवला नाहीं;– आईसाहेबांनीं विश्वासानं तुझ्या मांडीवर डोई ठेवली तर तूं, तूंच त्यांच्या या विश्वासाच्या साखरझोपेंत असा गळा सोडवावास म्हणून ?

**खंडोः**––सर्जेराव, आम्ही करतों हें पातक आहे हें समजत असून सुद्धां, आम्हाला माघार घेतां येत नाहीं ! हें पातक टाळण्याकरतां, हा विश्वासघात चुकवण्याकरतां, शंभुराजांना दिलेल्या आणभाकेशीं दगाबाज कसा होऊं ?–

**सर्जेरावः**––खंडो, शंभुराजांच्या आतताईपणामुळं मराठदौलत मातीला मिळाली; ती राजारामराजांच्या लोकसंग्रहानं, नी तुझ्या सारख्याच्या बुद्धीच्या करामतीनं परत मिळवलीत,–साताऱ्याची राजवट आनंदानं पुन्हां हंसवलीत ती– असल्या यादवीकरतां ? स्वकीयांच्या रक्तानं रंगवून टाकण्याकरतां ?

**खंडो०**—राजकारणाचा रंग नेहमीं रक्ताच्याच रंगाबरोबर बदलत असतो !

**सर्जेरावः**––तर मग खंडोबा, तो रंग तुझ्याच रक्ताबरोबर बदलावा लागेल ! नेकीचा नेकजात, पवित्र पराक्रमाचा पुतळा, बुद्धीचा मोतीदाणा खंडो, आपल्या उजळ कीर्तीनं वावरत असतांना, जर आज मातीला मिळाला, तर खंडोबा तुझ्या चारित्र्यावर आजच्या वर्तनाचा कलंक तरी चढणार नाहीं !

**खंडो०**—तर मग, शिलेदार, उपस आपली समशेर आणि एका घावांत या पिकल्या पानाला छाटून टाक ! आयुष्याच्या या उरल्या अवकाशांत, कर्तव्याकर्तव्यांत होणारी ही ओढाताण या दुबळ्या हृदयाला आतां नाहीं सोसत ! दौलतीचा बंदा, लेखणीचा खंदा खंडो, रणांगणावर पोलादी मनगटाचा असला तरी सर्जेराव, तुझ्या या निर्वाणीच्या आव्हानाला, मेल्या मेंढराच्या मोतीनं मान झुकवतों आहे ! चालव हातची समशेर, म्हणजे देहांत सळसळणाऱ्या रक्तांत, स्वामिद्रोहाच्या कल्पनेची काळिमा भिनायच्या आधींच, शुद्ध स्वरूपाच्या अशुद्धाची रक्तगंगा, माझ्या कैलासवासी स्वामींच्या पायीं मिळेल !

**सर्जेरावः**—सर्जेराव साधा शिलेदार असला तरी निशस्त्राची गर्दन उतरणाऱ्या नीच अवलादीचा नाहीं !–समजलास ? आजपर्यंतच्या तुझ्या कीर्तीपुढं–सर्जेराव काजवाही नाहीं ! लाजेनं तुझ्या डोळ्याला कधीं डोळाही भिडवला नाहीं;–पण आज,

तुझ्याच शिकवणीचं बाळकडू प्यालेला सर्जेराव, तुझ्या हातीं स्वामिनिष्ठेचा खून व्हायच्या आधीं, तुलाच मरायला फर्मावीत आहे !-चल-उपस आपली समशेर-

**खंडो०**—समशेरीचं नांव कशाला काढतोस सर्जेराव ? या कमरेची समशेर हातीं झळकतांच, मी मी म्हणणारे रणझुंजार आजपर्यंत दिपून गेले आहेत ! तिथं तूं—

**सर्जेरावः**—पण आजपर्यंतचा खंडोबा, निष्ठेचा सूर्य, पवित्र पराक्रमाचा प्राण होता; आज तोच व्यभिचारी निष्ठेचा पोशिंदा होऊं पहात आहे;—पवित्र पराक्रमावर-यशाची नौबत झडत असते !—चल, तयार रहा—

**खंडो०**—हरकत नाहीं ! विचारांची बोली विकराआड फेकणाऱ्या तुझ्यासारख्या जवानाची रग सुद्धां थोडी अजमावलीच पाहिजे ! चल, तयार रहा—

[ दोघे लढतात. इतक्यांत प्रतिनिधी प्रवेशतात. ]

**प्रतिनिधीः**—सबूर, सर्जेराव सबूर ! सर्जेराव, कुणाची समशेर नी कुणाच्या समशेरीला भिडते ? खंडो, तुम्ही सुद्धां विकाराच्या आधीन गेलात ? पण आपल्या हल्लींच्या मनोवृत्तींत, आपल्या झुकत्या तोलाबरोबर, आपल्याला विचारानं सोडलं असल्यास नवल नाहीं ! आपल्याला समशेरच चालवायची असली, तर तोलाच्या प्रतिनिधीच्या समशेरीशीं चालवा ? उद्यां शाहूबरोबर आपल्याशीं सुद्धां झुंज घ्यायला प्रतिनिधी तयार आहे ! शाहूराजांचा उदोउदो करूनच, आईसाहेबांच्या गळ्याला तात लावणार असलात, तर त्यांच्या दूधभाताचे घांस गिळलेलं मोहरन् मोहरं, या मैदानाच्या सारीपटावर आपल्याला नेस्तनाबूद करावं लागेल, तेव्हांच सातारा आपल्याला दिसेल !—मग खुशाल—खुशाल शाहूचा जयजयकार करा—

**शाहूः**—( प्रवेशून ) होय—शाहूचाच—शाहूचाच जयजयकार आतां झाला पाहिजे ! शाहूच्या जयजयकाराबद्दल असंतोषाचे बोल, शाहूच्या गोटांत बडबडणारे कोण धाडसी ?

**सर्जेरावः**—साताऱ्च्या राणीचे सेवक—

**शाहूः**—मृत्यूच्या जबड्यांत जाणूनबुजून उडी घेणारे आमचे दुष्मन् ? सिंहाला—बेदर्द छेडणारा, हिमतीचा हिमालय असला, तरी सिंहनादाबरोबर, हिमालयाचीं दऱ्याखोरीं भीतीनं थरकांप हादरतात ! समजलास ? स्वार्थी राणीसाहेबांचा जयजयकार आजदिन महाराष्ट्रानं केला;—जा राणीसाहेबांना आमचा निरोप कळवा, कीं साताऱ्चा

राजा शाहू, आपल्या हातानं, मराठशाहीचा मुकुट आपल्या हातून हिसडून घेण्याकरतां सातारच्या शिवेला भिडला आहे !

**सर्जेराव**:--त्याच बरोबर शाहूराजांनीं हेंही ध्यानांत ठेवावं कीं सातारच्या शिवेवर पाऊल ठेवण्या आधीं, भीमेच्या कांठावर, छातीशीं छाती भिडवूं पाहाणाऱ्या मर्दांशीं राजांना मुकाबला द्यावा लागेल ! !

**शाहू**:---बायकी राजकारणांत शेळीचे सिंह व्हायच्या कल्पना ! मिऱ्याचा मेरू-व्हायची महत्त्वाकांक्षा ? शाहूचा पराक्रम फोल असता तर खंडोजीधनाजी सारख्यांच्या कर्तबगारींनं आपली मान आमच्यापुढं कधींच झुकवली नसती !–हें तरी आईसाहेबांनीं जाणायला पाहिजे होतं ! पण स्वार्थी–कैफानं धुंद झालेल्या त्यांच्या नजरेला परिस्थितीचा आवाका यावा कसा ? तुमच्यासारख्या धुंगुरट्यांचा नाद म्हणजे सिंहाची गर्जनाच वाटणार त्यांना ! खंडो–हे कसे इथं ?

**खंडो**—स्वामिसेवेनं बेहोष होऊन, माझ्या मागावर यांनीं आपला जीव असा धोक्यांत घातला–हुजूर–!

**शाहू**:--जा तर मग–खंडोच्या करतां आम्ही तुम्हांला जिवदान देतों ! अजून तरी आपल्या राणीला, आमच्या मातोश्रींना सावध करा–

**प्रतिनिधी**:--रणांगणावर उतरून प्राणांची भिक्षा मागणारा शिपाई जसा जातीचा मर्द नव्हे, तसा शत्रूची, आईची सुद्धां किंमत न ओळखणारा बरकंदाज राजा नव्हे !

**शाहू**:---कोण–कोण तुम्ही ? शाहूच्या राजेपणाचा मोर्तब आपल्या हातीं कुणीं दिला ? राणीसाहेबांच्या किती लाखाच्या जहागिरीवर आपला पिंड पोसला जातो ? आपलं तोंड बंद करायला किती अधीक जहागिरी आपल्याला पाहिजे ?

**प्रतिनिधी**:--दौलतीच्या आशेनं प्रतिनिधींची समशेर जर उपसली जाती, तर कृपेच्या आशेनं आपल्या पायींचे जोडे चाटणाऱ्या कुत्र्यांत नी प्रतिनिधींत आपल्याला इतकं अंतर कधींच दिसलं नसतं ! दौलतीच्या मोहिनीवर कर्तबगारांना झुलवणारा राजा, मोंगली मनोवृत्तीचा बंदा, आज ना उद्यां, साऱ्या महाराष्ट्राला, स्वार्थी पोट-भरूंचा बाजार करून सोडल्याशिवाय कसा राहील ?–राजे आपल्या मोगली वृत्तीला खऱ्या मराठशाहीचा विसर पडलेला दिसतो !–

**शाहूः**—आपण प्रतिनिधी तर? खंडोबा, ताराऊराजांच्या गळ्यांतले ताईत, नेकीचे नेकजात, आमच्याशीं मैदानावर दोन हात करूं पाहणारे हेच ते प्रतिनिधी?

**खंडोबाः**—होय हुजूर–

**प्रतिनिधीः**—अरेरे, खंडोबा, खंडोबा, "हुजूर" म्हणून झुकवलेली ती गर्दन मघाशीं सर्जेरावाच्या समशेरीनं उतरली जाती तर या डोळ्यांना तुझा हा आताचा अधःपात तरी दिसला नसता! सर्जेराव पहातोस काय, उपस समशेर नी उडव त्या विश्वासघातकी कर्मचांडाळाची गर्दन! साध्या शिलेदाराकडूनच काय पण नीच मारेकऱ्याकडून—

**शाहूः**—खामोष, बेजबाब जबान हालेल तर इथल्या इथं कलम करून हातीं दिली जाईल!—पण जाईल कशाला, स्वामिसेवेचा दिमाख दाखवून, प्रत्यक्ष स्वामीशीं विरोध करणारी अवलाद, मराठशाहींत राहतांच कामा नये! या भीमेच्या कांठावर, या पुंडांची निशाणी देऊन, इथूनच आमच्या स्वराज्याच्या पायघडीची आम्ही सुरवात करतों—

[ बिचवा काढून अंगावर जातो. ]

**सर्जेरावः**—खबरदार, पोलादी खांद्याशीं गांठ पडेल पुढं पाऊल झुकेल तर–

**खंडो०**—सरकार, असल्या बेहिमती मरणानं मरण्याइतके प्रतिनिधि कच्चे नाहींत आणि यांत आपल्याही इभ्रतीला कमीपणाच येणार! खंडोला बरोबरीच्या नात्यानं छेडणारा प्रतिनिधि, ब्राह्मणाचा बच्चा असला तरी, नेंकीचा सच्चा, पोलादी मनगटाचा बहादुर शिपाई आहे! उद्यां रणांगणावर झुंजांत जर हा समशेरजंग हरला, तर राजांचा केवढा गौरव होईल! या झुंजाकडं आशेनं टक लावून पाहणारा महाराष्ट्र आपल्या बाजूला खात्रीनं झुकेल!!

**शाहूः**—खंडो, तुमच्याकरतां, याला यावेळीं जिवदान देतों—पण–

**प्रतिनिधिः**—पण खंडोबाच्या उपकारांत जगायची प्रतिनिधीची इच्छाच नाहीं! हातीं पोलाद शाबूत असे तों, आईसाहेबांच्या नावानं, आपल्याशी झुंजायला प्रतिनिधी तयार आहे!

**शाहूः**—इतका ताठा? इतका दिमाख? इतका आत्मविश्वासाचा वडेजाव? नाहीं, खंडो, हें आमच्या वृत्तीला सहनच होत नाहीं! शंभुराजाच्या अवलादीला इतका चेंढलपणा मंजूर नाहीं!

**खंडो०**—मायभवानीची, माता येसूबाईची आण आहे आपल्याला! प्रतिनिधी आजदिन खंडो जर आपल्याशीं कधीं खऱ्या दिलानं वागला असेल,—खरोखरच मराठशाहीला खंडोचं कधीं सहाय्य झालं असेल तर यावेळीं माघार घ्या, नी उद्यां रणांगणावर वीराच्या तोलानं राजांना सामना द्या! खंडो दोघांचाही हात धरणार नाहीं——

**शाहू**:—खंडो, पुन्हां एकदां तुमच्याकरतां हृदयांत उसळलेली विकारांची लाट आम्हीं आवरून धरतों! प्रतिनिधी वीरांचं नांव सांगतोस, जा, उद्यां भीमेच्या कांठीं शाहूच्या समशेरीच्या टापूत खडा रहा! नाहीं तर—

**प्रतिनिधि**:——प्रतिनिधिच्या मनगटांतून कांकणांचा आवाज नाहीं निघत राजाजी! हें युद्धाचं आव्हान, मोठ्या आनंदानं आम्हीं घेतों! सर्जेराव, चला, दिल्लीच्या चांदाखालीं महाराष्ट्राला विसरून, त्याच्या रक्ताचे खळाळ फोडूं पाहणाऱ्या शाहूराजांना महाराष्ट्र कशाचा बनला आहे तें तरी दाखवूं—

[ जाऊं लागतात ]

**शाहू**:—सर्जेराव, शिपुड्याला शेराचं मरण मिळत नाहीं! पायरी सोडून आमची अदब मोडूं पहाणाराचं मरण फार भयंकर स्वरूपाचं असतं!—फीर—मागं फीर.

**सर्जे०**:—सर्जेराव प्राणाला भिणारा असता, तर बेडर छातीनं इथं घुसलाच नसता! महाराष्ट्राचा शिपुडा सिंहाच्या तोलानं मरतो, हें राजांना केव्हां, कुठं पटवून द्यायला पाहिजे? फर्मावा! राजांना महाराष्ट्राची अजून ओळख व्हायची आहे म्हणून विचारतों!

**शाहू**:—प्रत्यक्ष राजांना न ओळखणारी बदअवलाद—

**प्रतिनिधी** / **सर्जेराव** }:—हां—खबरदार—

**प्रतिनिधी**:—म्यान झालेली समशेर पुन्हां बाहेर सरकेल—

**खंडो**:—सरकार, खंडोकडं पाहून तरी थोडा शांतपणा—

**शाहू**:——तुमच्याकडं पाहतों म्हणून तर हीं धुंगुर्टी अजून गुंगतात! नाहींतर शाहूच्या चुटकीबरोबर केव्हांच होतीं कीं नवतीशीं झालीं असतीं! बदमाष——

**सर्जेराव**:——तेढा जाब पुन्हां निघेल तर—( तरवार उपसतो )



**खंडो:**—मायभवानीची, माता येसूबाईंची आण आहे आपल्याला! [ अंक ३ रा प्रवेश ५ वा ]

**शाहू:**—शाहू स्वतःच्या गोटांत आहे हें विसरलास ! माथेफिरू सैतान, शाहूच्या बंदिखान्यांत कुत्र्याच्या मोतीनं मरावं लागेल !—

**सर्जेराव:**--हातीं समशेर असतांना ?—( अंगावर जातो )

**शाहू:**--सबूर !-शिपाई, (सर्वबाजूनीं, भालाईत सर्जेरावावर भाले रोखून येतात.) प्रतिनिधी, उद्यां सूर्योदयाबरोबर शाहूची समशेर तुझी वाट पहात राहील ! भालाईत, प्रतिनिधीला गोटाबाहेर पोंचवा;-या बेमुर्वत कुत्र्याला लोखंडी लंगर ठोकून डांबून टाका !-खंडो, पुढचा विचार करायला तुम्ही आतांच हजर व्हा ! उद्यां विजयी होऊन सातारला गेलों कीं किल्ल्याच्या दारीं हा माजलेला पहिला बळी देऊं ! समजलात ?

( जातात. )

**अंक २ रा समाप्त.**

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

[ स्थळः-सातारा. अजिमताऱ्याची आंतील बाजू. ]

**शेवंताः**—वकुळा, लांब लांब कुणी दिसतं कां ग ?

**बकुळाः**—( पाहून ) लांब काय दिसणार ? किल्याकडं येणारा एकाददुसरा घोडेस्वार नाहीं तर एकादा सांडणीस्वार—

**शेवंताः**--हो, आणि म्हणूनच विचारतें--एकादा शिपाई शिलेदार दिसतो कां ग ?

**बकुळाः**—अस्सं-अस्सं ! सर्जेरावांची काळजी लागली आहे होय ? मग सरळच-विचाराना ! पण इतकी दूरची ओळख मला कशी पटावी बाई ! ज्याचं माणूस त्यालाच ओळखतां येतं !

**शेवंताः**—होय, आणि त्याच आशेनं लांव दूरवर, सकाळपासून हजारदां नजर फेकली असेल; पण एकदम टचकन् डोळ्यांत पाणी येऊन पुढचं कांहींच दिसेनासं होतं ग बकुळा ! जीव उद्याच्या आशेवर उत्साहानं,-आनंदाच्या गगनांत भराऱ्या मारतो तर दुसऱ्याच क्षणाला, पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणं नकळत्या कारणांत जड होऊन, दुःखाच्या दर्यांत पुन्हां तरंगूं लागतो !

**बकुळाः**—जिवाचा सवंगडी असा फारवेळ मुलुखगिरीवर गेला म्हणजे जीव जडावतोच असा ! नाहीं नाहीं तीं स्वप्नं पडून साखरझोपेंतच प्रीतीची शेज शिणगारणं हें नवत्या नारीला नवीन नाहीं—

**शेवंताः**—असल्या शेजशिणगारांच्या कल्पनेनं जीव व्याकुळ होतो असं कां तुला वाटतं ?-पण कां कुणास ठाऊक, अगदीं नाजूक-नाजूक कसल्या तरी रेशमी धाग्यानं जीव तिकडच्या पायांशीं गुंतल्याप्रमाणं ओढ लागते ! मुलखावर शिपाई सुखरूप असल्याची वार्ता जरी कानीं आली तरी, त्याच्या मनोमय मूर्तीला रंजवण्याकरतां प्रीतीची सारंगी छेडायला, त्याच्या लक्ष्मीला आनंद-आनंदच वाटतो हो !

[ गर्भा–गझल ]

**घडि घडि सखया ॥ दयिता सुखविलासा ॥ नाथ हा ॥**
**नेत्रिंच डोले ॥ बोले सारखा ॥ ध्रु० ॥**
**व्याकुल जायाकाया ॥ सलिल रमाया ॥ ओपिता**
**साजणी ! ॥ मायापाश हा ॥ १ ॥**

**बकुळाः**——घोडदौडीनं उधळलेल्या धुळीच्या लोटांत घोड्यासह दिसेनासा झाला खरा ! कोण बरं ?

**शेवंताः**——बकुळा, जा. जा नी आईसाहेबांना सांग कीं कुणी तरी स्वारीवरून–तो पहा–गड चढूं लागला तो.–जा जा. धाव.

( बकुळा जाते. )

देवा, आशेची निराशा करूं नकोस ! निराशेच्या आशेवरही जगण्यांत एक तऱ्हेचं आनंदी समाधान असतं !–तेवढं तरी मला लाभूं दे ! प्रत्यक्ष निराशेपेक्षां, आज आशेची माया दाखवणारी, भविष्यकाळांतली निराशा तितकी दारुण नसते ! माझा शिपाई——

**प्रतिनिधीः**——( प्रवेशून ) कोण ? शेवंता ? प्रत्येक महत्वाच्या वेळेला तूंच कशी सामोरी ? हा सौभाग्याचा शुभ शकून भावि सुखाचा सूचकच असेल कां ?

**शेवंताः**——तर मग मी सौभाग्यवती ना ? धनी खुशाल ना ? मामंजी, मामंजी, आपल्याकडं जपणुकीस ठेवलेला माझा सौभाग्यचुडा अभंग ना ?

**प्रतिनिधीः**——अजून देवाच्या दयेनं अभंग आहे–

**शेवंताः**——म्हणजे ?–बोला;–जीव अर्धा झाला ! या अर्ध्याच बोलानं जीव कंठाशीं आला ! माझ्या कुंकवाचा राजा मैदानावर कुठं सोडलात ? स्वामी, पोरीचं मंगलसूत्र कुणाच्या हातीं निरवून आलात ?

**प्रतिनिधीः**——दावेदाराच्या हातीं ! शेवंता, दावेदाराच्या हातीं ! शेवंता, शेवंता, तुझ्या डोळ्याला डोळा द्यायचा धीरच होत नाहीं ! ज्या हातांनीं तुझा विसकटतां मळवट सावरायचा, त्याच हातीं तो वाढवला जाईल कीं काय भीती वाटतं ! ज्या बापाच्या प्रेमानं तुला " अखंड सौभाग्यवती " म्हणून आशीर्वाद द्यायचा, त्याच बापाच्या नशिबीं, तुझ्या चुड्यावर घाव घालण्याची कसाबकरणी करण्याचा प्रसंग आला !

**शेवंताः**—सरकार, बोला, निर्वाणीचा बोल बोलून, जिवाचा भार हलका करा ! माझा शिपाई, समशेर गाजवतांना शत्रूच्या हातीं पडला कीं दौलत राखण्याकरतां त्याला शत्रूच्या हातीं सुपूर्त करावं लागलं ?

**प्रतिनिधीः**—शेवंता, तुझ्या शब्दा शब्दाबरोबर, सर्जाशेवंतासारखे मोतीदाणे देवानं या पडत्याकाळीं, या मराठशाहींत कशाला निर्माण केले, म्हणून ऊर भरून येतो ! शेवंता, मानाचं मरण घेण्याकरतां, माथ्याचा भडक पण वृत्तीचा सीधा शिपाई, तुझा राजा, माझा सर्जा आपण होऊन सिंहाच्या पंजांत शिरला—

**ताराऊः**—( प्रवेशून ) आणि तुम्ही इथं ? लढाई न देतां, पळपुट्याप्रमाणं अपजयी तोंड घेऊन परत आलात ? शिलेदारानं फर्जंदाचा पराक्रम करावा आणि आमच्या फर्जंदांनीं बाजारबुणग्यांनाही लाज लावावी ?

**प्रतिनिधीः**—प्रतिनिधीची अवलाद इतकी भेकड असती तर आईसाहेब, इतक्या तातडीनं पायांशीं धाव घेतोंच ना ! धनाजीखंडोप्रमाणं शाहूच्या पैजारा पुशीत, कोटकल्याण करून घेण्याकरतां, शाहूच्या इच्छेचा गुलाम होऊन, सातान्यावर चढाईकरतांच आलों असतों !

**ताराऊः**—काय ? सेनासागर धनाजी शाहूला मिळाले ? खंडो बेइमान झाले ? सारी दुनियाच बेहराम झाली कीं आमचीच सद्दी संपली ?

**प्रतिनिधीः**—सरकार, शाहूशीं केल्या कराराप्रमाणं, मैदानावर लढाईच्या तयारीनं उभा राहिलों; वाटलं होतं कीं धनाजी तरी हरामखोर होणार नाहीं ! पण आयत्या वेळीं धनाजीनं दगा दिला ! सलामीच्या तोफा झडल्या; सैन्याला सैन्य भिडलं; धनाजी इमानाला जागून मैदान राखणार असं वाटलं; पण शाहूचा हत्ती जवळ घेऊन त्यानं आपणांवरच मोर्चा फिरवला ! सेनासागर दगलबाज ठरला !—सरकार, आपला भगवा झेंडा आपल्या सुपूर्त करण्याकरतां, उपसली समशेर तशींच म्यानबंद करून माघार घेतली ! हा मराठशाहीचा भगवा झेंडा, ही मराठ्यांच्या पवित्र पराक्रमाची ध्वजा आपल्या स्वाधीन करून, दुस्मानशीं मरेपर्यंत झगडायला प्रतिनिधी तयार आहे ! झाल्याचाकरींत कसूर वाटत असेल, तर ही समशेर पुढं आहे;—अजिमतान्याच्या पायरीवर प्रतिनिधीच्या रक्ताचा सडा होऊं द्यावा ! जिवाची ज्योत या सिंहद्वारावर पाहरा करून, शाहूला विरोध केल्याशिवाय राहणार नाहीं !

**ताराऊः**—सरदार, ती समशेर म्यानबंद करा !—मनसुबा असा फसला तर ?

**प्रतिनिधीः**--होकार द्यायलाही जीभ उरली नाहीं धनी !

**ताराऊः**—पंत, जीव जड होऊं देऊं नका ! राष्ट्राचं निशाण अब्रूनं परत आणलंत–यांतच आम्ही भरून पावलों ! एकाकी असतांना यापेक्षां कोणता पराक्रम तुम्ही गाजवणार ?–हेंच निशाण आपल्या भाग्योदयाला कारण होईल !–शेवंता,–सौभाग्यवती आहेस; आम्ही विचारांत धुंद असतांना, प्रत्यक्ष अंबा भवानीच्या जागीं तूं आम्हाला दिसलीस; तुझ्याच हातीं हा झेंडा गडावर उभारूं दे ! शाहूराजे फंदफिसाद करून मोगली काव्यांत दौलत बळकावूं पाहतात !–आम्हाला त्या मार्गाची जरूरी नाहीं ! राजाच्या तोलानंच आम्ही त्यांच्याशीं सामना देऊं ?–प्रतिनिधी, साताऱ्ची नाकेबंदी एकदम होऊं द्या ! सातारा पडला तर ताराऊ कुऱ्याच्या मोतीनं दुष्मनच्या लाथाखालीं तुडवली जाईल ! आमच्या अन्नावर पोसलेले कर्मचांडाळ, आमचा अवमान केल्याशिवाय राहणार नाहींत ! शंभुराजांनीं सासुबाईंना चिणून ठार केलं; त्यांचेच पुत्र, हे मोगली दरबारचे राजे, आमची जिवंत कबर बांधल्याशिवाय राहणार नाहींत !–बालराजे--

**शेवंताः**—आईसाहेब, हें काय ?–डोळ्यांत, आसवांची जलवंती काय म्हणून ?

**ताराऊः**—सूर्याच्या प्रखर किरणानं न द्रवणारा चंद्रकांत, चंद्राच्या शांत किरणांनीं पाझरूं लागतो म्हणतात ! शेवंता, कोणत्याही प्रसंगानं न डगमगणारं हें–ताराऊचं-आईचं हृदय–बालराजांच्या कल्पनेनं सुद्धां व्याकुल होतं ! माझ्या बालचंद्राची कला, आतां तुम्हां नक्षत्रांच्या तेजानं वाढणार ! !

**शेवंताः**--असल्या कळवळ्याच्या बोलीनं दगडधोंड्यांत सुद्धां चैतन्याचा संचार होईल मग आमच्या सारखीं जित्या हाडामांसाचीं माणसं, पंचप्राणांची उधळण कां नाहीं करणार बालराजावरून ?

**ताराऊः**--आणि याच खात्रीवर विसंबून, याही परिस्थितींत सवता सुभा उभारण्याचा आम्ही चंग बांधतों ! या शेवटच्या घरांत कोंडमारा झाला असतांना सुद्धां भाग्याच्या ताऱ्यावर विसंबून, मानानं मरण्याचा आम्ही निर्धार केला आहे ! शेवटपर्यंत सातारा झुंजवूं–नाहीं तर–

**प्रतिनिधीः**--नाहीं तर काय आईसाहेब ? कोणता मनसुबा ? या शेवटच्या घरांत फंद फिसादानं गळेचेपी होणार नाहीं कशावरून ?–पुढचा मार्ग सुकर करून, हें घर लढवणं यांतच आतां बुद्धीची करामत दिसणार आहे !

**ताराऊः**--वेळच पडेल तर बालराजांना पन्हाळदारांनं कृष्णेपार न्या! पन्हाळ्यावर बालराजांना सुखरूप पावते करा!-दक्षिण भागांत सवता सुभा उभारा!-पण-मोगली वृत्तीचं वारं सुद्धां बालराजांच्या या मराठदौलतीला लागूं देऊं नका!

**शेवंताः**--आणि आपण ?

**ताराऊः**--आमच्या मानामागं! मानानं मरणं म्हणजे मृत्यूवर मात करणं! ताराऊ या लढ्यांत जिवंत राहिली, तर पोराच्या दौलतीचा अपहार करण्याकरतांच तिनं ही यादवी सुरूं केली, असाच आमचा दुर्लौकीक झाल्याशिवाय राहणार नाहीं! शंभुराजांनीं, नी शाहूनीं आम्हावर केलेले अन्याय, अनाचार या भोळ्या भाबड्या महाराष्ट्राला दिसणार नाहींत! नाचवील तसा नाचणारा हा आमचा भोळा महाराष्ट्राचा नाग, या मोगली कारवाईच्या पुंगीवर डोलूं लागल्याशिवाय कसा राहील ?

**शेवंताः**--पण काळाला डोळे आहेत. आज ना उद्यां या दुहेरी डावांत, शिवाजी महाराजांच्या पुण्याईची गादी अखंड चमकत राहिल्याशिवाय राहणार नाहीं!-

**ताराऊः**--तुझ्या तोंडीं साखर पडो!-प्रतिनिधी, वेळ दवडण्यांत अर्थ नाहीं. क्षणाची मोजदाद सवत्सरांच्या हिशेबीं करण्याचा प्रसंग आहे! वाईकर शेखमिरा वगैरे अजून विश्वासांत असलेले लोक, ताबडतोब बोलावून घ्या! गडाचा बंदोबस्त इतका कडेकोट असूं द्या, कीं या बुरुजावरून डागलेली पहिली तोफ, आपल्या तयारीची शाहूला खात्री पटवील!!

**प्रतिनिधीः**—आज्ञेप्रमाणं आतांच कामाला लागतों हुजूर!

**ताराऊ**--शेवंता, भगवा झेंडा साजऱ्या कपाळानं नी भरल्या हातानं महाद्वारावर उभार! नी अभिमानी ताराऊनं, आईला विसरणाऱ्या पोरावर चढाई करण्याकरतां नव्हे तर दौलतीच्या पावित्र्याकरतां सवता सुभा उभारला असं महाराष्ट्राला जाहीर होऊं दे!

**शेवंताः**--( प्रतिनिधींकडून झेंडा घेऊन ) हें राष्ट्राचं निशाण माझ्या हातीं उभारतांना, आईसाहेब, माझा भंरवसा वाटतो आपल्याला ?

**ताराऊः**—कां बरं ? कां वाटूं नये ?

**शेवंताः**--ज्या सौभाग्याच्या मंगल भरंवशावर आपण मला हा मान देतां तो माझा कुंकवाचा धनी-दावेदारा हातीं—

**ताराऊः**—वेळ आली तर शेवंता काय करील याची खूणगांठ मनीं आहे म्हणूनच ताराऊनं निश्चिंतपणानं हें काम तिला दिलेलं आहे! समजलीस?—हें सवत्यासुभ्याचं निशाण आज शेवंताहातीं उभारलं जात नाहीं तर प्रत्यक्ष अंबा-भवानी करून उभारलं जात आहे असाच पडसाद आमच्या मनीं येतो!

**शेवंताः**—पतीच्या मोहानं मी विश्वासघात करणार नाहीं कशावरून?

**ताराऊः**—त्याच वेळीं या निशाणाखालीं शेवंताच्या देहाचे तुकडे तुकडे उडतील!

**शेवंताः**—त्यापेक्षां सरकार, पतीच्या मोहाचा संन्यास याच घडीला घेऊन, हा स्वातंत्र्याचा झेंडा, उभारणं काय वाईट? ( झेंडा उभारते ) उद्याचा भरंवसा कशाला देऊं?–हा पहा, धनी दुस्मानाचा बंदिवान असे तों-या कपाळचा मळवट आपल्या हातींच मी वाढवला! ( कुंकू पुसते ) शेवंता, या स्वतंत्र झेंड्याची सावली झाली! माझं सौभाग्य, माझ्या मायदेशाला, माझ्या चिमण्या राजाला मी आनंदानं बहाल केलं!

[ राग. अडाणा. त्रिवट ]

**त्याले टिळा ॥ शुभदा ॥ त्यागचि ॥ नाथहि**
**त्यजोनि ॥ भाळां ॥ ध्रृ० ॥**
**याग सुखाचा हा ॥ तेज जिवाला; ॥ निशा-**
**रंग-प्याला ॥ १ ॥**

**ताराऊः**—शेवंता, शेवंता–या ताराऊलाहीं तूं लाजवलंस! काय देऊं तुला? जिवाच्या करारावर तुझं सौभाग्य तुझ्या स्वाधीन करून, तुला चोळीबांगडी करूं त्याच वेळीं बालराजांचं राज्यारोहण! प्रतिनिधी, या आमच्या मुलीचं सौभाग्य तुमच्या पराक्रमावर आहे!-तिचा पति, सवत्या सुभ्याचा शिलेदार–सर्जेराव, परत सुखरूप आला पाहिजे–मग त्याला कशाचाही मोबदला पडूं द्या!

**प्रतिनिधीः**—या प्रतिनिधीच्या सोबतींत काळाहातीं सांपडलेला सर्जेराव, जिवाच्या किंमतीनं परत मिळवता आला तरी बेहेत्तर–

**ताराऊः**—तर मग ताराऊच्या सवत्या सुभ्याची प्राणप्रतिष्ठा झाली, असं गर्जवणाऱ्या तीन तोफा आतांच डागा! शेवंता, या नव्या राष्ट्रीय झेंड्याला, या नव्या चैतन्याच्या ज्योतीला वंदन कर–

[ रागः–मालकंस, झपताल ]

**विमल–जय–कामा ॥ आनंद–प्रेमा ॥ ध्वजा सुयश नामा ॥ ध्रु ॥ अजिं राष्ट्र–कार्या ॥ जणुं हो पथिक हा ॥ नवमार्गदाया ॥ सुधामा ! ॥ १ ॥**

**शेवंताः**––मराठ्यांच्या निशाणा, शिवरायाच्या पुण्याईची गंगा, तुझ्या रूपानं स्वर्गांतून उतरते असंच वाटतं ! तुझ्याच साउलीच्या आसऱ्यावर माझ्या चिमण्या राजाचं सिंहासन आहे ! मायापाखर उणी पडूं देऊं नकोस !–

[ रागः–सारंगः केरवा ]

**नव महाराष्ट्र–विजया ! ॥ निशाणा नमुं या ॥ ध्रु० ॥**
**नव्या मनूचे ॥ शिलेदार तव ॥ प्याले चैतन्या ! ॥ १ ॥**
**स्वातंत्र्याचा ॥ जयमद चढला ॥ नमवूं जग पायां ॥ २ ॥**
**निस्वार्थाचा ॥ पूर्णकलेचा ॥ उसळत जनिं दरिया ॥ ३ ॥**
**नवलाखाचा ॥ जीव सुखाचा ॥ उधळूं तव पायां ॥ ४ ॥**

पडदा पडतो.

---

## प्रवेश २ रा.

[ स्थळ–अजिमतारा. बकुळा दौलतीला व दौलती बरकतखानला ओढत येतो. ]

**बकुळाः**––तें कांहीं नाहीं ! लढाईची तयारी तुम्हाला केलीच पाहिजे ! किल्ला उद्यां झुंजायला लागला म्हणजे काय मेषपात्राप्रमाणं चुलीपुढं बसणार ? ऐकलं कां कारभारी ?

**दौलतः**––ऐकलं कां बरकत ?

**बरकतः**––हां जी बराबर !

**बकुळा**––बराबर काय ? लढाईला तयार आहात कां ?

**बरकतः**––वैसा कभी बोल्या ? लढाई, झुंज–हमकू कूच मालुम नहीं पड सकता !

**दौलतः**––नुसतं बुद्धीचं काम करायला सांग म्हणून हजारदां सांगितलं ! या लढाईचीच जर तुला हौस होती तर एकाद्या भाल्याशींच कां नाहीं लग्न लावलंस ? कलावंतीण नाहीं कां कट्यारीशीं झुलवा लावीत ? तशीच तूंही–

**बकुळाः**—खरबदार भलतं सलतं बडबडाल तर !

**दौलतः**—मला वाटतं तोफेची कल्पना तुझ्या सारख्या बोलभांड बाईच्या तोंडावरून सुचली असावी–

**बरकतः**—हां हां–वैसाच–

**बकुळाः**—वैसाच काय ? लाज नाहीं वाटत वैसाच म्हणायला ? उद्यां शाहूचा हल्ला आला म्हणजे कां तोंडाचा तोफखाना सुरूं करणार ?

**दौलतः**—पण प्रत्येकानं लढलंच पाहिजे असं थोडंच आहे ! शिवाय प्रतिनिधींचा पराभव झाल्यापासून चढाईचं धोरण संपलं ! आतां बचावाचं धोरण सुरूं झालं आहे !

**बरकतः**—अगदी बराबर ! अगदी वैसाच ! चढाई और लढाई एकदम खलाश हो गई–

**बकुळाः**—मग बचाव तरी कसा करणार हे शेंदाड शिपाई–?

**दौलत**—लढाईंत हाताचं नी डोक्याचंच काम लागतं ! बचावाच्या लढाईंत सुद्धां त्यांची जरूरी असतेच ! दोन हस्तक नी तिसरं मस्तक लवचीक असलं–कीं बचावाच्या लढाईंत हमखास फत्ते ! कशाचंही भय नाहीं मग ! समजलीस ? डोक्यानं चालून, लढाईंत डोकंच गमावण्याचा प्रसंग बहुतेक येतो, पण या पळत्या पवित्र्यांत डोकं जायची भीती कधींच नाहीं !

**बकुळा**—कोणत्या मुहूर्तावर जन्म झाला हो तुमचा ?

**दौलतः**—मला वाटतं त्यावेळीं एकही नक्षत्र माझ्या राशीवर नसेल, म्हणून तर तुझ्यासारखा मंगळ जन्माचा माझ्या बोकांडीं बसवला देवानं !

**बकुळाः**—उगीच शब्दांची सरबत्ती नको आतां—

**दौलतः**—नाहीं–कृतीच करून दाखवतों कीं—( जाऊं लागतो )

**बकुळाः**—चाललात कुठं ? काय तें स्पष्ट सांगितल्याशिवाय मी नाहीं जाऊं द्यायची—

**दौलतः**—मग सरळ तोफेच्या तोंडीं बांधीनास आम्हाला ? हूं कीं चूं करणार नाहीं ?

**बरकतः**—मगर लढाई नको—

**बकुळाः**—तें कांहीं नाहीं; तुम्ही लढाईला तयार झालंच पाहिजे !–नाहीं तर–

**बरकतः**—लढाईनं जीव जातो म्हणतात; पण आज लढाईनंच जीव जगवायचा बुरा वखत गुदरला ! क्या किया जाय ? शाहूला दुसरा एखादा जासूद नाहीं कां सांपडला इथं पाठवायला ?

**दौलतः**—बरकतखान—

**बरकतः**—दौलतसिंग—

**बकुळाः**—असा आरडा ओरडा काय करतां उगीच ? तुम्ही दोघेही चांगले धडधाकड आहात; हातीं समशेरी घ्या !–नी दोन वेडे वाकडे तरी हात फिरवा. वेळच आली तर जीव जगवायला तरी उपयोग होईल !

**दौलतः**—नुसत्या या लुटुपुटुच्या लढाईनंच जर तूं शांत होणार असशील तर एकदां सोडून हजारदां ही कसरत करून दाखवूं—

**बरकतः**—हां–वैसाच–

**दौलतः**—पण ऐन वेळीं मात्र मूळचं पाणी बाहेर आल्याशिवाय राहाणार नाहीं ! शेवटीं माझं डोकं, मला डोक्यानंच जगवावं लागणार !–आहेस कुठं ?

**बरकतः**—लढाई बिढाई रानवट लोकांचीं कामं ! आपल्यासारख्यानं कसं आरामांत, खुषींत राहिलं पाहिजे ! आमच्या तिकडं "शिपाई" म्हटला कीं विन डोक्याचा फटिंग असा अर्थ होतो ! शिपाई म्हणजे आगा ना पीच्छा असा एक पोळ !

**बकुळा**—पण इथं त्याच्या उलट स्थिती आहे मियाजी ! आतां अधीक बडबड कराल तर चांगलीच चांदरात उडवावी लागेल ! ध्यानांत ठेवा.–माझ्या मुळं एकदां तुमचे प्राण वाचले आहेत—

**बरकतः**—मग दिलेली भिक्षा परत घेण्यांत काय बरं चांगुलपणा वकुळाजान ? तुम्ही ही लढाईची वार्ता सोडून कोणतंही भयंकर काम सुनवा–

**दौलतः**—हां–समालो–बरकत समालो ! भडकत चाललात ! बायकांनीं सांगायचीं कामं कशीं नाजूक, लुसलुशीत असलीं पाहिजेत ! वकुळा, इतर शिपायांच्या बायका घरधन्याला फुलांत ठेवूं कीं जिवांत ठेवूं असं वागतात; आणि तुझी पाहिली तर मुलखान्यारी तऱ्हा ! या दौलतीची मान आपली सदा तरवारीशीं बांधलेली ! त्यापेक्षां एक सोपी युक्ति सांगूं कां तुला–?



**दौलतः**—नवी कल्पना ! नवी युक्ति ! ! बरकतखान, कान लांबकरा—

[ अंक ३ रा प्रवेश २ रा]

**बकुळाः**—कसली ?

**दौलतः**—आम्हाला ही तरवार भाल्याची कसरत सांगण्यापेक्षां तूंच दोहातीं पट्टा चढव; आणि " हरहर महादेव " म्हणून तुटून पड आमच्यावर ! तुझंही समाधान होईल ! माझ्याही डोक्याची परीक्षा होईल ! तुला दाखवून देतों कीं दौलतीचं डोकं तरवारीपेक्षां अधीक करामती आहे-!

**बकुळाः**—अहो पुरुषासारखे पुरुष असून, हातांत बांगड्या भरल्या प्रमाणं स्वस्थ कसेंहो बसतां ?-बरकतखान, तुम्हाला जगायचं कीं मराय—

**बरकतः**—जगना-जगना-

**बकुळाः**—आणि तुम्हाला ?

**दौलतः**—मरून मुडदा झालों तरीसुद्धां लढणार नाहीं !

**बकुळाः**—आहारे वीर !

**दौलतीः**—पण अकलेचा आहेना खंबीर !

**बकुळाः**—छेः छेः कान किटले या बडबडीनं ! अहो-तुमच्या जिवाकरतां नाहीं तर निदान माझ्या कुंकवाकरतां तरी हातीं तरवार घ्या !-नाहीं तर अशी अकलेची खुंटी पिरगळून ( कान पकडते ).

**दौलतीः**—नवी कल्पना ! नवी युक्ति ! बरकतखान, कान लांब करा ! कान लांब करा ! लढण्यापेक्षां हीच युक्ति छान आहे ! !

**बरकतः**—वैसा ? फिर मेराभी कान पकरो ! पकरो कान-( कान पुढें करतो. )

**बकुळाः**—हे नंदीबैल असेच नेऊं कां आईसाहेबांच्याकडं ? पण मलाच मेली दया येते ! आईसाहेबांच्या रागांत तोफेच्या तोंडीं गेले, तर फुटक्या कपाळाची म्हणून माझं कुणीं तोंडसुद्धां पाहणार नाहींत !

**दौलतः**—काय छाती आहे आईसाहेबांची आम्हाला तोफेच्या तोंडी द्यायची ? कसलाही बिनदिलाचा सैतान येऊं दे ! याच स्थितींत जर त्यानं आम्हाला पाहिलं तर " जगांतले खरे निरुपद्रवी प्राणी " म्हणून आम्हाला बहादुरीच मिळेल !

**बरकतः**—हां वैसाच ! तोफेचं तोंड तुमच्यापेक्षां कां अधीक भयंकर असणार ?

**बकुळाः**—छेः छेः वेड लागायची वेळ आली ! जा-मेल्यांनो-तुमचं नशीब तुमच्याबरोबर ! ( दोघांचे कान हिसकून ढकलून देते. ते दोन बाजूस पडतात. )

**दौलतः**—( पडतांना ) जय बुद्धिमाता !

**बरकतः**—( पडतांना ) आल्लाहु अकबर ! !

**दौलतः**—बरकतखान–

**बरकतः**—( पडल्या जागेवरून ) आबादी आबाद है !

**बकुळाः**—नवरा म्हणजे बायकोचा ‘ देव ’ म्हणतात;–देव म्हणजे असला दगडच कां ?–देवा–देवा–असल्या धन्यापेक्षां मला–

**दौलतः**—खंडोबाची मुरळी कां नाहीं केलीस ?

**बरकतः**—और कडक बिजली क्यं नहि बनाया ?

**बकुळाः**—या पागलखान्यांत एक क्षणभर अधीक राहिले तर मलाही वेड लागेल ! जा–काय वाटेल तें करा !–पण धनी, पुन्हां, जीव रहात नाहीं म्हणून सांगतें–जीव वाचवायची कांहीं तजवीज पहा !–हा मियाजी नाहीं बरं कामीं यायचा !

( जाते. )

**दौलतः**—( हळूच उठून ) बरकतखान–

**बरकतः**—सुटलों सही सलामत !

**दौलतः**—आतां पुन्हां म्हणून ही वाटेला नाहीं जाणार ! आतां डोक्याचं काम आलं ! ठीक आहे; शाहू आज ना उद्यां किल्ला पटकावणारच ! आतां तुमचं काम आलं ! आईसाहेबांनीं बाईच्या शेखमिराला बोलावून किल्ल्याचा बंदोबस्त त्यांच्याकडे दिला आहे. अर्धवट तुमच्याच रक्ताचा आहे–

**बरकतः**—मगर मैबी आधा तुमारा पेहरावका है–

**दौलतः**—प्रसंग आला कीं तुमची गांठ घालून देतों ! शाहूचा माणूस म्हणून न डरतां वार उडवा म्हणजे झालं !–सहज–सहज मोकळे होऊं !– शिवाय फत्ते झाल्यावर राजे दौलत देतीलच–

**बरकतः**—अलबत् ! दौलत–आपका बरकत जरूर हो जायेगी !–चलो ये खुशालीके वास्ते–आखीरात निशा जरूर चाहीये ! !

—जातात—

## प्रवेश ३ रा.

( **स्थळः**—भीमातटाक. शाहूची छावणी. शाहू प्रवेशतो. )

**शाहूः**—मुहूर्तानं दिल्ली सोडून मुलखांत आलों; आमचे विश्वासाचे सरदार आम्हाला–दर्याच्या भरतीनं मिळाले;–मैदान मुकाबल्याशिवाय हातीं आलं !–आई-साहेबांशीं आम्ही दुस्मनदावा मांडला म्हणून जग आम्हाला दोषी ठरवणार असेल तर खुशाल ठरवो ! पण कैलासवासी राजांनीं राजारामराजांच्या जपणुकीस–ठेवलेल्या आमच्या सिंहासनावर आमचा हक्कसंबंध आहे असं आम्ही कां समजूं नये ? दिल्लीच्या सार्वभौम बादशाहानं, आमचं राजेपण कबूल केल्यानंतर, आईसाहेबांना त्यांत कमीपणा कां वाटावा ? मोगली रियासदींत लहानाचे मोठे झालों;–झेबुन्निसा बेगमनं पोराच्या प्रीतीनं आम्हाला कडीखांद्यावर खेळवलं,–मराठशाहीला मूठमाती देणाऱ्या अलंमगीरानं आम्हाला शहाजाद्याच्या इतमामनं वागवलं, त्यांचे उपकार स्मरणं म्हणजे मराठशाहीला विसरणं असं राणीसाहेबांना वाटतं तरी कसं ? आईसाहेब, आम्ही युद्धाची हाक देतांच तोफेच्या सरबत्तीनं आपण त्याचं उत्तर द्याल असं वाटलं नवतं ! पण हांजी खोरपणानं थुंकी झेलणाऱ्या, स्वाभिमानशून्य मोंगलांच्या सहवासांत–चौदा वर्षे घालवलेल्या शाहूला आपल्या वृत्तीचा अंदाज आला नाहीं ! एकंदरींत हा लढा दिसतो तितका साधा नाहीं ! आईसाहेब, आपल्या भोंवतालचे स्वाभिमानी भुजंग आमचा डूक धरणार तर !–कोण आहे रे ? ( सेवक येतो ) जा–नी खंडोबाला आमच्या दर्शनीं हजर कर–

**सेवकः**—खंडोबाच बाहेर आले आहेत हुजूर–

**शाहूः**—जा–एकदम पाठवून दे आंत–(सेवक जातो) स्वामीसेवेचा पुतळा खंडोबा आम्हाला मिळता ना तर भीमेच्या अलीकडं शाहूचे पाय महाराष्ट्राला लागणं मुष्कील होतं ! ( खंडोबा प्रवेशतो )–खंडोराय, कां–असे खिन्न कां ?

**खंडो०**—सरकार, जन्मांत जो अनुभव कधीं आला नाहीं तो अनुभव आला !–चाकरी कोणत्या विश्वासानं करायची ?–म्हणून चित्तांत अस्वस्थता आली.

**शाहूः**—कारण ?

**खंडोः**—खुल्या दिलानं जवाब पाहिजे ! धनीच जर दिल्या जबानाची कदर ठेवीनासा झाला, तर बाजारबुणग्यांत आणि राजांत तफावत काय ? दौलतीची

चाकरी करण्यांत काळ्याचे पांढरे झाले; पण राजानीं बोलल्या बोलांना बाध आणल्याचा हा पहिला प्रसंग–

**शाहूः**—खंडो कोणता बोल आम्ही दिला नी कोणत्या वचनाला आम्ही बाध आणला ?

**खंडोः**—सर्जेरावाला प्रतिनिधीच्या नौबदीच्या नादाबरोबर खुला करण्याचं–आपण मला वचन दिलं होतं–

**शाहूः**—खंडो, राजकारणांत मुरलेले मुत्सद्दी तुम्ही ! ही साधी गोष्टही तुम्हाला–समजूं नये ?

**खंडो०**—समजली, आणि म्हणूनच जबान खुली केली ! सरकार, हें मोगली राजकारण ? मराठी राजाचं राजकारण सीधं,–जंगलशेराच्या तडफीचं आहे ! शब्दाकरतां शीर देण्याचा बाणा आज दिन मराठ बहाद्दरांनीं दाखवला; मूठभर घांस दाण्यावर लढाईची रंगत खेळून, दिल्लीच्या कपटी कारवाईला दहशत बसवली !–पण आमचा राजा दिल्या शब्दाला जागत नाहीं हें जर या भोळ्या मराठमवळ्यांना उद्यां समजलं, तर महाराष्ट्राच्या किल्लेकोटाच्या दगडा दगडा आड दडालेले त्यांचे हात, एकदम दूर होऊन, सारे किल्लेकोट दगडाच्या दरडीप्रमाणं कोसळून पडल्याशिवाय राहणार नाहांत !

**शाहूः**—समजला आपला हेतु ! प्रतिनिधीलां मैदानावर पाहतांच त्या मगरूर जवानाला सोडून द्यावं असं एकदां आम्हालाही वाटलं होतं !–पण मागं आम्ही देऊं केलेल्या इनामांना बेकदर झुगारून, आज सुद्धां त्याच वृत्तीनं आमच्याशीं तेढ धरणाऱ्या या उद्दाम शिलेदाराला सोडण्यांत आमची चूक होईल असं वाटलं !–खंडो, तुमच्या इच्छेप्रमाणं अजूनही आम्ही सर्जेरावाला सोडून देऊं–पण–

**खंडो**—पण काय हुजूर ?

**शाहूः**—पण त्यानं केल्या उद्दामपणाची आमच्याजवळ माफी मागितली पाहिजे !–

**खंडोः**—सर्जेराव जातिवंत अवलादीचा असला तर या गोष्टीला कधींच कबूल होणार नाहीं !

**शाहूः**—मानाची किंमत प्राणापेक्षां अधीक आहे खंडो ?

**खंडोः**--शंभुराजांची आठवण याला पुरेपूर उत्तर देईल ! पण प्रत्यक्षाला पुराव्याची काय जरूरी ? आतांच सर्जेरावाचा निकाल होऊं द्यावा-पहारेकरी-

( पहारेकरी प्रवेशतो )

**शाहूः**--जा-नी सर्जेरावला आमच्या समोर खडा कर ! ( पहारेकरी मुजरा करून जातो ) खंडो, महाराष्ट्राची पुरी ओळखही नसलेल्या आमच्या वृत्तीला, हे प्रकार एकदां अजमावून पाहिलेच पाहिजेत ! ( सर्जेरावाला आणतात. ) सर्जेराव ! काय ? गर्दन अजून झुकत नाहीं ?

**सर्जेरावः**--गर्दन देवाच्या पायीं झुकते कीं एक खऱ्या राजाच्या पायीं नमते ! अस्सल मराठा, राजाला देवाच्या तोलानं मोजतो, आणि खरा राजा दिल्या जबानाची कदर देवाच्या मोठेपणानं राखतो-

**शाहूः**—पण राजाला देवाच्या तोलानं आमच्या प्रजेनं मापावं अशी आमची इच्छाच नाहीं !

**सर्जे०**—आपल्याला प्रजा अद्याप मिळायची आहे;-सातारा अजून दूर आहे !

**शाहूः०**—त्याच साताऱ्यावर आठ दिवसांच्या आंत आमचं निशाण फडकलेलं पाहशील ! हैवान,-जीवदान पाहिजे असेल तर अजून, अजून आमची मर्जी तुला मोकळं सोडायला तयार आहे !

**सर्जेः०**—जिवाच्या भिक्षेनं देहाची जोपासना करून सर्जेराव कोणता पराक्रम गाजवणार ? त्यापेक्षां या मानाच्या बंदिवासांत कुत्र्याच्या मोतीनं मारला गेलों, तर आपले कैलासवासी पिताजी, आमचा शंभुराजा, या मराठी शिलेदाराला स्वर्गात आपल्या पायपोसाजवळ तरी जागा देईल !

**खंडो०ः**--सरकार, हा शंभुराजांचा महाराष्ट्र ! हीच शिवाजीमहाराजांची पुण्याई !!

**शाहूः**--त्या पुण्याईला आम्ही विसरलों नाहीं म्हणूनच अद्याप याची बेलगाम जबान कायम आहे--

**सर्जे०ः**--जिथं गर्दन समशेरीखालीं झुकवली, तिथं जबान तुटली म्हणून काय वाटणार राजाजी ?

**शाहूः**—शेवटीं " राजा " म्हणून कबुली दिलीस ना ?

**सर्जे०:**—अलबत् ! आणि आपण मराठी रिवाजाला स्मरून, त्या मोगली पाठिंब्याला झुगारून, आईसाहेबांचा मान ठेवतां, तर एकजात मावळमराठ्यांनी "माझा राजा, माझा राजा" म्हणून साताराची दऱ्याखोरीं दणाणून टाकली असती !—

[ राग दरबारी.–त्रिवट. ]

**पुण्यभार फार थोर होतां ॥ नरमणिं तो जगतां; ॥**
**भूषण दे स्वकुलां॥अतुल नाम नच दावि लोभ-भावा धृ०**
**तळपतसे रवि चंडप्रतापें ॥ व्याकुळ हा जन थरकत**
**तापें ॥ शांत–कांति सुखदा शशि कां व्हावा ? ॥ १ ॥**

**खंडो०:**—सर्जेराव, बोलाला बोल वाढवून जीव धोक्यांत कां घालतोस ? पुढच्या काळावर नजर ठेवून सुटायचं असेल तर माथ्याचा थंडपणा थोडा—

**सर्जे०:**—कोण ? खंडोबा, आपण उपदेश करतां कां ? गेल्या कारकीर्दीपर्यंत आपणही असेच वागला असाल नाहीं ? तुम्हाला जर माझ्यावर उपकारच करायचे असतील तर एकच करा—

**शाहू:**—काय ?

**सर्जे०**—या बंदिखान्यांत कुजत ठेवण्यापेक्षां एकदम मरण—

**शाहू:**—असल्या बेडर वृत्तीनं शाहूला दिपवूं पाहतोस ? शाहू मेल्या मेंढराच्या दुधानं पोसला असता, तर या बोलानं विरघळून जाता ! कोंवळ्या कोंकराच्या नादानपणानं अशावेळीं आमचं मन दयेकडं झुकेल किंवा बिनशर्त आम्ही तुला सोडून देऊं असं कां तुला वाटलं ?—बोल–बेदर्द मराठा, कोणतं मरण तुला पाहिजे ?

**खंडो०**—सरकार–काय–काय हें ?

**शाहू:**—खामोष, हा प्रकार तुमच्या प्रेमळ डोळ्यांना पहावत नसेल, मुत्सद्दी-मेंदूला पटत नसेल तर इथून दूर व्हा ! शेराला छेडल्यानंतर प्राणांची आशा कां धरावी ?

**खंडो:**—अशाच तामसी वृत्तीनं जर महाराष्ट्राशीं आपण भिडणार असाल, तर पावला पावला बरोबर मराठ्यांचीं डोकीं आपल्याला ठेचावीं लागतील !—आणि पोटभरू हांजीखोरांचा सुळसुळाट महाराष्ट्रांत झाल्याशिवाय राहणार नाहीं !

**शाहू**:—तसा आणीबाणीचा प्रसंग येईल त्यावेळीं खंडोची मसलत आम्ही जरूर मानूं! पण असल्या विंचवाची नांगी तोडतांना, इंद्रपदाला हादरे बसल्याची कल्पना आम्हाला पटत नाहीं!

**खंडो**:—ठीक आहे!—सरकार सर्वस्वाचे मुखत्यार आहेत!—( जातो. )

**शाहू**:—बोल, जबान बंद कां? मृत्यूच्या कल्पनेंत तुझ्या बोलघेवड्या अवसानाला धडकी भरली? कोणता मृत्यू पाहिजे? याच बंदिखान्यांत आजन्म खितपत पडून? हत्तीच्या पायीं देहाचा चिखल करून? तुला कोणतंही इच्छामरण द्यायला शाहू तयार आहे—

**सर्जे०**—एकच मरण! आठ दिवसांत आपण सातारला भिडणार! आईसाहेबांचा मान राखण्याकरतां, आपण जी पहिली तोफ अजिमताऱ्यावर डागाल, त्या तोफेला या सर्जेरावचा देह बांधून उडवून द्या!—म्हणजे तोफेच्या धडाक्यांत आईसाहेबांच्या पायांवर सर्जेरावचं मस्तक, अजिमताऱ्यावर पडतांच, "सर्जेराव स्वामिकार्याकरतां मेला"—म्हणून माझ्या माऊलीला तेवढंच समाधान होईल! माझ्या शेवटाला धन्यता वाटेल!

**शाहू**:—असल्या बिनदिलाच्या फत्तरांशीं आम्हाला साताऱ्यावर झगडावं लागणार काय? ठीक आहे,—सामोपचारानं सातारा पडला नाहीं तर तुझ्या इच्छेप्रमाणं तुला तोफेच्या तोंडीं देऊन, यापुढं कच्चाबच्चांची सुद्धां आम्ही कत्तल उडवूं अशी आईसाहेबांची आम्ही खात्री करूं!—सामोपचारानं आईसाहेब याही वेळीं वळल्या नाहींत तर—

**सर्जे०**—फुकट ही कल्पना! आईसाहेबांच्या हृदयाचा पीळ अद्याप आपल्याला उलगडला नाहीं! आईसाहेबांचा पराक्रम अजिमताऱ्याच्या दगडधोंड्यांतून आपल्याला विरोध करील पण जबरदस्तीनं त्याचं दर्शनही आपणांस होणार नाहीं!

**शाहू**:—तेंच आतां आम्ही पाहणार आहोंत!—हुद्देदार, या बेमुर्वत शिलेदाराला सातारच्या मार्गावर चालू करा! सातारा आठ दिवसांत पडलाच पाहिजे!

—पडदा पडतो—

## प्रवेश ४ था.

( स्थळः—अजिमतारा प्रवेश करतात.-दौलत, बरकत. )

**दौलतः**--नाहीं पण कशी केली ? मियाजी, याला म्हणतात डोकं ? शेखमिराचा ससा हातीं आला म्हणून जीव बचावला ? आतां तेवढं निशाण उभारलंस कीं,-

**बरकतः**—कैसी हुवा ? अलमगिराचा दुसरा शहाजादा—शाहू अशी नाजुक करामत करील ऐसा मैकूभी मालूम था ? उत्तर हिंदुस्थानचा खासा इकड दक्षिणेंत घुसला कीं त्याचा डोळा पहिल्याप्रथम गोषाकड वळतो !

**दौलतः**—आणि म्हणून शाहूनं पकडलेला शेखमिराचा कबिला तोफेच्या तोंडीं देईन म्हणून त्यानं कळवलं होय बरकत, ? तुम्ही मोगली बेदाणे म्हणजे खरोखर गुबगुबीत तसेच बुद्धीचेही जाडेजुडेच असतां तर ?-

**बरकतः**—मग तूं क्या समजा—मैकू ? मैं आज सातारका सितारा है ! शाहूका तकदीरका कवाड है !

**दौलतः**—ओर मेरे प्यारे बुलबुल ! तूं माझा उद्यांचा मालक भी है ! हा शाहूचा जरीपटका गडावर चढला रे चढला ( पडद्यांत तुतारी ) शाहूचा हल्ला सुरूं झाला ! बरकत सावध—

**बरकतः**—सावध ! हां सावध ! शाहूराजे खालीं दिसल्याबरोबर सुनाव—म्हणजे—

**दौलतः**—पण हें हो काय मियाजी ? असे भेदरतां कां ?-

**बरकतः**—नहीं, ये मैदानका अवसान है ( पडद्यांत बार ) या अल्ला—दौलत, तटावर गोळे येऊं लागले कोर ? खालीं कोण गिल्ला करता है ?

**दौलतः**--शेवंता, ! शाहू वर चढूं लागला—बरकत हो पुढं—

**बरकतः**—नहीं बेटा ! हें साधेलसं दिसत नाहीं ! इतकं अवसान आलं आहे आतां कीं तटावरून खालीं उडी घेईन मी असं वाटतं ? तूंच करीनास एवढं काम ?-

**दौलतः**—वारे मेरे गबरू ? नुसतं निशाण चढवायचं तर इतकं अवसान ? आच्छा ! मी करतों काम—पण बेटा मियाजी, या धांदलींत जर कां हा प्रकार कुणी पाहिला तर या तिकोनी पगडीबरोबर मुंडी सुद्धां कुणी उतरील बरं माझी ! जरा पाळत राख !

**बरकतः**—तुमकू डर ओ मुलूखमैदानका! आच्छा; मी पाहरा जागवतों-तूं वेळ येतांच काम फत्ते कर! बेटा, ओ जरीपटका आपका दौलत, शाहूका तकदीर, और तारारानीका—

**दौलतः**—सबूर, तूं आपल्या कामाला लाग, मी माझ्या कामाला लागतों. (झेंडा घेऊन जातो.)

**बरकतः**—वारे जवान! अल्ला तुमकू ऐसाच पागल रखो! चलो बरकतखान, शेखमिराचा कबिला राखून, शाहूचा जयजयकार झाला कीं तूं, सरदार! बडा उमराव हो जायेगा!

—पडदा उघडतो—

## प्रवेश ५ वा.

(स्थळः-सातारा अजिमतारा. सिंहद्वार. शेवंता न्याहाळून दूरवर पहात आहे.)

**शेवंताः**—इतक्यांत शाहू वेण्णे अलीकडं भिडला? अगबाई, पहिली बिनीची तुकडी सुटली सुद्धां! (तुतारी वाजवते) मोर्चेवाले सावध असले म्हणजे शत्रूला सहसा दाद देणार नाहीं आम्ही! पण कालपासून शेखमिराचे हे बगलबच्चे कांहीं निराळ्याच धोरणांत दिसतात! शाहूनं शेखमिराचा कबिला कैद केला, त्याला वाचवण्याकरतां तर शेखमिराची ही धडपड नसेल? हरकत नाहीं; आईसाहेब किल्ल्यांत आहेत तोंपर्यंत काळिकाळाला सुद्धां आम्ही भिणार नाहीं! (तुतारी वाजवते)

**प्रतिनिधीः**—(प्रवेशून) कां-शेवंता, तुतारी कां वाजवलीस?

**शेवंताः**—धनी, शत्रूचं सैन्य भिडलं—

**प्रति०**—मग त्यांत वावगं काय झालं? खेडच्या लढाईत शाहूला पळपुटा वाटलेला हा प्रतिनिधी त्याचं उसनं फेडील! शेवटचा शिपाई जिवंत असे तों—दरवाजा मात्र उघडतां कामा नये—

(पडद्यांत गलबला. हरहर महादेव)

सावध, पोरी-सावध रहा; दुष्मन छातीशीं भिडला!

**शेवंताः**—धनी, आपण मागं व्हा; आईसाहेबांना सांभाळा; मी दरवाजा रोखून धरते! तोंपर्यंत कुमक पाठवावी! मराठ्याची सून आहे, सर्जेरावाची राणी

आहे; तरवारीला कमीपणा येऊं देणार नाहीं–सरकार सावध–[ दोन्ही बाजूंनीं शाहूचे लोक हल्ला चढवतात. शेवंता प्रतिनिधी लढतात. शाहूच्या लोकांना मागें सारतात. ]

**ताराऊः**—[ आंतून ]–शाबास–शेवंता–शाबास ! ( प्रवेशून ) शेवंता, आज तुझ्या सारख्या नवत्या नारीनं जर इतका पराक्रम केला तर यश मला कां मिळणार नाहीं ?

**प्रति०**—सरकार, यावेळीं बेनिगा खाशा स्वारीनीं बाहेर येणं बेहिशेबी होणार आहे !

**ताराऊः**—जातिवंतांच्या मानेवर तरवार फिरत असतांना, या जिवाच्या आशेनं किल्याच्या कोंडवाड्यांत आम्ही दडून बसावं म्हणता ? प्रतिनिधी,–मराठ्याच्या राणीला लढाईचं मैदान म्हणजे सिंहासनाकडं जाणारी पायघडी वाटते–समजलास ?

**प्रतिनिधीः**—पण आईसाहेब, रणांगणाचा रंग उधळायला आमच्यासारखे उल्हासानं नाचत असतांना, खाशा मोहऱ्यानं इरेस पडायचं कारणच काय ?

( पडद्यांत पुन्हां आवाज )

**ताराऊः**—ती पहा–ती पहा–पुन्हां दुसरी टोळी गड चढून आली ! शेवंता, माझ्या निशाणाचं रक्षण कर ! राणी असलें तरी पराक्रमी भोंसल्यांच्या राजवटींत वाढलें आहे ! असल्या आणिबाणीच्या प्रसंगीं, तरवारीच्या झटक्यानं हातच्या बांगड्या पिचवून, शत्रूला दुष्मनच्या इर्षेनं उत्तर दिल्या शिवाय आम्ही कसे राहूं ?—( तरवार उपसते. )

**प्रतिनिधीः**—सरकार–सरकार हें काय ? प्रतिनिधीचे हात तुटले कीं काय म्हणून हा निर्वाणीचा त्रागा ? आपण निश्चिंत असाः–आंत व्हा–अरेरे–शेवंता–शेवंता–आईसाहेबांना आवरून धर—

( शाहूचे लोक चढाई करतात. शेवंता व प्रतिनिधी पुन्हां त्यांना मागें सारतात. ताराऊ बेफाम होऊन पुढें जाऊं लागते. )

**ताराऊः**—सोड–सोड शेवंता मला ! दुष्मन दारीं भिडून, आईच्या अब्रूवर हात उचलायला तयार झाल्यावर, आईनं तरी त्याचा नतीजा कां राखावा ? सोड

आम्हाला ! अशीच नंग्या समशेरीसह शाहूसमोर आम्ही खड्या होतों–नी विचारतों कीं मराठ्यांच्या पादशहानं, आईला चिणायचे–कापायचेच धडे आपल्याला शिकवले काय ? मोंगलांच्या पाठिंब्यावर मराठदौलतींत यादवी माजवून, माझ्या महाराष्ट्राला रक्तानं रंगवून टाकण्याकरतांच कां आपला अवतार झाला ? सोड आम्हाला—

**शेवंताः**—मायबाप–काय हा वेडा विचार ? इतकी तपश्चर्या, इतकी मांडणी केली कशाला ? विकारांच्या आधीन जाऊन, आईसाहेबांना हा भलता अविचारच करायचा होता तर रणशिंग फुंकलं तरी कशाला ?

**ताराऊः**—मानानं मरण्याकरतां ! महाराष्ट्राचा राजा, दौलतीकरतां आईचं सुद्धां नातं कसा विसरतों हेच जगाला दाखविण्याकरतां !–चल हो दूर–

**शेवंताः**—मग असल्या अविचाराकरतां आम्हां कच्चाबच्चांच्या संसाराला आंईना आग लावण्याचं काय कारण ? असलाच खेळखंडोबा करायचा होता तर माझ्या राजाला, सर्जादेवाला, मरणाच्या दावणीला कां बांधलं ?

**ताराऊः**—शेवंता–शेवंता–विचाराचा ताबा यावेळीं ताराऊच्या बुद्धीवर उरलेला नाहीं ! यापुढं आमचा मार्ग आडवशील तर कठोर–कठोर व्हावं लागेल आम्हाला ! काय ? नाहीं सोडीत तूं आम्हाला ? सुवासिनीचा बळी देऊन पुढं जाण्या इतका अविचार रोमरोमांत सणाणला आहे !

**शेवंताः**—येवढंच ? तर मग ही पहा शेवंताची मान महाराष्ट्र माऊलीच्या पायांवर झुकली ! खुशाल हातची समशेर या देहांत म्यान करा ! जिला प्राणांपेक्षां प्यार असलेल्या पतीच्या यज्ञाचं कांहीं वाटलं नाहीं, तिला स्वतःच्या प्राणांची काय किंमत ?–या एका प्राणाच्या मोबदल्यानं जर हें महाराष्ट्राचं लेणं सुखरूप रहात असेल–

**ताराऊः**—तो पहा–शाहूचा तख्ता वर येऊं लागला !–शेवंता–शेवंता चांडाळणी दूर हो;–नाहींतर अविचार होईल आमच्या हातीं—

**प्रतिनिधीः**—शेवंता, प्रसंग कडवा आला आहे–पुढं हो;–तमाम मोर्चेवाले–जिवाची तमा न धरतां गोळी, तीर चालू ठेवा; आईसाहेब–या पिकल्या केसांचा मान राखायचा असेल तर एकदम मागं व्हा !–

**ताराऊः**—आणि तुम्हाला सिंहाच्या जबड्यांत लोटूं ? आमच्यापायीं जातिवंतांचे मुडदे डोळ्यापुढं पटापट पडणार ही खात्री असतांना, या मानी जिवाचा मोह धरूं ? प्रतिनिधी, वीर असाल तर आम्हाला या वीरमरणानं मरूं द्या–

**प्रतिनिधीः**—आईसाहेब, या प्रसंगापेक्षां निराळा प्रसंग असता,-माझ्या राणीच्या जिवावर एका कोंवळ्या, चिमण्या जिवाचं भाग्य लटकत नसतं, किंवा देव-दयेनं आपल्या येवढी माझी मुलगी इथं असती-तर-

**शेवंताः**—बाल शिवाजीचं काय होणार ? त्यांनीं कुणाच्या तोंडाकडं पाहायचं ? या आपल्या वाढलेल्या चिल्यापिल्यांची कत्तल होऊं द्या-पण आमचा चिमणा राजा-

**ताराऊः**—बालराजा ! बालराजा ! प्रतिनिधी, शेवंता, किती जबर आघात या हृदयावर केलात ? देवानं आइचं नातं आम्हाला ऐन वेळीं असं घायाळ करायला दिलं कां ? ही विकाराची उसळी, ताराऊचा मेंदू फोडून बाहेर पडेल कीं काय भीती वाटते ! नाही; सहनच होत नाहीं हें-! जा-नेकीच्या नेकजात देवांनो, माझ्या जिवाच्या कलीजांनो, जा, आणि या अभागी राणीकरतां-आपल्या देहाचा चिखल करून घ्या ! सौभाग्यचं मोल देऊन, सुखाच्या सर्वस्वाचा होम करून दुर्दैवी बालराजांचा सवता सुभा उभारलात, त्याचा मोबदला ही अभागी राणी तुम्हाला मृत्यूच्या मोबदल्यानं देत आहे !-शेवंता-शेवंता-प्रतिनिधी, बाल-राजांना—

[ बेशुद्ध होते. ]

**प्रतिनिधीः**—अरेरे-काय झालं हें ? दैवानं असा ऐनवेळीं अवचित दावा साधला ? शेवंता, संपला ताराऊचा इतिहास !

**शेवंताः**—सरकार, असा धीर सोडूं नका ! आपण जिवंत आहोंत ! एकदम आईसाहेबांना नी बालराजांना, गडांतल्या विश्वासू लोकांबरोबर, मागील दारानं पन्हाळ्याकडं पावतं करा !-गड तसाच झुंजत राखूं ! आईसाहेबांना प्रत्यक्ष इथं पाहिल्यामुळं त्या इथून निघाल्याची कल्पनाही शत्रूला येणार नाहीं !-दैवानंच यावेळीं हात दिला असं समजून यांना एकदम इथून हालवा—

**प्रति०**—किती बिनतोड युक्ति सांगितलीस शेवंता ? पुरुष पराक्रमाची मूर्ती असेल तर स्त्री बुद्धीची स्फूर्ती आहे !-( ताराऊला प्रतिनिधी कांहीं सैनिकांच्या मदतीनें आंत नेतात. )

**शेवंताः**—( तुतारी वाजवून ) नेकीच्या नेकदारांनो, तुमची आई संकटांत आहे हें समजून इमानाला जागा ! आईला विसरूं नका—

**प्रति०**—[ जातांना ] शेवंता, मी येईपर्यंत तुझं रक्षण जगदंबा माताच करील !

( जातो. )



**शेवंताः**—दीडदोन घटकेच्या पल्यावर स्वर्गीचं नंदनवन राहिलं !
[ अंक ३ रा प्रवेश ५ वा ]

**शेवंता**:--कर्तव्याच्या शेवटच्या पायरीवर शेवंता आतां उभी आहे ! दीडदोन घटकेच्या पल्ल्यावर स्वर्गाचं नंदनवन राहिलं ! सख्या सर्जा, तूं आधींच जिंकलं असलंस, तर तुझी शेवंता, रक्ताची निष्ठावंत उटी घेऊन तुझ्या पायीं धांवत येईल ! नाहीं तर तुझी वाट पहात नंदनवनाच्या दारांत उभी राहील !

[ पडद्यांत तोफा तुताऱ्या वाजतात. ]

मृत्यू जवळ आला कां ?–या-एक या–हजार या !

[ पुन्हां शाहूचे लोक येतात. शेवंता लढते ]

**शाहू**:—[ प्रवेशून ] सबूर–नादान, एकदम सबूर ! बायकावर हत्यार चालवणं– शाहूला मंजूर नाहीं ! शाहूचं मनगट मर्दाच्या मनगटाला भिडेल !–कोण, कोण तूं ?

**शेवंता**:—सर्जेराव शिलेदाराची लक्ष्मी ! सवत्या सुभ्याच्या निशाणाची रखवालदारीण !

**शाहू**:—काय ? त्या माजोरी सर्जाची बाईल ? किती खुळी पोर तूं ? ताराऊराजा या अजिमताऱ्याच्या तिकोनांत कां आतां सवता सुभा उभारणार ?

**शेवंता**:—तें लौकरच दिसेल राजांना–

**शाहू**:—अस्सं काय ?–आईसाहेब गडावरच आहेत ? त्यांना कळव कीं आपले पुत्र आपल्या भेटीला आले आहेत !

**शेवंता**:--आणि हें जाणूनच त्यांनीं मला ही समशेर हातीं देऊन, आपल्याला सामोरं पाठवलं आहे !—

**शाहू**:--साळुंखीच्या मंजूळ बोलांतून तोफांचा दणदणाट काढून दाखवण्याची अजब करामत आईसाहेब दाखवणार आहेत कां आम्हाला ?

**शेवंता**:—तें अनुभवानंच कळेल !

**शाहू**:--बस्स !–बेमुर्वत पोरी, तूं कुणापुढं बोलतेस माहीत आहे ना ?

**शेवंता**:--पूर्ण माहीत आहे.–भोंसल्यांच्या कीर्तीला कमीपणा आणणाऱ्या शाहूराजापुढं !

**शाहू**:—दीडदमडीच्या--च् ! तुझा नवरा आमच्या हातीं आहे हें विसरूं

नकोस ! स्त्रीवर हत्यार चालवणं शाहूला मंजूर नाहीं म्हणून पुन्हां बजावतों-एकदम दिंडींतून दूर हो-नाहीं तर--

**शेवंता:**--काय होणार ? राजे-कोणतं मरण आपण आतां दाखवणार ?--

**शाहू:**--तें आतांच तुला दिसेल ! गोलंदाज, याच तोफेला तो नंदीबैल बांधून सिंहद्वारावर तोफ डागा ! शेवंता, लक्षांत ठेव-नवऱ्याच्या देहाच्या ठिकऱ्याबरोबर तुझ्याही देहाचा चिखल होऊन किल्ल्याची राळ उडेल !

**शेवंता:**--राजाजी, शेवंताच्या कपाळाकडं पाहिलंत ? पतीला आपल्या हातीं दिलं त्याचवेळीं शेवंता विधवा झाली !-कुणाला ही दहशत घालता ? मराठ्याच्या पोरीला ? पाहायचंच असेल-तर शेवंता न चळत्या नजरेनं सर्जेरावाकडं पाहायला तयार आहे ! खुशाल तोफेवर तोडा चालवा-

[ सर्जेरावाला तोफेला बांधतात ]

**सर्जे०**--शेवंता, मरत्या घडीला तुझं हें कर्तव्याच्या रणभूमीवरचं ठाण पाहिलं-मूठभर मांस चढल ! नजर चळवूं नकोस, कीं धीर ढळूं देऊं नकोस ! एका-एकाच क्षणाचा अवकाश दोघेही एकदम स्वर्गाच्या मार्गावर चालूं लागूं;-बालराजांना-आईसाहेबांना हाच शेवटचा मुजरा-

**शेवंता:**--धनी-धनी-डोळे जागच्या जागीं थिजून-शेवटची आपली मूर्ती हृदयांत साठवून ठेवीत आहेत-म्हणून दासीला दोष देऊं नका ! -राजाजी, नचळत्या हातानं गोलंदाजाला तोफ डागूं द्या !-पण आमचे मोर्चे याच वेळीं कसे बंद पडले ?

**शाहू:**--वेडे शेवंता ! तुझ्या त्या निशाणाच्या जागी तो पहा शाहूचा जरीपटका फडकला ! एक क्षण विलंब लागतां तर तुझ्या नवऱ्याबरोबर, शेखमीराचा कबिला तोफेच्या तोंडीं गेला असतां !-आतां तरी दूर होशील ?

**शेवंता:**--अरेरे-असा निजल्याजागीं झोपेंत गळा सोडवला कां शेखमिरानं ?-तरी वाटलंच होतं-

**शाहू:**--काय अजून दूर होत नाहीं ?-

**शेवंता:**--जिवांत जीव असे तों किल्लेदार प्रतिनिधींचा हुकूम होईपर्यंत शेवंता जागची हालणार नाहीं ?-



**शाहू:**—काय ? शेवटीं हा डाव असा फसला अं ?    [ अंक ३ रा प्रवेश ५ वा ]

**शाहूः**--ऐसी बात ? गोलंदाज--दे तोफेला सरबत्ती-

**शेवंताः**—सख्या सर्जा—

**सर्जेरावः**—लाडके शेवंता—

**प्रतिनिधीः**—[ प्रवेशून ]-खबरदार ! शाहूराजे, किल्ला खाली झाला ! या किल्ल्या ! गडाचा ताबा घ्या !

**शाहूः**—आणि आईसाहेब ?

**प्रतिनिधीः**--भवानीला माहीत-

**शाहूः**—काय ?-शेवटीं हा डाव असा फसला अं ? सरदार, प्रतिनिधीला एकदम पेषकब्ज करा !-किल्ल्याचा कोपरान् कोपरा,—तळघरन् तळघर धुंडाळा ! !

—पडदा पडतो—

**अंक ३ रा समाप्त.**

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

[ **स्थळः**–सातारा. शाहूचा महाल. शाहू व शेवंता आहेत असा प्रवेश. ]

**शाहूः**—बोल शेवंता, अजून जबान खुली नाहीं होत ? आईसाहेब कुठं आहेत ?

**शेवंता**—हें माहीत असतं, किंवा आईसाहेब जर सातारच्या टापूंत असत्या, तर शेवंता अशी बंदींत खितपत इथं पडलीच नसती ! आईच्या बुद्धीच्या करामतीनं शाहूराजांचे बंदिखान्याचे लंगर केव्हांच खळाळ तुटून पडले असते !

**शाहूः**—याची कल्पना आम्हाला आहे ! आणि म्हणूनच आम्ही विचारतों कीं आमच्याही बुद्धीला चकवणाऱ्या अकलेच्या बहादूर राणीसाहेब आहेत कुठं ? या दख्खन खोऱ्याची आम्हाला पुरी माहिती असती तर, सारा दख्खन महाराष्ट्र आम्हीं चाळून काढला असता, नी आईसाहेबांचा छडा लावला असता–

**शेवंताः**—आणि अशी पुरी देशाचीही माहिती नसलेला राजा, प्रजेच्या हृदयाशीं कसा एकजीव होणार ? राजाला प्रजेच्या हृदयाचा आघातन् आघात माहीत असावा लागतो तेव्हांच प्रजा राजाला आपल्या मोलानं सांभाळते ! प्रजेला न ओळखणारा तो राजा कसला ?

**शाहूः**—राजा कसला ? मूर्ख पोरी राजा जन्मावा लागतो; राजा होऊन होत नाहीं ! आणि राजपद भिक्षा मागून मिळतही नाहीं ! प्रजेच्या ओंजळीनं पाणी पिणारा राजा अकलेनं तर दुसऱ्याचा हमाल होतोच, पण कधींकधीं स्वतःच्या मुकुटालासुद्धां मुकत असतो ! आम्ही राजदंड कमावला तो गमावण्याकरितां नाहीं ! आईचा ठाव तुझ्या तोंडून नाहीं कळत तर ? शेवंता, तुझा नवरा आमचा बंदिवान् आहे–

**शेवंताः**—मीही राजांची बंदीवानच आहे–

**शाहूः**—आमच्या माथ्याचा भडकपणा अधीक चेतवूं नकोस ! डोळ्यासमोर नवऱ्यास जिवंत सोलून काढलेलं पहावं लागेल !

**शेवंताः**—हें पतीचं वीरमरण उघड्या डोळ्यांनं आनंदानं पाहतांना शेवंताला सतीचा अभिमान वाटेल ! आपल्या कैलासवासी पित्यांच्या, कैलासवासी शंभुराजांच्या तोलानं मरणारा माझा जिवाचा राजा, मला येसूबाईसाहेबांच्या पदवीला पोंचवील !

**शाहू:**—( बाजूस ) या पोरीच्या बोलाबरोबर, शाहूच्या कठोर भावना जागच्या जागीं विजेच्या आघातानं तुल्या कां बरं पडतात ?

**शेवंता:**—कां ? सातारच्या गादीच्या धन्यांना एवढा विचार कसला पडला ?

**शाहू:**—खुळे पोरी, सिंहाला छेडून, त्याच्या क्रूरपणाशीं खेळणं शहाणपणाचं नाहीं ! त्याच्या जातीच्या उदारपणाला जागं करणं यांतच—

**शेवंता:**—आपल्या उदारपणाला जागं करून आतां कोणतं यश मिळवायचं ? कोणता ऐरावत दारीं झुलवायचा ?

**शाहू:**—प्राणांची सुद्धां कदर न राखणारी अवलाद—

**शेवंता:**—मावळ मराठ्याची ! शेराच्या जातीची ! मिळवलेलं यश प्राणांच्या मोबदल्यानं गमावणारा—

**शाहू:**—खामोष; कोण आहे रे; त्या शिपुर्ड्यांला आमच्या सामने हजर करा— मस्त प्रतिनिधीला, ताराऊ राजांच्या कारस्थानाची आम्ही कोणत्या रीतीनं विल्हेवाट लावतों तें जातीनं पाहायला घेऊन या—( शिपाई जातात ) शेवंता, नवऱ्यापेक्षां, धन्याच्या प्राणांची किंमत तुम्हां निष्ठावंताना अधीक असं तुम्ही दाखवता ! नवऱ्याची गर्दन उतरून सुद्धां न डगमगणारं तुझं कसायी हृदय, प्रतिनिधीला जिवंत गाडतांना हेलेल कां ?

**शेवंता:**—धन्यांच्या धन्याकरतां, माझ्या आई ताराऊ करतां प्रतिनिधींना हत्तीच्या पायीं दिलं, तरी शेवंता चळणार नाहीं !

**सर्जेराव:**—( प्रवेशून ) शाबास, शेवंता शाबास ! तुझ्या सारख्या नागिणीचा नवरा म्हणवून घेण्यांत सर्जेराव स्वर्गावर सुद्धां लाथ मारील !

**शाहू:**—या डोंगरांतले एकजात सारे बदमाश अशा राक्षसी अवलादीचे ? आणि असल्या फत्तरांच्यावर आम्ही राज्य करणार ?

**सर्जेराव:**—राजे, हा दगडाधोंड्यांचा महाराष्ट्र देवाच्या गुणाचा आहे ! कलावंताची टाकी याच दगडांतून देवांच्या मूर्ति उभ्या करते, पण बेरड बदमाषांना हेच दगड गोफण—गुंड्याला उपयोगी येतात ! निर्विकार, निर्विचार, अचेतन दगड सर्वविकारी चैतन्याची आदिमूर्ति आहे !

[ रागः—बहार. त्रिवट ]

**जनमनिं नाचत प्रभु सुरराणा ॥ प्रीतभाव ॥ दावि देव ॥ देत माव ॥ हा प्रभाव ॥ जगतिं नव ना; ॥ कालव्याल तारिता जनां ना ॥ ध्रु० ॥ शठमति हा दुर्योधन रणिं ॥ सजला; नाश कुलां ॥ चुकत न त्या; ही प्रचीत ॥ पातकी जनांना ॥ १ ॥**

**शाहूः**—असल्या मायावी जादूनं भारून जाण्याइतका शाहूचा दिल् कोंवळा नाहीं !—दिल्लीपती अलमगीराच्या बुद्धीची निशा आम्ही थोडीफार केली आहे !—समजलास ? असल्या फत्तरांचे देव बनवायला दिलदारीच्या कलाकुसरी ऐवजीं, घणांचे घाव आम्ही बेशक घालूं ! ( प्रतिनिधी येतात ) कोण ? प्रतिनिधी ?

**प्रतिनिधीः**—ताराऊ राजांचा प्रतिनिधी ! मराठ्यांच्या गादीचा इमानी चाकर—

**शाहूः**—आणि आमचा दुष्मन् ? खरं ना ? सातारा पडला, जिवाच्या आशेनं ताराऊनं पळ काढला, तरी ताठा? कोणत्या उन्मादाचा कैफ अजून बुद्धीवर तरळतो—प्रतिनिधी ?

**प्रतिनिधी**—निष्ठेच्या, इमानाच्या उन्मादाचा कैफ !

**शाहूः**—तो उन्माद जेठींच्या पायीं तुडवला जाईल, ताराऊचा ठाव दिला नाहीं तर ! बोल, सैतान, तुझी राणी कुठं पळवलीस ? कुठं दडवलीस ?

**प्रतिनिधीः**—सवत्या सुभ्यावर ! ताराऊच्या स्वतंत्र राज्यावर !

**शाहूः**—काय ?—आमच्याशीं सामना द्यायची अजूनही आईसाहेबांची तयारी आहे ?—सिंहाच्या पंजांत गवसलेली शिकार, तूं—सैतान तूं अशी फरारी करून, आमच्या छातीवर सवता सुभा उभारलास ! पण खूण राख, कीं शाहू—संभाजीच्या अवलादीचा आहे ! डंख धरला कीं दुष्मनचीं पाळंमुळं खणून काढल्याशिवाय आमच्या वृत्तीला थंडावा येणार नाहीं ! सवत्या सुभ्याचा दगडन् दगड उलथून टाकूं, पण आमचा दंश करायला टपलेली नागीण—

**प्रतिनिधीः**—बस्स, राजाजी, जंजीरकड्यांनीं असा बांधलेला प्रतिनिधी, माझ्या राणीचा अपमान कधींच सहन करणार नाहीं ! त्यापेक्षां सरळ तोफेच्या तोंडीं—नाहीं तर हत्तीच्या पायीं देहाचा चेंदामेंदा होऊं द्या ! संभाजीचं नांव सांगायचं

असेल तर राजाजी, दुष्मनचा मोठेपणा विसरणाऱ्या मोगली वृत्तीला साजेसें बोलूं नका! दुष्मनच्या गुणांचा गौरव करणं हा मराठ्यांचा बाणा आहे!

**शाहू:**—असं काय? तर मग सांग, कोणत्या तटबंदींत तुझा वदसल्ला ऐकून ताराऊ राजा गेल्या? कोणत्या किल्लेकोटांत, आमच्यावर फूत्कार टाकीत कोंडून वसल्या? दुष्मनच्या ताठरपणानं, त्या किल्लेकोटांची राळ उडवून जर–शिपायाला साजेशा कृतीनं आईसाहेबांशीं आम्ही वागलों नाहीं–

**प्रतिनिधी:**—कशाला ही प्रतिज्ञेची भाषा? करवीर पन्हाळ्याशीं पोहोंचेपर्यंत प्रतिनिधीसारख्या जिवंत कड्यांशीं आधी टक्कर द्यावी लागेल तेव्हां आईसाहेबांचं नांव–

**शाहू:**—काय? ताराऊराजा पन्हाळ्यावर? करवीर प्रांतीं? आम्ही जों जों पाठलाग करावा तों तों ताराआईचा झेंडा दूर जातो! आणि मृगजलामागं लागलेल्या दुबळ्या हरणाची निराशा आमच्या वांट्याला येते! आईवर हत्यार उचललं त्याचं तर हें प्रायश्चित्त नाहीं ना?–वदमाष, तुझ्यासारखे फरसबंदी चिरेच जर आम्हाला अजूनही आडवे येणार असले, तर त्यांना मातीला मिळवायला आम्हाला काय उशीर? कोण आहेरे–पाहऱ्यावर? (पहारेकरी प्रवेशतात) जा नी चार जेठींना तडक लावून दे–आणि या मुर्दाड सर्जेरावाला नी त्याच्या या बेफाम वायकोला बंदींत न्या! उद्यां प्रतिनिधीच्या रक्ताच्या थारोळ्यांत यांच्याही रक्ताचा पाट आम्ही मिसळून देऊं!

(सर्जेराव व शेवंताला नेऊं लागतात)

**शेवंता:**—धनी, धनी, हा चाकरीचा शेवटचा मुजरा—

**सर्जेराव:**—इमान शाबूत राखून पायांशीं उद्यां हजर होतों! काळजी करूं नये–

**प्रतिनिधी:**—अहाहा! निष्ठेच्या मिरासदारांनो, देहाचं देणं देऊन सत्त्वाच्या जोरावर मरणाचा कडवेपणा जिंकलात कीं देवानं स्वर्गाचा सवता सुभा आपल्या करतां निर्माण केला आहे हें विसरूं नका! तिथं स्वार्थाचा बाजार नसेल, किंवा आईला विसरणाऱ्या कुसंतानांचं वारंही नसेल—

**शाहू:**—बस्स, हा केविलवाणा टाहो, मरणादारीं तडफडणाऱ्या कुत्र्याच्या केकाटण्याइतकाच आम्ही समजतों!–चला, ओढा त्यांना—

**प्रतिनिधी:**—जा–जा गरीब हाडांच्या पण राजाच्या गुणांच्या माझ्या स्वामी-निष्ठ–देवांनो–जा–आणि उद्यां या मृत्यूच्या स्थंडिलावर, माझ्या राणीच्या सवत्या-

सुभ्याचा एवढा जयजयकार करा, कीं पन्हाळ्यावर, आपल्या वाटेकडं नजर लावून वसलेल्या त्या माऊलीला, आपल्या आत्मयागाची खूणगांठ पडेल ! ( सर्जेराव व शेवंता यांना नेतात )–राजा, मरणाला तयार आहे ! कोणतं मरण देणार ?–जेठी सामने खडे आहेत–( जेठी येतात. )

**शाहूः**—आच्छा; जेठी, या निमकहराम अबदालीच्या छाताडावर तक्ते ठेवून, याला जमीनींत असा जिवंत चिणून टाका कीं असल्या–सैतानाचा मागमूस सुद्धां राहणार नाहीं—

[ जेठी प्रतिनिधीला पाडणार इतक्यांत खंडो प्रवेशतो ]

**खंडो०**—कुणाचे जीव इतके वर आले आहेत कीं प्रतिनिधीची सुद्धां आठवण नाहीं त्यांना ? प्रतिनिधींच्या केसालाही धक्का लावणाराचे हात तिथल्यातिथं उतरले जातील ! कोण ? स्वामी ? आपण ? आणि हा अत्याचार ? मराठी राज्यांत, आपल्याच वडलांनीं असाच आततांईपणा केला, त्याचीं फळं भोगलीं! पुन्हां मराठी राजवट रक्तानं रंगवून टाकायचा विचार आहे वाटतं ? राजा,–ताराऊ आईचे बोल खरें ठरणार–कीं " मोगली अमदानींत वाढलेला शाहू उद्यां कर्त्याक-र्त्यांचीं डोकीं मारल्याशिवाय राहणार नाहीं "—फुकट, फुकट ताराराजांशीं द्रोह केला ! आणि मराठदौलतीवर हा मोगली चांद चढवला ! !

**शाहूः**—संतापानं थरकांप उडून देह धरणीला पडेल कीं काय भीती वाटते !–खंडो, खंडो, देहभान विसरलांत कीं तुमच्यावरही कुणी जादूटोणा केला ? बापाच्या ठिकाणीं आम्ही तुम्हाला लेखतों, त्याचा मोबदला—

**खंडो०**—आणि म्हणूनच स्वामी, हा प्रकार पहात असून खंडो इथं उभा आहे ! कैलासवासी शंभुदेवानं जर हा मावळचा धनी या खंडो हातीं निरवून ठेवला नसता, आणि हा खंडो जर आणभाकेला गुंतला नसता तर स्वामी, याच घडीला खंडोनं तख्ताला शेवटचा मुजरा करून पन्हाळ्याची वाट धरली असती–!

**शाहूः**—अरेरे ! जिवाशीं जडवलेले, आमचे म्हणून दूध चारून पोसलेले जाति-वंत, शेवटीं आम्हांवरच असे फूत्कार टाकूं लागले काय ? हा महाराष्ट्र आहे तरी कसला ? जादूगारांचा, यक्षकिन्नरांचा, काळ्याकभिन्न फत्तरांचा कीं–असल्या जिवंत सैतानांचा ? शाहू महाराष्ट्राचा राजा म्हणून राहणार कीं एकाद्या असल्याच सैता-नाच्या अकलेचा हमाल होणार ?

**खंडो०**—राजांनीं असं उदास होऊं नये ! चाकराला तोंडून बोलावं लागलं तें प्रसंगानं ! प्रतिनिधी सामान्य नाहींत ! असला मोलाचा मोहरा, असल्या जेठीकडून पायदळीं मारवायचा ? ज्या मल्लांनीं या बरकंदाजापुढं गाईच्या अदबीनं राहायचं, त्यांचे हात या थोराच्या गळ्यावर चढवायचे ?–राजाजी, प्रतिनिधी गुन्हेगारच वाटत असतील तर त्यांना साजेशा एकाद्या मोहिमेवर पाठवून, तशा वीरमरणानं मारा;–त्यांच्या इतमामाला साजेशा चांदीच्या बेड्यानं, आजन्म कैदखान्यांत डांबून ठेवा, पण वीराच्या नात्यानं त्याच्याशीं वागा ! येवढीच हात जोडून विनंती आहे—

**शाहू:**—ठीक आहे;–प्रतिनिधी पन्हाळ्यावर चालून जायला तयार आहेत ?

**खंडो०**—अजून, अजून मराठीराजाचा मोठेपणा कृतींत भिनत नाहीं ! मोगली वृत्ति अजून उसळी घेते ! माझ्या राजा, सातारा मिळाला, आपला कार्यभाग संपला ! साताराची गादी मिळाल्यानंतर, आईच्या ठिकाणीं असलेल्या ताराऊ राजांशीं दावेदारी कां ?–कोणती अदावत त्यांनीं केली ?

**शाहू:**—म्हणजे ? खंडो, तुमचा इरादा तरी काय ?

**खंडो०**—ताराराजा जर इथं राहत्या तर त्यांच्या इतमामाला साजेशी त्यांची निगा राजांना ठेवावीच लागली असती ना ?

**शाहू:**—अलबत् !

**खंडो०**—मग ताराऊ आईसाहेबांनीं आपल्या खुशीनं आपली व्यवस्था करून घेऊन, आपली गादी आपल्याला मोकळी करून दिली असं त्याच वृत्तीनं कां समजूं नये ? मराठ्यांच्या राजानं आईच्या बाबतींत अगदीं कांटेतोल वागणं साजून दिसणार नाहीं–हुजूर–

**शाहू:**—म्हणजे, त्यांनीं, चालवलेल्या पुंडाईला आम्ही रुकार द्यायचा ? त्यांच्या-पुढं आम्ही हात टेकले असं समजून नामर्दाप्रमाणं माघार घ्यायची ?

**खंडो०**—जिथं डोकं टेकल्यानंही कमीपणा येणार नाहीं तिथं राजांनीं नुसते हात टेकले तर त्यांत वावगं काय ? मुलानं आईपुढं हात जोडले तर पुण्याईची जोड मिळते ! दिल्लीच्या अटकेंत ताराराजा आणि इकडं दक्षिणेंत येसूसाहेब असं समजण्यांत राजांचा मोठेपणा दिसेल ! आईमहाराजांच्या मनीं जर कांहीं किंतु असेल तर तो निघून जाईल !

**शाहू:**—खंडो, ही बुद्धीची जादूगारी कुठं शिकलात ? आम्हाला विचार करूं द्यात ! विकारांची लाट अद्याप आमच्या आवाक्यांत नाहीं ! प्रतिनिधींना तुमच्या स्वाधीन करतों; त्यांची वाटेल ती व्यवस्था लावा; पण असला सैतान सोडूं मात्र नका ! चांदीच्या बेडीनं कां होईना पण प्रतिनिधी आमचे बंदिवान् पाहिजेत. (जातो.)

**प्रतिनिधीः**—खंडो, खंडो, खरा दुष्मन्, खरा दोस्त ! ! कोणत्या नात्यानं तुला भेटूं ?

**खंडो०**—पंत, मराठी तख्ताचं मीठ जातीला विसरत नाहीं ! परवां सर्जेरावच्या समशेरीखालीं उतरणारी खंडोची गर्दन तुम्ही राखलीत;–जेठींची बातमी कानीं आली तों तसाच धांवत आलों आणि म्हणूनच आज आपल्या ऋणांतून मोकळं होतां आलं ! यावेळीं पक्षाभिमानापेक्षां, जिवंत जिव्हाळ्याच्याच ऊर्मी हृदयांत सळसळत असतां,–प्रतिनिधी, एकदां भेटूं या ! उद्यांचा कोणी भरंवसा द्यावा ?

**प्रतिनिधीः**—दुष्मनची दावेदारी विसरून जातां येते ती याच वेळीं ! कायस्थाच्या बच्चा ! या ब्रह्मकर्मानं ब्राह्मणांलाही तूं लाजवलंस ! [भेटतात. पडदा पडतो.]

---

## प्रवेश २ रा.

[ स्थळः—अजिमतारा. दौलत व बरकत एकमेकांची दाढी व कान धरून प्रवेशतात ]

**बरकतः**—हरामखोर, तुझ्या नादानं वैसा हुवा ! सर्जेराव नी ती फटाकडी फरारी झाली ! आतां क्या मरना ?

**दौलतः**—जपून बोल, जपून बोल ! मी होतों म्हणून आजपर्यंत तरी जगलास ! नाहीं तर केव्हांच अल्ला घरीं पावता झाला असतास ! इतक्या दिवस प्राण वांचवले म्हणून तूंच माझे पाय धरले पाहिजेस !

**बरकतः**—हाय रे मेरा अकलका ताजमहाल ! शाहूराजांनीं विश्वासाचे दोघे म्हणून आपल्या ताब्यांत त्या हरामखोरांना दिलं ! आतां ते पळालेले पाहिलं म्हणजे—

**दौलतः**—देतील फार तर गडाखालीं हाकलून—

**बरकतः**—कडेलोटानंच कीं नाहीं ? अरे बापरे–नुसत्या अंधुक कल्पनेनंच माझ्या पोटांत गोळा उठला ! हरामखोर–वेइमान जात तुम्हां मराठ्यांचीच !

**दौलतः**—जिभेचा शेंडा कापून हातांत देईन ! तर अकलेची करामत ! मीच तुला विचारतों कैदी गेले कुठं ?—कसे गेले ? कां गेले ?

**बरकतः**—राजा, हें जर मला माहीत असतं तर तुला कां छेडलं असतं ?

**दौलतः**—आणि बेटा, मला जर हें माहीत असतं तर तुझ्या दाढीला हात घालायचं मला तरी काय कारण होतं ?

**बरकतः**—फिर ऐसा कैसा हुवा ?

**दौलतः**—अल्लाके मालुम !

**बकुळाः**—( प्रवेशून ) अल्लाला काय माहीत कपाळ ?

**बरकतः**—अरे बापरे-दौलत, सैतान क्या ?

**दौलतः**—हैवान !—रात्रींच्या अंधारांत दिसत नाहीं कांहीं ! सर्जेरावच नाहींना मुंडी छाटायला आला ?—खान, पुढं हो—

**बरकतः**—नहीं-तूम आगे रहो—

**दौलतः**—आधीं माझीच मुंडी गेल्यावर, राव, अक्कल कोण सांगणार ?

**बरकतः**—समालो-दौलत, दोघंही एकदम धरूं या ! तूं तिकडून हो, मी इकडून पकडतों ! सर्जा असला तरी गारद करूं !

**दौलतः**—पण-डरूं नको हां—

[ जपून जाऊन बकुळेला पकडतात. ]

**बरकतः**—क्यं बे हैवान ! फरारी हो जाता है ? नहीं क्या ?

**दौलतः**—अर्रर-खान-हा सर्जा नाहीं ! शेवंताच सांपडली !

**बकुळाः**—पण मी शेवंताही नाहीं नी सर्जाही नाहीं ! ते केव्हांच गडाखालीं गेले ! ही दौलतीची बकुळा आहे हो बकुळा !

**दौलतः**—काय ? बकुळा ?

**बरकतः**—आली आलाबला ! ( एकदम दूर पळतात. )

**बकुळाः**—पण बकुळा इथं रहायला मुळीं आलीच नाहीं ! बकुळा निराळ्याच नादांत आहे !

**दौलतः**—म्हणजे ?

**बरकतः**—बेटा, असं रंगी फूलपाखरूं एका ठिकाणीं कां रहातं? रंगामागं रंग गुंगायचा!

**बकुळाः**—हां खबरदार बेताल बडबडशील तर—

**बरकतः**—खतम् हुवा—

**बकुळाः**—परवाचं निशाण कुणी उतरलं?

**बरकतः**—तें त्याला विचार—

**दौलतः**—नाहीं त्यालाच विचार. ! चंडिके, एकादा बळी घ्यायचा तुझा विचार आहे कां?

**बकुळाः**—होय, तोच माझा विचार आहे!

**दौलतः**—पण मी तुझा नवरा आहे! पतीला मारल्यानं सात जन्म मुरळी व्हावं लागतं आणि एक जन्म रौरवांत पडावं लागतं!

**बरकतः**—और बाई, मै आपका पावना था! पाहुण्याला मारणाराला अल्ला सैतानाच्या झाडाला उलटा टांगतो—

**बकुळाः**—पण हा पाहुणा जो घरांत शिरला तें मेल्यानं धन्यालाच घराबाहेर काढलं! असे पडून घर घेणारे पाहुणे तोफेच्याच तोंडीं दिले पाहिजेत! इकडच्या तर अकलेवरून दिवेच ओवाळावेत—

**दौलतः**—दिवाळी आतांच होऊन गेली! आतां दिवे नकोत—; आतां येणार आहे शिमगा—

**बकुळाः**—आईसाहेबांना घालवून केलातच कीं तो साजरा! आणि मिळवलत काय?

**दौलतः**—मिळवलं काय?—तें यांना विचार! मी अकलेचा धनी! मिळकतीची—खानेसुमारी या खानसाहेबाकडं आहे! विचार काय मिळवलं तें?

**बरकतः**—सर्जाशेवंतांची रखवाली!—पण बेट्यांना कुणी लुंगवलं हातोहात—तरी म्हणत होतों या दौल्याला, कीं निशा करणं वाईट म्हणून—

**दौलतः**—खरं बोल—खरं बोल—निशा करून बोलतो आहेस हें! मी तुला नुसती मदत करीत होतों—

**बरकतः**—त्याच घडीला कोठडीच्या चाव्या तुझ्या हातीं दिल्या–

**दौलतः**—आणि मग मी कुणाजवळ दिल्या ह्या ?

**बकुळाः**—माझ्या जवळ ! मीच त्यांना सोडवलं ! काय म्हणणं आहे तुमचं ? आणि मीही अशीच निघालें–

**दौलतः**—कुठं–

**बकुळाः**—करवीराकडं ! आईसाहेबांच्या सवत्या सुन्याकडं–

**दौलतः**—आणि माझी वाट ?

**बकुळाः**—तुमचं नशीब ! अकलेचं भांडवल दिलं आहे ना तुम्हाला ? शेवटचं बजावयालाच आलें आहे तुम्हांला. यापुढं तरी असा धन्याशीं विश्वासघात करूं नका–मी चाललें–

**बरकतः**—वाः चाललें ? कैदी फरारी करून पळून जातेस ? पळून जाशील तर आरडा ओरडा करीन !

**दौलतः**—आणि सांगून ठेवतों कीं मी दुसरं लग्न करीन ! शाहू राजांच्या कारकीर्दींत मोंगलाईचा रंग उडवूं मोंगलाईचा रंग ! आहेस कुठं ?–टाकून देईन तुला–

**बकुळाः**—कशाला येवढी तसदी ! जीव जगवून यायचं असेल तर चला अजून–! तांबडं फुटायच्या आंत कराड गाठूं ! नाहीं तर माझीच घ्या सोडचिठ्ठी–

**दौलतः**—बायका नवऱ्याला सोडीत नाहींत ! मराठ्यांत ही रीत नाहीं !

**बकुळाः**—रीत राहूं द्या बाजूला ! यायचं आहे कीं जाऊं ?

**दौलतः**—जाऊं ? कशी जाऊं ? उद्यां कडेलोट होऊन मरेन किंगं माझे राणी ! करामत केलीस आणि आतां जातेस कुठं ?

**बकुळाः**—नवा संसार थाटायला ! समजलं आतां तरी ?

**दौलतः**—म्हणजे ? त्या सर्जाशीं तर संगनमत नाहीं ना केलंस ? हरामखोर दिसायला पाहिजे !–या–या बरकतच्या नादानं बायकोही गेली आणि जीवही जायची वेळ आली !–संसार थाटणार म्हणे संसार––

**बकुळाः**—हो हो–नवऱ्यांनीं ताळ सोडून, जर देशाचा द्रोह आरंभला तर त्यांच्या बायकांनीं कपाळीचं कुंकू पुसून, देशाचा संसार थाटायला पुढं व्हायलाच पाहिजे ! ही चाललें मी–

**बरकतः**—खबरदार ! रात्रीची वेळ असली म्हणून––

**बकुळा**:—( कट्यार काढून ) हें पाहिलं कां ?-दूर हो नाहीं तर-

**बरकत**:—मर गया ! ( नमस्कार घालतो ) दौलत, ही वाघीण एकदम खालीं जुडकाव ! मी तोंपर्यंत हिच्याकडं डोळेझांकच करतों–

**बकुळा**:—धनी, जाऊं ना ?

**दौलत**:—सबूर; इथं राहून उद्यां कडेलोटानं हमखास मरण्यापेक्षां, तुझ्याच हातीं जिवाची वेसण देणं चांगलं—

**बकुळा**:—तर मग या सैतानाला त्या झाडाशीं आधीं बांधून ठेवूं ! म्हणजे कांहीं गडबड तरी होणार नाहीं !– थांबा मी दोरी आणतें–( जाते )

**दौलत**:—बेटा मियाजी, उद्याचं मरण वाचेल तुझं या कृतीनं ! बदमाषांनीं तुम्हाला बांधून कैदी फरारी केले, असं वाटून राजे तुम्हाला जिवदान देतील !

**बरकत**:—आँ ? फिर तुम भी भागता है ?

**दौलत**:—हां जी सरदार !–दौलतीची पछान ठेवा–

**बरकत**:—जान सलामत रहेगा तो जरूर–

**दौलत**:—हें अकलेचं भांडवल देतों ना तुम्हाला ? ही तिकोनी पगडी तुमचं रक्षण करील ! ( पगडी डोक्यावर ठेवतो. बकुळा येते ) हं–हालूं नका ! आलिया भोगासी असावें सादर—बावा !

**बरकत**:—क्या तकदीर का तारा चक्कर खा रहा है ! ( बांधतात. )

**बकुळा**:—खानसाहेब–येतों हो येतों–सलाम म्हटलं—

**बरकत**:—नजरबंदी ! नजरबंदी–! नजरबंदी !

**दौलत**:—नहीं–साहेब. ये तो अकलमंदी–अक्कलमंदी है–!

[ रागः भैरवी–केरवा. ]

**मावळची अशि ही शिलेदारी ॥ सरदार ! ॥ नरनारी ॥**
**येति सामोरी ॥ दाउनि दिलदारी ॥ ध्रु० ॥ इथं झळकत**
**नउ हात भाला ॥ भिडे सहज अचुक दिल्लीला ॥ नच**
**अटक कशाची तयाला ॥–किति तरी ॥ उगीच माजोरी ॥**
**येती बेजारी ॥–सरदार ॥ १ ॥**

--पडदा उघडतो--

## प्रवेश ३ रा.

[ **स्थळः**—कराडजवळील राई, सर्जेराव, शेवंता प्रवेशतात. ]

**सर्जेरावः**—शेवंता, चालतां चालतां किती थकून गेलीस तूं ?

**शेवंताः**—पण आपल्या सोबतींत थकवा कांहींच वाटत नाहीं ना जिवा ? आपण किती बरं चाल केली असेल ?

**सर्जेरावः**—अजून वाघाच्या पंजांत आहोंत शेवंता ! काय करूं ? तुझे कष्ट डोळ्यानां पाहावत नाहींत ! तिकडं आईसाहेबांची ओढ आणि पाठीवर दुष्मनची समशेर-या दुहेरी काळजींत-लाडके शेवंता, देवानं दिलेल्या पायांवरच भिस्त ठेवून असेल नसेल त्या काटकपणानं मार्ग काढला पाहिजे.

**शेवंताः**—सख्या, एवढ्याशा श्रमानं शेवंता थकून जाईल, अगदीं रडकुंडी येईल असं कां तुला वाटलं ? शेवंता कां पारिजाताचं फूल आहे होय, कीं नुसत्या वासानं सुद्धां तें करपून जावं ? मावळनारीला या रानदौलतींतून जायचा सरावच करावा लागतो ! सर्जांना मात्र शेवंता, मखमाली रुजाम्यावर नाचणारी, नाजुक फुलराणी वाटते !

**सर्जेरावः**—शेवंता, तुझ्या प्रीतीच्या सुरेल संगीतांत रंगून गेलेल्या सर्जाला जगांतल्या साऱ्या सौंदर्याची तूं "**कलावती**" वाटल्यास नवल काय ? पारिजाताला कोमेजून टाकायला स्पर्श तरी व्हावा लागतो पण माझ्या साजणीचा हंसरा नूर नुसत्या श्वासाच्या कंपनाबरोबर उतरून जाईल कीं काय भीती वाटते !

**शेवंताः**—सरदार, हीच ती प्रीतीची जादुगारी ! असल्या अस्मानी प्रीतीच्या दर्याच्या उसळत्या अथांग लाटांत चिंब चिंब होतानां देहभान विसरून जातं-जगाचा विसर पडतो ! सख्यां शेवंताला इतकी माया कां रे लावलीस ? असाच कधीं तरी पांखराच्या भरारीनं कुठं तरी जातोस आणि मग-

**सर्जेरावः**—माझी शेवंता, सर्जाला तोफेच्या तोंडी द्यायला तयार होते-खरंना ?

**शेवंताः**--असं भलतं सलतं नाहीं अं बोलायचं ? पहा मी-मी-

**सर्जेरावः**—रडेन, रूसेन, त्याचप्रमाणं शेवंता हंसेनही म्हणणार कां ? हांस-हांस शेवंता, साऱ्या दुनियेंतली फुलवंतीची रुपेरी दौलत तुझ्या या हंसण्यावरून उधळून

यावी ! अस्मानांतलीं निवडक रत्नं तुझ्या दांताच्या रुपानं तुझ्या हास्याचे किरण उधळूं लागले कीं त्या शांत स्वर्गंगेंत कल्पांतापर्यंत खेळत राहावं असंच वाटतं !–

**शेवंताः**—किती–किती लाजवावी मला ! चंद्रकिरणानं चंद्रमणी झरतो पण नजरेच्या किरणानं चालतं बोलतं माणूससुद्धां कधीं कधीं झुरूं लागतं हें आज कळलं हो ! राया, असल्या नजरेनं देहाचं पाणी पाणी कां बरं करावं ?—

[ रागः—मिश्र ताल कवाली ]

**जीवन लाज स्त्रियां ॥ विलासप्रिया ॥ जायां ॥ ध्रु० ॥**
**अनुचित कां हे माया ? ॥ नच वद वाया ॥ चिंब सख्या !**
**जलिं बघ रे ! काया ॥ १ ॥**

**सर्जेरावः**—खरंच शेवंता काय हें ? या कपाळावरचा हा घर्मबिंदूंचा मोत्यांचा सर पाहून–हां पहा–ही मावळती निशा आपल्या मस्तकीचे हे मोती सर्वत्र उधळून देत आहे ! पण बिचाऱ्यानां या मोत्यांची बरोबरी करतां येईना म्हणून निराशेनं त्यांचं दवाच्या रूपानं पाणी होत आहे !

[ रागः—देसकार–त्रिवट ]

**शांत शांत यामिनी ॥ श्याम-बाला ॥ सलिल सकल ॥**
**विरल विरल ॥ फेकितसे तिमिर–जाला ॥ ध्रु० ॥**
**रत्नभार भालां चमचमता ॥ जणुं वाया उधळिते**
**मदनता ॥ लाजुनिया महिला ॥ १ ॥**

**शेवंताः**—असल्या गोड निशेंत कितीवेळ गुंगून राहायचं सख्या ?

**सर्जेरावः**—जिवाच्या अंतापर्यंतसुद्धां या निशेचा कैफ उतरायचा नाहीं ! पण खरंच शेवंता, आईसाहेब आपल्या वाटेकडं डोळे लावून बसल्या असतील—

**शेवंताः**—पण धनी हें काय ? चाहूल ऐकली ?—

**सर्जेरावः**—होय शेवंता, शाहूनं पाठलाग तर पाठवला नाहींना ? सावध राहा. यावेळीं आपण मोकळे आहोंत–आईसाहेबांचा आशिर्वाद आहे. भवानीची कृपा आहे म्हणून तर सिंहाच्या जबड्यातून सही सलामत बाहेर आलों. सावध रहा !–

**शेवंताः**—आपण निर्धास्त असा ! ( बकुळा व दौलती येतात. )

**सर्जेरावः**—कोण ? कोण तें ?

**बकुळाः**—चाकराचा विसर पडला धन्याला ?

**शेवंताः**—कोण बकुळा ?

**सर्जेरावः**—आणि हा कोण ? दौलती ! हरामखोर—

**बकुळाः**—सरकार, पोरीला चुडेदान द्या ! धन्यानां केल्या कृतीचा पश्चात्ताप झाला आहे.

**शेवंताः**—बकुळाकडं पाहून दौलतीवरचा राग सोडावा धनी—

**सर्जेरावः**—तुझ्याकरतां, बकुळा तुझ्या निष्ठेकरतां, तुला चुडेदान देतों.

**दौलतः**—सरकारचा चाकर सरकार—चाकरींत मरून जाईल.

**सर्जेरावः**—अंबाभवानी तुला अशीच बुद्धी देवो ! पण इथं थांबण्यांत अर्थ नाहीं. दौलती, इथं जवळपास कुठं घोडे नाहीं कां मिळणार ? पल्ला लांबचा आहे—

**दौलतः**—प्रयत्न करून पाहातों सरकार—पण—

**सर्जेराव!**—पण घेणार कशानीं ? खरंच, घेणार कशानीं ?

**शेवंताः**—कशानीं ? धनी, हे अलंकार काय करायचे ? ( कंठा दौलतीला देते. ) जा, नी या कंठ्यावर निदान दोन तरी घोडे मिळवून आण. तोंपर्यंत आम्हीं इथं राईंत थांबतों ! ( दौलती व बकुळा जातात )

**सर्जेरावः**—शेवटीं स्त्रियांच्याच हातीं पुरुषाचं भाग्य असतं !—

**शेवंताः**—म्हणूनच स्त्रीला भाग्यदेवता म्हणतात !—

[ रागः—भैरवीः—केरवा ]

**नारि-करीं प्रियकरां विभव नव-माला ॥ मंगलमय कालां ॥ देउनि सुरवर धाला ॥-गडे ! प्राणप्रियाला ॥ रमणी विधि-बाला ॥ ध्रु० ॥ सुखनाद मंजुमंजुला ॥ प्रीत-नुपुराला ॥ जरि जीव जिवाला; ॥ विजय पति त्याला ॥ १ ॥**

---

## प्रवेश ४ था.

( **स्थळः**—पन्हाळा; ताराऊचा दरबार. )

**ताराऊः**—अमात्य, ताराऊनं सवतासुभा उभारला म्हणून ताराऊ निश्चिंत झाली असं समजूं नका ! पन्हाळ्यावर आमचं निशाण फडकलेलं पाहातांच शाहूचा मोर्चा इकडं वळणार नाहीं कशावरून ? हा लढा आम्हांला आतां पूर्वीपेक्षांही निकरान चालवला पाहिजे ! म्हणून म्हणतें आंग्र्यांची कुमक वेळींच बोलवा ! प्रतिनिधी सर्जेरावसारखे आमचे जिवाचे सरदार या लढ्यांत आम्हीं इरेस घातले ते फुकट असं होतां कामा नये !——

**अमात्यः**——सरकारनीं निश्चिंत असावं ! आपल्या झेंड्याखालीं असलेला एकही शिपाई जिवंत असे तों शाहूचा झेंडा वारणेअलीकडे दिसणार नाहीं !–आईचा विश्वास मात्र पाहिजे !

**ताराऊः**—असं टोंचून कां बोलतां अमात्य ? ताराऊ बेविश्वासू बनली ती मूळची त्याच स्वभावाची असेल असं का तुम्हांला वाटतं ? आम्हीं जिवाशीं जडवलेले विश्वासानं जखडलेले, आमचे खंडो, धनाजी सारखे सरदार, कोणत्या ना कोणत्या कारणानं हराम झालेच ना ? विश्वास कुणाचा धरावा ? अमात्य, पायाखालीं असलेली धरणी कपटाच्या सुरुंगानं पोखरली असेल कीं काय अशी धडधड वाटते ! ताराऊला अशी केली तिच्या सेवकानीं——

**अमात्यः**——पण, प्रतिनिधीसर्जेरावसारखे सेवक आपल्याला मिळालेच ना सरकार ? ( सर्जेराव, शेवंता, बकुळा, दौलती येतात. )

**सर्जेरावः**——होय खात्रीनं ! सिंहाच्या जबड्यांतून सुटून पुन्हां आईसाहेबांच्या पायीं चाकरीला रुजू झालों ! सरकार, ताराऊचा सवता सुभा शाहूशीं पुन्हां झुंज द्यायला तयार आहे हें शाहूराजानां जरूर कळूं द्या !

**ताराऊः**—सर्जेराव -सर्जेराव आणि शेवंता ? आहाहा–आज आम्हीं खरा विजय मिळवला ! आमचीं मुलं आम्हांला परत मिळालीं !

**शेवंताः**—पण बकुळाच्या शहाणपणानं ! तिनंच आम्हांला सोडवलं !–

**ताराऊः**——शाबास बकुळा ! मराठ्याचं नांव राखलंस ? काय तुला देऊं ?

**बकुळाः**—अखंड चुडेदान नी सरकारची कृपा——

**ताराऊः**—म्हणजे ?--

**बकुळाः**--अजिमताऱ्यावर शाहूचं निशाण चढवलं माझ्या धन्यानं !

**ताराऊः**--काय दौलतीनं ? ठीक आहे. बकुळा तुझ्याकरतां दौलतीचा हा गुन्हा माफ आहे !

**दौलतीः**--सरकारचे उपकार झाले--

**ताराऊः**—पण प्रतिनिधी—

**सर्जेरावः**--खंडोबाच्या कृपेनं जीव वाचवून-शाहूच्या बंदिखान्यांत-अजिमताऱ्यावर—

**ताराऊः**—काय ? दुष्मनच्या कृपेनं प्रतिनिधी जगूं पाहातात ? प्रतिनिधी, प्राणांच्या मोहांनं आज पीळ सोडलात, उद्यां त्याच मोहानं ताराऊवर कशावरून चढाई नाहीं करणार ?

**शेवंताः**—सरकार, प्रतिनिधी लाचार आहेत ! स्वतःचा जीव गहाण ठेवून आपल्या या लेकीचें कपाळ साजरं ठेवलं ! जिवाचं मोल द्यायला तयार होऊन माझं माहेर केलं, तें जिवाच्या आशेनं नाहीं !

**ताराऊः**—आम्हीं बेहोष असतांना आम्हांला पन्हाळप्रांतीं रवाना करून किल्ला शाहूच्या स्वाधीन केला त्याच वेळीं आम्हीं हें समजलों ! पण असा सहजासहजीं किल्ला स्वाधीन करण्यांचं कारणच काय होतं ?--

**शेवंताः**—सरकार, आपण बेहोष झाल्याची संधी साधून शेखमिरानं आपल्या पोराबाळांच्या आशेनं अजिमताऱ्यावर शाहूचं निशाण फडकावलं—

( सेवक प्रवेश करतो. )

**सेवकः**—सरकार, सातारहून कुणी स्वार आला आहे.

**ताराऊः**--तुमच्या पाठीवर तर कुणी नाहींना सुटलेलं ? अमात्य, गडाचे मोर्चे सावध ठेवा ! इशाऱ्याची तोफ डागून गड झुंजायला तयार राखा ! (अमात्य जातात) सर्जेराव, सातारचा जासूद म्हणजे युद्धाचं पुन्हां आव्हान असंच आम्हीं समजतों--

**खंडोः**—( प्रवेशून ) सरकार, युद्ध संपलं ! ताराऊराजा स्वतंत्र झाल्या !--

**ताराऊः**--कोण ? कोण ? खंडेराव ? आम्ही जाग्या आहोंत कीं स्वप्नांत आहोंत ?

**सर्जेरावः**—खंडोबा आणि पन्हाळ्यावर ? कोणती बातमी घेऊन आलांत खंडोबा ?

**ताराऊः**—हें काळं तोंड ताराऊसमोर घेऊन यायला शरम नाहीं वाटली खंडोबा? नेकीचे नेकजात तुम्हीं, थोरल्या राजांच्यापासून एकनिष्ठ सेवक म्हणून लौकिक तुमचा—ते तुम्हीं धन्याच्याच इमलीला चूड लावून त्याच राखेंत लोळूं पाहातां?

**खंडोः**—सरकार, सरकार, जबानाची कदर जानाच्या मोलानं करण्याचा जर खंडोला सराव नसता तर ही आगळीक चाकराच्या हातीं घडलीच नसती! शंभुराजानां दिलेलं वचन पार पाडलं——

**ताराऊः**—आणि आम्हांला अशी देशोधडीला लावलीत——

**खंडोबाः**—नाहीं आईसाहेब, बालराजानां सवत्यासुभ्याचं आज्ञापत्र—

**ताराऊः**—बालराजानां आज्ञापत्र? कोण आज्ञा करणार बालराजांना?—भिक्षेच्या अन्नावर जगणारे बालराजे आहेत असं का शाहूला वाटलं? आणि हें आज्ञापत्र आमच्याकडं घेऊन यायला खंडोच्या पिकल्या बुद्धीला ताराऊची भीती वाटली नाहीं? खंडो, तुम्हां मुत्सद्यांचा—हा पडत्या काळांत शेखी मिरवण्याचा डाव नाहीं कशावरून? तुकड्याच्या आशेनं बुद्धीचा विक्रा करणारे तुम्हीं! तुमचा भरंवसा कसा पटावा?

**खंडोः**—विश्वासू कुत्र्याच्याच निष्ठेनं आज दिन तख्ताची चाकरी केली. आणि शेवटीं त्याच निष्ठेमुळं प्रतिनिधींनां वाचवून आपलाही हेतु तडीला नेला! पण सरकारच्या मनींच विकल्प भरला! भवितव्यता—

**ताराऊः**—खंडो, जो सवता सुभा आम्हीं मनगटाच्या मर्दुमकीवर उभारला, त्याला ही शाहूची मान्यता घेऊन, मांडलिकपणाचा कमीपणा आम्हीं कां सोसावा? करवीर स्वतंत्र आहे! आणि स्वतंत्रच राहील! करवीरच्या झेंड्याला शाहूच्या मान्यतेची जरूरी नाहीं!

**खंडोः**—सरकार ही यादवी बंद करून, महाराष्ट्राचे हाल चुकवावेत म्हणून पदर पसरून, भिक्षा मागून खंडो पायांजवळ याचना करीत आहे! आईसाहेब, आईसाहेब, पोराची आगळीक पोटांत घालून मानी जिवाचं समाधान करून घ्या! नाहीं तर—

**ताराऊः**—नाहीं तर काय?—

**खंडोः**—खंडोचा पन्हाळ्यावर कडेलोट तरी करा! म्हणजे उद्यांची यादवी तरी पाहावी लागणार नाहीं—

**ताराऊ**:—केल्या विश्वासघाताबद्दल, खंडोला कडेलोटाची सजा सुद्धां कमीच ठरणार आहे ! पण, यापुढं आम्हांलाही यादवी नकोच आहे ! सवता सुभा आम्हीं स्वतंत्र केला त्याच वेळीं सातारचा आमचा संबंध सुटला ! परकी वकील या नात्यानंच आज आम्हीं खंडोकडं पाहातों, आणि म्हणूनच खंडोशीं विश्वासघातानं आम्हांला वागायचं नाहीं ! जा, नी शाहूला सांगा कीं तुमच्या मान्यतेची ताराऊच्या सवत्या-सुभ्याला जरूरी नाहीं !

**सर्जेराव**:—आईसाहेब–

**ताराऊ**:—बोला सर्जेराव–

**सर्जेराव**:—शाहूराजांशीं संधी करण्याचा हा मोका प्रतिनिधी सुटत असतील तर आईसाहेबानीं दवडूं नये !–

**ताराऊ**:—मानी, महत्त्वाकांक्षी राजाला ही अट कशी कबूल होणार ? आम्हीं सुद्धां कुत्र्याप्रमाणं यांच्या पैजारा सांभाळाव्यात अशी ज्यांची अपेक्षा, ते आमच्या अटी कशा मानणार ? खंडोलाच विचारा––

**खंडो**:––महत्त्वाकांक्षी, अलमगिराच्या सहवासांतल्या राजाला इतका बुद्धीचा आवर नाहीं आईसाहेब––

**ताराऊ**:—तर मग हा सलोख्याचा वरपांगी देखावा कशाला ? चला; गडाखालीं आलेत तसे चालते व्हा ! ताराऊचा मार्ग स्वतंत्र आहे. शाहूंना त्यांचे मार्ग मोकळे आहेत !

**खंडो**:––आईसाहेब, लौकिकाकरतां, आपण तरी थोडं शांतपणाचं––

**ताराऊ**:—लौकिकाकरतां आम्हीं काय करावं असं तुम्हांला वाटतं ? शाहूच्या घोड्यापुढं नाचावं ? त्यांच्या मोगली लहरीप्रमाणं बुद्धीला वेसण घालून त्यांची थुंकी झेलावी ? दीड वीत पोटाच्या आशेनं त्यांचा राजेशाही उन्माद आम्ही आजन्म सहन करावा ? ठोकरीशीं गांठ घातली तरी शांतपणानं पुन्हां मस्तक पुढं झुकवावं ? शरम नाहीं वाटत असा उपदेश करायला खंडो ? आम्हीं मेल्या रक्ताचे नाहीं कीं पोराच्या ताटाखालचं मांजर होऊन बसूं ! अजूनही शाहूला आमच्याशीं दावेदारीच धरायची असेल तर खुशाल धरूं द्या ! करवीर स्वतंत्र राज–दंडानं शाहूशीं भिडायला आतां तयार आहे ! ( पडद्यांत तोफ ) शेवंता, ही मोर्चेबंदीची तोफ झडली ! निशाणाची रखवाली पुन्हां तुझ्याकडं ! जा, आणि सातारा करवीरचा भाऊबंदकीचा

संबंध तोडण्याच्या या वेळेस बालराजांचं निशाणं पन्हाळ्यावर चढूं दे! ( शेवंता जाते. ) सर्जेराव, या नव्या राजवटींत शिलेदाराचे सरदार म्हणून बालराजांची राखण करा–

**सर्जेरावः**—पंचप्राणांच्या कोंदणांत बालराजांचं रत्न बसवीन, देहाची ढाल करीन, पण माझा चिमणा राजा आनंदानं हसत ठेवीन !

**शिवाजीः**--( प्रवेशून ) सर्जेराव, सर्जेराव केव्हां आलांत ? आणि हे कोण ? खंडो चिटणीस ? तुम्हीं कसे आलांत ?

**खंडोः**—बालराजांच्या नव्या राजवटींत मानाचा पहिला मुजरा करण्याकरतां ! शाहूराजांनीं आपल्याला करवीरचा सवता सुभा तोडून दिला !

**शिवाजीः**--आणि आईसाहेब, असल्या भिक्षेवर कां आम्हीं राजे होणार ?

**ताराऊः**--नाहीं, खरा राजा स्वतःला मुकुट निर्माण करतो ! भिक्षा मागील तो राजा कसला ? करवीरचं राज्य, तुमच्या कर्तबगारीचं आहे. भिक्षेचं नाहीं !

**शिवाजीः**—होय ना? तर मग राजानां कळवा कीं आम्हीं स्वतंत्र आहोंत ! तुमच्या दिलदारीची आम्हांला आशा नाहीं ! ( शेवंता येते. )

**शेवंताः**—लिंबलोण करावं या राजसराजावरून ? बालराजे, तें पाहिलंत आपलं नवं स्वातंत्र्याचं निशाण ? करवीरचा भगवा झेंडा ! मोगली जरीपटका सातारला राहीला हो !

**खंडोः**—आईसाहेब–आईसाहेब–हा अविचार पुन्हां महाराष्ट्रांत रणधुमाळी माजवील हो रणधुमाळी माजवील ! थोडंतरी विचाराचं उत्तर–

( पडद्यांत तोफा )

**ताराऊः**—ताराऊचं विचाराचं उत्तर या स्वतंत्र निशाणाला सलामी देत असलेल्या या तोफानां विचारा ! करवीर स्वतंत्र आहे आणि त्याच तोलानं तें शाहूशीं वागेल ! शाहू जर आमच्याशीं सरळ वागतील तर करवीरसुद्धां शाहूशीं त्याच रीतीनं वागेल ही खात्री ठेवा ! नाहीं तर आघातालो प्रत्याघात हेंच ताराऊचं शाहूला उत्तर ! जा. शाहूला आमचे कुशल कळवा ! सर्जेराव, अमात्य, शाहूराजांचा मान म्हणून पांच तोफांची सलामी खंडो जातांना द्या ! आणि नव्या निशाणाच्या नांवानं चौघडा झडूं द्या ! !

खंडोः—येतों आईसाहेब, बालराजांचा विजय असो !–( मुजरा करून जातो )

ताराऊः—पण जातानां खंडो, करवीरच्या झेंड्याला, मूळ छत्रपतींच्या निशाणाला वंदन करून पुढं जा म्हणजे तरी तुम्हांला सद्बुद्धी होईल !

## कोरस.

[ रागः सारंग, त्रिवट ]

नव महाराष्ट्र–विजया ! ॥ निशाणा नमुं या ॥ धृ० ॥
नव्या मनूचे ॥ शिलेदार तव ॥ प्याले चैतन्या ! ॥ १ ॥
स्वातंत्र्याचा ॥ जयमद चढला ॥ नमवूं जग पायां ! ॥ २ ॥
निस्वार्थांचा पूर्णकलेचा ॥ उसळत जनिं दरिया ! ॥ ३ ॥
नवलाखाचा ॥ जीव सुखाचा ॥ उधळूं तव पायां ! ॥ ४ ॥

समाप्त

म. ग्रं. सं. ठाणें. आत्मनालय शाखा.
प्र. क्र. 7048 ना. दि.
कि. 5/12/-